




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार ८ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## दोन कारची समोरासमोर धडक
# 4 प्रवाशांचा जागीच मृत्यू

**नाशिक/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्गावरील आंबेगन शिवारात आज दुपारी एक भीषण अपघात घडला. दोन कारची समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेत चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला आहे, तर सहा महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहनांचा



अक्षरशः चक्काचूर झाला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातच्या वापी येथील काही भाविक शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेउन आपल्या कारने नाशिकमार्गे परतत होते. दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास चाचडगाव टोलनाका ओलांडल्यानंतर आंबेगन शिवारात त्यांच्या कारची समोरून येणा-या दुस-या कारशी भीषण धडक झाली. या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला. मृतदेह दिंडोरी ग्रामीण रु ग्णालयात पाठवण्यात आले आहेत. अपघातातील सहा जखमी महिलांना तात्काळ नाशिकच्या शासकीय जिल्हा रु ग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी चार महिलांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

## राज्य निवडणूक आयोगाचा भगवा शब्दाला आक्षेप

**मुंबई / प्रतिनिधी-**भाजपाने मुंबई महापालिकेच्या प्रचारासाठी तयार केलेले प्रचारगीत निवडणूक आयोगाने नाकारले आहे. या गीतातील भगवा या




शब्दाला निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आहे.यामुळे भाजपाचा तिळपापड झाला असून, धर्मनिरपेक्ष निवडणूक आयोग रंगनिरपेक्षही असायला हवा, निवडणूक आयोगाला भगव्याच वावडे का? असा सवाल भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला आहे. भाजपाने मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी एक गीत तयार केले आहे. अवधुत गुप्ते आणि वैशाली सामंत या प्रख्यात गायकांनी ते गायले आहे. मात्र या गीतात वापरलेल्या भगवा या शब्दाला आक्षेप घेत निवडणूक आयोगाने हे गीत नाकारले आहे. यामुळे भाजपाची प्रचाराच्या ऐन तोंडावर अडचण निर्माण झाली आहे. आता प्रचारासाठी नवीन गीत तयार करावे लागणार आहे. निवडणूक आयोगाला भगव्याचे वावडे का ? असा सवाल भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केला आहे. कुणी हिरव्या रानात अशी ओळ केली असती तर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला असता का? मग भगवा शब्द वापरला म्हणून भाजपाचे प्रचार गीताला परवानगी नाकारली? श्रीराम या शब्दालाही आक्षेप घेण्यात आला आहे. भगवा व श्रीराम या देशाची ओळख आहे ती कुणाची कापीराईट नाही. हा उबाठासह इतर पक्षांना भगवा व श्रीरामाचे वावडे आहे.

## पोलिस निरीक्षकाचा 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**कानपूर:** उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यातील सचेंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अत्यंत गंभीर आणि संतापजनक घटना उघडकीस आली आहे. १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून चालत्या कारमध्ये तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे, या गुन्ह्यात एक आरोपी चक्क पोलिस अधिकारी आहे. रक्षकच भक्षक बनल्यामुळे परिसरातील लोकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. पीडित मुलगी सोमवारी रात्री सुमारे १० वाजता शौचासाठी घराबाहेर पडली असताना स्कार्पिओ कार आणि दुचाकीवर आलेल्या तरु णांनी तिला जबरदस्तीने कारमध्ये ओढून नेले. सचेंडी परिसरातील निर्जन ठिकाणी नेउन कारमध्येच तिच्यावर बारी-बारीने बलात्कार करण्यात आला. सुमारे दोन तासांनंतर पीडितेला घराजवळ फेकून आरोपी फरार झाले. तपासात भीमसेन चौकीतील पोलिस निरीक्षक अमित मौर्य याचा गुन्ह्यात सहभाग असल्याची पुष्टी झाली आहे. त्याने शिवबरन नावाच्या तरु णासोबत मिळून हा गुन्हा केल्याचे समोर आले आहे.

# काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांची हत्या

**अकोला/प्रतिनिधी :** अकोट तालुक्यातील मोहाळा येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हिदायत पटेल यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचे निधन झाल्याने संपूर्ण अकोला जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मोहाळा गावात असताना एका इसमाने हिदायत पटेल यांच्यावर अचानक चाकू हल्ला केला. आरोपीने पोटात आणि मानेवर दोन ते तीन खोल वार केल्याने पटेल गंभीर जखमी झाले आणि रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. त्यांना तातडीने अकोट येथे, तर नंतर प्रकृती अधिकच चिंताजनक झाल्याने अकोल्यात हलवण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. हल्ल्यानंतर पसार झालेला उबेद पटेल याला अवघ्या पाच तासांत पणच परिसरातून ताब्यात घेण्यात आले. मुख्य आरोपी अटकेत असला तरी या हत्येमागील नेमके कारण काय, हा प्रकार वैयक्तिक वादातून झाला की यामागे राजकीय कट आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत.



### ◆ पार्थिव मोहाळ्याकडे रवाना ◆

*पोलीस प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर नातेवाईकांनी हिदायत पटेल यांचे पार्थिव ताब्यात घेतले. त्यानंतर अंतिम संस्कारासाठी पार्थिव त्यांच्या मूळ गावाकडे मोहाळा येथे रवाना करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त कायम ठेवण्यात आला आहे.*

## ■ मुख्य आरोपी अटकेत,
## ■ तपास वरिष्ठ अधिका-यांकडे

### तपास आयपीएस अधिका-यांकडे;नार्को टेस्टचा निर्णय

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता संपूर्ण तपास IPS दर्जाचे अधिकारी, अकोटचे एसडीपीओ निखिल पाटील यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. तपासाचा भाग म्हणून मुख्य आरोपीची नार्को टेस्ट करण्यात येणार असून, सर्व संशयितांचे मोबाईल SDR, CDR, व्हाट्सअॅप काल्ससह डिजिटल पुराव्यांची सखोल तपासणी केली जाणार आहे. निष्पक्ष आणि सखोल चौकशीचे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.

### नातेवाईकांचा आक्रमक पवित्रा; पोलिसांचे ठोस आश्वासन

हिदायत पटेल यांच्या मृत्यूनंतर नातेवाईकांनी आक्रमक भूमिका घेत अजित पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद बद्रुजमा यांच्यासह अन्य चार संशयितांवर गुन्हे दाखल केल्याशिवाय अंत्यसंस्कार करणार नसल्याची भूमिका घेतली होती. परिस्थिती चिघळू नये म्हणून पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्वतः हस्तक्षेप करत आंदोलकांशी चर्चा केली आणि प्रकरणाचा तपास वरिष्ठ पातळीवर केला जाईल, असे लेखी आश्वासन दिले.

## जम्मूच्या कठुआ जिल्ह्यात चकमक

**कठुआ/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीरमधील कठुआ जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये जोरदार चकमक सुरू झाली आहे. ही चकमक कठुआ जिल्ह्यातील बिलावार तालुक्यातील कमाद नाला (कहोग गाव परिसर) येथे सुरू असून जैश-ए-मोहम्मदचे किमान तीन दहशतवादी या परिसरात लपले असून जवानांनी संपूर्ण परिसराला घेराव घातला आहे. अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार, परिसरात दहशतवादी हालचालींची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या एसओजी पथकाने शोध व घेराबंदी मोहीम सुरू केली. याचदरम्यान जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला, त्यानंतर सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिले. अतिरिक्त सुरक्षा दल घटनास्थळी पाठवण्यात आले आहेत.मीडिया रिपोर्ट्सनुसार, सायंकाळी सुमारे ४ वाजता बिलावर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कमाद नाल्यात स्थानिक नागरिकांनी एका संशयित दहशतवाद्याला पाहिले. अधिका-यांच्या मते, हा तोच दहशतवादी असण्याची शक्यता आहे, जो आज सकाळी धन्नू पॅरोल परिसरात दिसला होता.जम्मूचे आयपीजी भीम सेन टूटी यांनी एक्स (ट्विटर)वर पोस्ट करून चकमकीची अधिकृत पुष्टी केली आहे. ही २०२६ (पान २ वर)

**दहशतवाद्यांना सुरक्षा दलांनी घनदाट जंगलात घेरले**

# सर्व पक्षांच्या प्रतोदांची पॉवर वाढली!

## ◆ आता थेट मंत्रिपदाचा दर्जा ◆ अलिशान सुविधाही मिळणार

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र सरकारने विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांतील सर्व राजकीय पक्षांच्या मुख्य प्रतोद आणि प्रतोदांच्या बाबतीत एक मोठा




निर्णय घेतला आहे. आता या पदावर कार्यरत असलेल्या सदस्यांना मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. या निर्णयामुळे त्यांना सरकारी कर्मचारी आणि शासकीय वाहनांसारख्या महत्त्वाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

विधानसभा आणि विधानपरिषदमध्ये प्रत्येक राजकीय पक्षाचे कामकाज सांभाळण्यासाठी, आमदारांना सूचना देण्यासाठी आणि सभागृहात शिस्त राखण्यासाठी मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांची नियुक्ती केलेली असते. आता या दोन्ही पदांना प्रशासकीयदृष्ट्या मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. यामुळे त्यांना मिळणा-या मान-सन्मानात आणि सुविधांमध्ये मोठी वाढ झाली आहे. सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार प्रतोदांना अधिकृत दौ-यांसाठी आणि कामकाजासाठी शासकीय वाहन दिले जाईल. महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या मूळ वेतनात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यांना आमदारांप्रमाणेच वेतन मिळत राहील. मुख्य प्रतोदांना दरमहा २५ हजार रुपये आणि प्रतोदांना दरमहा २० हजार रुपये इतका भत्ता मिळतो. सभागृहाचे (पान २ वर)

### किमान 10 टक्के सदस्य संख्येची अट

विधानसभा आणि विधानपरिषदेत विरोधी पक्षनेतेपदासाठी विरोधक संघर्ष करत असताना आता विरोधी पक्षांच्या प्रतोदांना मिळणारा



मंत्रीपदाचा दर्जा व त्या अनुषंगाने मिळणा-या इतर सुविधांपासून वंचित राहावे लागणार आहे. सत्ताधारी पक्षांच्या व्यतिरिक्त ज्या पक्षांच्या विधानसभा आणि विधानपरिषदेतील एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के सदस्य असतील त्यांनाच मंत्रीपदाचा दर्जा आणि विविध सुविधा मिळतील, अशी अट राज्याच्या संसदीय कार्य विभागाने टाकली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला.नोव्हेंबर २०२४ मध्ये पंधरावी विधानसभा गठीत झाल्यापासून विधानसभेत विरोधी पक्षनेता नाही. महाविकास आघाडीतील एकाही घटक पक्षाकडे विधानसभा सदस्य संख्येच्या १० टक्के (पान २ वर)

# 26 जहाल माओवादी शरण

## छत्तीसगडमध्ये पोलिसांच्या मोहिमेला मोठे यश

**गडचिरोली :** छत्तीसगडमधील नक्षलवादाचा बालेकिल्ला समजल्या जाणा-या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांच्या कंबरडे मोडणारी कामगिरी केली आहे. पोलिसांच्या वाढत्या दबावामुळे आणि नक्षली विचारधारेतील पोकळपणाला कंटाळून ७ जानेवारी रोजी सकाळी २६ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. विशेष म्हणजे, यात ६५ लाखांचे इनाम असलेल्या १३ जहाल नक्षलवाद्यांचा समावेश असून, या मोठ्या यशामुळे बस्तर विभागात नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे. आत्मसमर्पण केलेल्या २६



नक्षलवाद्यांमध्ये ७ महिला कॅडर्सचा समावेश आहे. माओवादी कंपनीची समिती सदस्य लाली उर्फ मुचाकी आयते लखमू (३५) हिनेही शस्त्र खाली ठेवले. २०१७ मध्ये ओडिशातील कोरापूट रोडवर पोलिसांचे वाहन आयईडी स्फोट घडवून उडविले होते, यामागे लाली ही मास्टरमाईंड होती. यासोबत हेमला लखमा (४१), अस्मिता उर्फ कमलू सन्नी (२०), रामबती उर्फ पदम जोगी (२१), सुंदर पाले (२०) यांचाही समावेश आहे. हे (पान २ वर)

# इम्तियाज जलील यांना मारहाण

## छ.संभाजीनगरचे वातावरण तापले

**छ. संभाजीनगर/ प्रतिनिधी-** महापालिका निवडणुकीचा प्रचार ऐन रंगात आलाय. एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांना संभाजीनगरमध्ये मारहाण झाली आहे. नाराज कार्यकर्त्यांनी जलील यांची कार रोखली. संतापलेल्या कार्यकर्त्यांनी कारवर धडाधड बुक्या आणि पायांनी मारहाण केली. त्याशिवाय जलील यांनाही मारहाण केली. या प्रकारानंतर संभाजनगरमधील वातावरण चांगलेच तापले.छत्रपती संभाजीनगरमधील बायजीपु-यात जलील यांना मारहाण झाली. एमआयएमचे कार्यकर्ते आणि एमआयएमचे नाराज कार्यकर्त्यांमध्ये जोरदार राडा आणि हाणामारी झाली. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज झालेली हे त्या भागातून पदयात्रा काढत होते. पदयात्रा सुरू झाल्यानंतर त्यांना विरोध होत होता. जलील त्यांच्यासमोरच हा राडा झाला. जलील यांना आधी काळे झेंडे दाखवण्यात आले. त्यानंतर आडवले अन् हाणामारी झाली. यावेळी दोन गटांमध्ये हमारीतुमरी होउन हाणामारी



झाली. त्यावेळी पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. पोलिसांना सौम्य लाठीचार्ज केला.

**तिकिट नाकारल्यामुळे कार्यकर्त्यांचा रोष-**२०१४ पासून मराठवाड्यात पाय रोवणा-या, मुस्लिम बहुल भागात वर्चस्व (पान २ वर)











# सरकारी कर्मचा-यांकडून पैसे वसूल

## लाडकी बहीण योजनेबाबत धक्कादायक माहिती उघडकीस

**मुंबई /प्रतिनिधी-**लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी काही नियम निश्चित करण्यात आले आहे. या निकषाअंतर्गत येणा-या महिलांनाच योजनेचा लाभ मिळणार आहे. लाडकी बहीण योजनेत सरकारी कर्मचा-यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. दरम्यान, अनेक सरकारी कर्मचा-यांनी योजनेचा लाभ घेतला आहे.या सरकारी कर्मचा-यांवर कारवाई केली जाणार आहे. योजनेचा निकषाबाहेर जाउन लाभ घेणे हे सरकारी कर्मचा-यांना चांगलेच भोवले



आहे. बुलडाणा जिल्ह्यात शासकीय कर्मचारी असताना देखील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस होता. शासनाकडून महिला व बालकल्याण विभागाला विविध विभागात कार्यरत असलेल्या १९६ कर्मचा-यांची यादी प्राप्त झाली होती. १९६ महिलांनी योजनेचा निकषाबाहेर जाउन लाभ घेतला आहे. त्या प्रकरणाची चौकशी केली असता १९० कर्मचारी हे (पान २ वर)









जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# १ व १० वरिल उर्वरित

## जम्मूच्या कठुआ जिल्ह्यात

सालातील पहिली दहशतवादी चकमक आणि पहिले मोठे काउंटर-टेरर ऑपरेशन असल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण कारवाईवर स्वतः भीम सेन टूटी आणि कठुआच्या एसएसपी मोहिता शर्मा लक्ष ठेवून आहेत.आयजीपी भीम सेन टूटी यांनी सांगितले की, घनदाट जंगल, अंधार आणि कठीण भूप्रदेश असूनही एसओजी सातत्याने दहशतवाद्यांशी मुकाबला करत आहे. ऊरुढत्रची पथकेही या संयुक्तकारवाईत सहभागी आहेत. सध्या दहशतवाद्यांना चारही बाजूंनी घेरण्यात आले असून परिसरात कडक नजर ठेवली जात आहे.

## सर्व पक्षांच्या प्रतोदांची

कामकाज चालवताना राजकीय पक्षांच्या प्रतोदांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आपल्या पक्षाच्या आमदारांवर नियंत्रण ठेवणे, पक्षादेश काढणे आणि विधीमंडळाच्या कामकाजात समन्वय साधणे ही जबाबदारी ते पार पाडत असतात. त्यांना कामकाजासाठी आवश्यक सोयी-सुविधा मिळाव्यात आणि त्यांच्या पदाची प्रतिष्ठा वाढावी, या उद्देशाने सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

## किमान १० टक्के सदस्य

आमदार नसल्याने विरोधी बाकावरील महाविकास आघाडीची विरोधी पक्षनेते पदाची मागणी अद्याप मान्य झालेली नाही. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात उद्धव सेनेचे अंबादास दानवे यांची मुदत संपल्याने विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदही रिक्तआहे. काँग्रेसच्या प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेसचे विधान परिषदेतील संख्याबळ घटले आहे. त्यामुळे नजीकच्या काळात काँग्रेसला विधान परिषदेत विरोधी पक्षनेते पद मिळण्याची चिन्हे नाहीत. या पार्श्वभूमीवर आता संसदीय कार्य विभागाने मुख्य प्रतोद आणि प्रतोद यांच्या सुविधांच्या संदर्भात नवा शासन निर्णय जारी केला. विधानसभा आणि विधानपरिषदेत प्रत्येक पक्षाचा एक मुख्य प्रतोद आणि एक प्रतोद असतो. मुख्य प्रतोदना कॅबिनेट, तर प्रतोदांना राज्यमंत्रिपदाचा दर्जा देण्याचा निर्णय २०१७ साली घेण्यात आला होता. त्याचबरोबर मुख्य प्रतोदांना २५ हजार, तर प्रतोदांना २० हजार रुपये प्रतिमाह मानधन, मुंबईतील अधिवेशनासाठी अनुक्रमे २५ हजार आणि २० हजार वाहन भत्ता, तसेच नागपूर अधिवेशनात वाहन व्यवस्था दिली जाते. मात्र आता विरोधातील कोणत्याही पक्षाकडे विधानसभा आणि विधानपरिषदेत १० टक्के संख्याबळ नसल्याने त्यांच्या प्रतोदांना या सुविधा मिळणार नाहीत.

## २६ जहाल माओवादी

सर्वजण गेल्या अनेक वर्षांपासून विविध हिंसक कारवायांमध्ये सक्रिय होते. मात्र, शासनाच्या पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होउन त्यांनी मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. जिल्हा मुख्यालयी पोलिस अधीक्षकांसमोर त्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवून शांततेचा मार्ग स्वीकारला. एकाच वेळी २६ नक्षलवादी शरण आल्यामुळे पोलिसांच्या हाती महत्त्वाची माहिती लागण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या मोठ्या नक्षली हल्ल्यांचे नियोजन आणि त्यातील सहभागी नेत्यांची माहिती यातून समोर येउ शकते. या ऐतिहासिक आत्मसमर्पणानंतर नक्षली चळवळीची ताकद मोठ्या प्रमाणावर क्षीण झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. सुकमा पोलिसांकडून नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'पुना मारगेम' (नवी पहाट) ही विशेष मोहीम राबवली जात आहे.

## इम्तियाज जलील यांना

असणा-या आणि मुस्लिम बहुल भागामध्ये एकतर्फी विजय मिळवणा-या एमआयएमला छत्रपती संभाजीनगरमध्ये मुस्लिम बहुल भागातच विरोध होउ लागला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील बायजीपुरा भागांमध्ये एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष माजी खासदार इम्तियाज जलील हे पदयात्रा काढताना त्यांना काळे झेंडे दाखवण्यात आले. ज्यांनी दहा-बारा वर्ष एमआयएम साठी काम केलं, त्यांना तिकीट दिले नाही म्हणून लोक विरोध करीत असल्याची प्रतिक्रिया बंडखोरी केलेल्या आणि काँग्रेसमधून पुरस्कृत उमेदवाराचे म्हणणे आहे.

## सरकारी कर्मचा-यांकडून

अर्धवेळ आणि अडीच लाखापेक्षा कमी उत्पन्न असल्याचे आढळल्याने ते पात्र ठरले आहेत. या महिलांचे उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त आहे. शिवाय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे संबंधित कर्मचा-यांवर कारवाईसाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. लवकरच त्यांच्यावर पुढील कारवाई केली जाणार आहे, त्यामुळे शासनाची फसवणूक करून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणे या कर्मचा-यांना चांगलेच भोवले आहे. या महिलांकडून पैसे वसूल करण्यात आले आहे.

## अमरावती शहर सीसीटीव्हीच्या

नियंत्रण, वाहतूक व्यवस्थेतील सुधारणा आणि आपत्कालीन परिस्थितीत जलद प्रतिसाद देणे शक्य होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अमरावतीला २०३० पर्यंत मुख्यालयाचे शहर म्हणून विकसित करण्याचा भाजपचा दीर्घकालीन दृष्टिकोन असून, यामध्ये पायाभूत सुविधा, स्मार्ट सिटी धर्तीवरील विकास, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व रोजगार निर्मितीला प्राधान्य दिले जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.कमळाची बटण म्हणजे विकसित अमरावतीची बटण आहे, असे सांगत त्यांनी अमरावती महापालिकेचा महापौर भाजपचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला. भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढवणारा प्रत्येक उमेदवार विजयी करण्यासाठी पक्षाची संपूर्ण यंत्रणा कामाला लागली असल्याचे त्यांनी नमूद केले.

## इंदूरहून अमरावतीत गुटखा

केली असता ट्रकमध्ये गुटखा असल्याची कबुली त्याने दिली. हे प्रकरण अन्न व औषध प्रशासनाशी संबंधित असल्याने तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी पंचनामा करून विविध कंपन्यांचा बंदी घातलेला गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त केला. जप्त केलेल्या प्रतिबंधित पदार्थांची किंमत १४ लाख ४३ हजार ६२० असून आयशर ट्रकची किंमत सुमारे १५ लाख आहे. या प्रकरणात एकूण ६ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यापैकी ट्रक चालक ईश्वर भगवान सिंग सूर्यवंशी (रा.अहेरखेडी, इंदूर, मध्य प्रदेश) व अब्दुल सलीम अब्दुल कादिर (वय ३५, रा. ट्रान्सपोर्ट नगर, अमरावती) यांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात ही खेप इंदूर येथील रहिवासी अवध किशोर पांडे याने पाठवली असल्याचे निष्पन्न झाले असून ती दानिश (माऊली, अमरावती), साजिद (नेर, यवतमाळ) व साईराम (यवतमाळ) यांच्याकडे पाठवण्यात आली होती. अन्न सुरक्षा अधिकारी घनश्याम दंडे यांच्या तक्रारीवरून नागपुरी गेट पोलीस ठाण्यात संबंधित कलमांखाली गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सय्यद नाझीम, रणजीत गावंडे, चालक प्रभात पोकळे तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी घनश्याम दंडे पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## माजी मंत्री जगदीश गुप्ता पुन्हा

आज बुधवारी ७ जानेवारी रोजी जाहीर सभेसाठी अमरावती मध्ये आले होते. यावेळी विमानतळावरून ते सरळ माजी मंत्री जगदीश गुप्ता यांची भेट घेण्यासाठी सिपना कॉलेजला पोहोचले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अमरावतीत आल्यावर सर्वात प्रथम जगदीश गुप्ता यांना भेटण्यासाठी सिपना कॉलेजमध्ये पोहोचले. जिथे दोघांमध्ये पंधरा मिनिटं बंदद्वार चर्चा झाली. या चर्चेनंतर जगदीश गुप्ता यांची नाराजी दूर झाली आणि ते उपमुख्यमंत्री सोबत जाहीर सभेमध्ये पोहोचले. जाहीर सभेच्या मंचावर ते दिसले. गुप्ता म्हणाले की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या शब्दांचा मान ठेऊन मी पुन्हा शिवसेनेमध्ये आलो आहे. शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी मी कार्य करणार आहे. माजी मंत्री जगदीश गुप्ता यांना पुन्हा शिवसेनेमध्ये सहभागी करण्यासाठी समाजसेवक चंद्रकांत उर्फ लप्पी जाजोदिया यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. यामुळे जगदीश गुप्ता यांची नाराजी दूर झाली आणि ते पुन्हा पार्टीमध्ये सक्रिय झाले. गेल्या आठ दिवसापूर्वी महायुतीमध्ये जागा वाटपावरून जगदीश गुप्ता नाराज झाले होते आणि त्यांनी पार्टीला जय श्रीराम म्हटले होते. महानगरपालिका निवडणुकीपूर्वी शिवसेनेला धक्का बसला होता. पण आता त्यांची नाराजी दूर झाली आहे आणि ते पुन्हा शिवसेने मध्ये आले आहे. याचा लाभ शिवसेनेला होणार आहे.

## देशी कट्टा व काडतूससह आरोपी

गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारावरून बगिया टी पॉईंट जवळून आरोपी प्रतिक उर्फ पद्या विनोद कैथवास (वय ४०) याला देशी कट्टा व काडतुसह ताब्यात घेतले. आरोपीवर पूर्वीच बडनेरा ठाण्यामध्ये खुनाचा प्रयत्न व दुखापतीचा गुन्हा दाखल आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक गजानन सोनोने, अंमलदार दीपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, निखिल गेडाम, राजीक रायलीवाले यांनी केली.

## पेपरवर छापलेले शब्द आजही

उपस्थित होते.या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार प्रदीप देशपांडे व मीडिया वॉचचे संपादक अविनाश दुधे यांचा सन्मावस्त्र, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन व मूल्याधिष्ठित योगदानाचा गौरव यावेळी करण्यात आला.यावेळी बोलताना अविनाश दुधे यांनी आजच्या पत्रकारितेची विदारक स्थिती अत्यंत परखड शब्दांत मांडली. 'पत्रकारिता हा आता समाजसेवेचा नव्हे तर व्यवसायाचा विषय बनला आहे. मालकांच्या हितसंबंधांना धक्का न लागेपर्यंतच संपादक व पत्रकार काम करू शकतात. त्यामुळे निष्ठा व मूल्यांची किंमत उरलेली नाही,' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शेतकरी आत्महत्या, कुपोषण यांसारख्या संवेदनशील विषयांपेक्षा महसूलाला प्राधान्य दिले जात असल्याने संपादकांचे अवमूल्यन होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दुधे पुढे म्हणाले की, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर हे केवळ पत्रकार नव्हते, तर समाजसुधारक होते. महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता ही समाजहिताची नैतिक जबाबदारी जपणारी होती. आजच्या व्यावसायिक पत्रकारितेला त्यांच्या पंक्तीत बसवणे योग्य ठरणार नाही. सोशल मीडिया मेंदूला गुलाम बनवत असून पत्रकारितेची वाटचाल अधिक कठीण झाल्याचेही त्यांनी सांगितले. अशा परिस्थितीत समाजातील मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करून चिरस्थायी व मूल्याधिष्ठित पत्रकारिता करण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा मोहिनी इंद्रनील नाईक होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी पत्रकारांचा गौरव करत पुसदच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगितले. पत्रकारांनी समाजाला योग्य दिशादर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत पत्रकार भवन उभारणीसाठी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

या कार्यक्रमास पुसद पत्रकार संघाचे अध्यक्ष ललित सेता, माजी अध्यक्ष दिनकर गुल्हाने, रवी देशपांडे, अखिलेश अग्रवाल, अनिल चेंडकाळे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्नीचा अधिकार असतांना

मूल्यांचा सन्मान करणारा नव्या जबाबदारीची जाणीव करून देणारा व सौंदर्याचे वातावरण निर्माण करणारा असतो मात्र या सोहळ्यात नगराध्यक्ष मंदाकिनीताई भारसाकळे यांचे पती सुधाकर भारसाकळे यांनी केलेल्या वक्तव्यामुळे कार्यक्रमाचे गांभीर्य बाजूला पडले . प्रशासकीय अधिकाऱ्यांना उद्देशून वापरलेली भाषा ही सत्तेच्या अहंकाराचे घटक असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे.नगराध्यक्ष मंदाकिनीताई भारसाकळे या स्वतः एक लोकनिर्वाचित प्रतिनिधी असून नगरपरिषदेतील सर्व निर्णय अधिकार व कारभार त्यांच्या माध्यमातून चालविला जाणे असे अपेक्षित आहे. अशा परिस्थितीत पदावर नसलेल्या व्यक्तीकडून विशेषतः कौटुंबिक नातेसंबंध असलेल्या व्यक्तीकडून अधिकाऱ्यावर दबाव टाकण्याचा किंवा त्यांना जाहीरपणे धारेवर धरण्याचा प्रयत्न होणे हे लोकशाही व्यवस्थेला शोभणारे नाही.अशीही टीका होत आहे. शहरातील प्रतिष्ठित नागरिक सामाजिक संघटना तसेच पत्रकार संघटना व राजकीय अभ्यासकांकडून या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त केली जात असून भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी स्पष्ट भूमिका घेण्याची गरज आहे. नगराध्यक्ष पदाचा मान राखणे तसेच अधिकाऱ्यांची मर्यादा पाळणे व प्रशासनाला स्वतंत्रपणे काम करू देणे ही आजच्या लोकशाहीची मूलभूत गरज असल्याचे मत अनेकांनीही मांडले आहे. शपथ ग्रहणाचा सोहळा हा लोकशाहीच्या वचनाचा क्षण असतो तो व्यक्तिगत वर्चस्व दाखवण्याचे व्यासपिठ ठरू नये अशी अपेक्षाही दर्यापूरकरांनी व्यक्त केली आहे. फक्त आरोप करण्यापेक्षा आरोपकर्त्यांनी तसे पुरावे शोधून जे दोषी असतील त्या दोषींवर कारवाई केली पाहिजे. तरच त्या बाबतीत शहानिशा होईल.

**प्रदीप मलिये- गटनेता, शिवसेना(शिंदे गट )**

## कार खरेदीच्या नावावर एक

फोन उचलले नाही. वारंवार फोन करूनही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आरोपी आणि विरुद्ध गाडगे नगर ठाण्यात गुन्हा दाखल केला.पोलीसानी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यात

अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. तसंच त्यांनी म्हटलं की, सत्ताधाऱ्यांचे संरक्षण असल्यामुळं गुन्हेगारांवर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळं गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळते. पत्रकार परिषदेमध्ये खासदार बळवंत वानखडे ,माजी आमदार डॉ. सुनील देशमुख,प्रा. वीरेंद्र जगताप ,शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर मिलिंद चिमोटे, हरिभाऊ मोहोड आदि उपस्थित होते.

**पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने कायदा-सुव्यवस्था बिघडली -** अंबरनाथ नगरपरिषदेत काँग्रेस-भाजपा युती झाल्याच्या चर्चांवर हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाम शब्दांत भूमिका मांडली. 'काँग्रेसचे भाजपासोबत कुठंही, कोणत्याही स्तरावर गठबंधन नाही,असं हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केलं. तसंच अशा अफवा जाणीवपूर्वक पसरवण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. याचबरोबर, देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. त्यामुळं राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने कायदा-सुव्यवस्थेची स्थिती अधिकच बिघडली आहे. गृहखात्यावर लक्ष केंद्रीत न केल्यामुळं गुन्हेगारीवर अंकुश राहिलेला नाही,असंही सपकाळ म्हणाले.

**बिनविरोध निवडणूकी बाबत नाराजी-** बिनविरोध निवडणुकांबाबत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. निर्विरोध निवडणुका होणं ही लोकशाहीची विकृती असल्याचं सांगत त्यांनी याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचं स्पष्ट केलं. 'ज्या ठिकाणी निर्विरोध निवडणुका झाल्या आहेत, त्या रद्द करून तिथं ईव्हीएमद्वारे पुन्हा निवडणूक घ्यावी आणि जनतेला मतदानाचा अधिकार मिळावा अशी ठाम मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली

## ज्या उमेदवाराच्या पाठीशी महिला

उतरलेले शिंदे सेनेच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बुधवार ७ जानेवारी रोजी अमरावतीत आले होते. सभेच्या माध्यमातून त्यांनी शिवसेनेला बुस्टर दिला. मंचावर केंद्रीय राज्यमंत्री प्रताप जाधव, राज्यमंत्री संजय राठोड, मोर्शीच्या नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने, चांदुर रेल्वेच्या प्रियंका विश्वकर्मा, माजी खासदार आनंदराव अडसूळ, माजी आमदार अभिजीत अडसूळ, उपनेता ज्ञानेश्वर धाने पाटील, प्रीती बंड, जगदीश गुप्ता, संजय रायमुलकर, संतोष बदरे,श्याम देशमुख आदि उपस्थित होते.

**लाडकी बहीण योजना बंद होणार नाही-** एकनाथ शिंदे म्हणाले, मी स्वत: गरिबी पाहिली आहे. एका शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. घरखर्च भागवण्यासाठी आईची तगमग, काटकसर पाहिली आहे. बहिणींना सरकारच्या माध्यमातून मदत करण्यासाठी मी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. काही लोक योजना बंद पाडण्यासाठी न्यायालयात गेले. खोडा घातला, त्यात आडवे पडले. या योजनेत खोडा घालणाऱ्यांना लाडक्या बहिणींनी जोडा दाखवला आणि घरी बसवून दिले. म्हणून कुणीही आला, तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. हा तुमच्या भावाचा शब्द आहे. जे बोलतो, ते करतो आणि जे नाही बोलत ते पण करतो. कमी बोलतो जास्त काम करतो. अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामांचे मंदिर साकार झाले, बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न साकार झाले.

**आम्ही सर्वसामान्यांचा विचार करणारे -** उपमुख्यमंत्री म्हणाले, शिवसेनेला काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचा प्रयत्न सुरू असतांना उठाव करणारा भाऊ या महाराष्ट्राने, देशाने पाहिला. लोकांनी देखील स्वीकारला. म्हणून लोकसभेत, विधानसभेत आपला 'स्ट्राईक रेट' चांगला आहे. नगरपालिका निवडणुकांमध्ये आपले ७० नगराध्यक्ष निवडून आले आहेत. कमी जागा लढलो, तरी जास्त जागांवर निवडून आलो. मला काय मिळाले, यापेक्षा सर्वसामान्य लोकांना काय मिळाले, याचा विचार करणारे आम्ही लोक आहोत.

**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे वर टीका** एकनाथ शिंदे यांनी यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा मुख्यमंत्री का होऊ शकत नाही. मी झालो. पण, ही पोटदुखी कशासाठी, एवढा द्वेष, मत्सर का, असा प्रश्न मला पडतो. पहिल्या दिवसापासून मुख्यमंत्री जाणार, घटनाबाह्य मुख्यमंत्री असे ते बोलत गेले. आता अडीच वर्षे झाली आहेत. आताही तोच त्यांचा पाढा वाचणे सुरू आहे. पण, हजारो, लाखो लोक या शिवसेनेत येत आहेत. प्रवाहात सामील होत आहेत. सर्वसामान्यांच्या आयुष्यात सोन्याचे दिवस आले पाहिजेत, हा आमचा ध्यास आहे. त्यावेळी शिंदे सेनेचे सर्व उमेदवारांसह मोठया संख्येने पदाधिकारी-कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## अंबापेठ परिसरात नियमभंग

नियमभंगाबद्दल संबंधित आस्थापना धारकावर रु. ५,००० इतकी दंडात्मक कारवाई तात्काळ करण्यात आली.सदर कारवाईमध्ये ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ निरीक्षक प्रशांत गावनेर, मिथुन उसरे तसेच अतिक्रमण प्रमुख योगेश कोल्हे उपस्थित होते. महानगरपालिका प्रशासना मार्फत शहर स्वच्छता राखण्या साठी अशा प्रकारच्या तपासण्या व कठोर कारवाया पुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नागरिकांनी व व्यावसायिक आस्थापनांनी स्वच्छतेचे नियम पाळून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आयुर्वेदिक औषध व डिझेल

सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. साक्षी व सादर पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध होत असल्याचे न्यायालयाने निरीक्षण नोंदविले. न्यायालयाने निकालात नमूद केले की, आरोपीच्या कृत्यातून हेतुपुरस्सर व अप्रामाणिक उद्देश स्पष्ट होतो. हा मालकाच्या विश्वासाचा गंभीर भंग असल्याने केवळ सौम्य शिक्षा देणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे आरोपीस शिक्षा सुनावण्यात आली. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता ज्वाला जामनेकर यांनी कामकाज पाहिले. तर या प्रकरणात पैरवी अधिकारी बाबाराव मेश्राम, सी.एम.सी. पोलीस कॉन्स्टेबल निलेश बावनथडे व पोलीस कॉन्स्टेबल संदीप मेश्राम यांनी सहकार्य केले.

## महापालिका निवडणूक : ८ जानेवारीला

योग्य जनजागृती होण्यास मदत होणार आहे.

तरी अमरावती शहरातील सर्व माध्यम प्रतिनिधी व इच्छुक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महापालिका धुमशान

## भाजपा सावधान मोडवर :शिंदे सेना ॲक्शन मोडवर

लोकसभेत विश्वास दर्शक प्रस्तावाच्या दरम्यान १९९६ मध्ये तेरा दिवसांच्या सरकारचा राजीनामा देण्यापूर्वी तत्कालिन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी चार ओळी ची एक कविता संसदेच्या सभागृहात सादर केली होती.

**'सत्ता का खेल तो चलेगा,**
**सरकारें आएंगी-जाएंगी,**
**पार्टियां बनेंगी-बिगड़ेंगी,**
**मगर यह देश रहना चाहिए,**
**इस देश का लोकतंत्र अमर रहना चाहिए।'**

तर वाजपेयींच्या पावलावर पाऊल ठेवत पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी २०१४ च्या निवडणुकीत लोकसभा निवडणुकीत देशाच्या संरक्षणाला प्राथमिकता देत चार ओळींचे काव्य सादर केले होते.

**'सौगंध मुझे इस मिट्टी की,**
**मैं देश नहीं मिटने दूंगा,**
**मैं देश नहीं रुकने दूंगा, मैं देश नहीं झुकने दूंगा।**
**मेरा वचन है भारत माँ को,**
**तेरा शीश नहीं झुकने दूंगा...'**

या दोन्ही पंतप्रधानांच्या काव्यपंक्ती ची आठवण याकरिता झाली कि अमरावती महापालिकेच्या निवडणुकीत या काव्यपंक्तीचे प्रतिबिंब दिसले. भाजपाच्या पंतप्रधानांचे विचार भाजपाच्या निष्ठावान नेत्यांमध्ये किती खोलवर रूजले आहेत याची प्रचिती आली. अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूकित भाजपा आणि युवास्वाभिमान पक्षाची युती कोणकोणत्या प्रभागात आहे? आणि कोणी कोणाला पाठिंबा कुठे दिला? हे समजायला मार्ग नाही अशी कार्यकर्त्यांची आणि मतदारांची परिस्थिती आहे. अशातच भाजपाच्या स्टार प्रचारक असलेल्या नवनित राणा यांनी साईनगर प्रभागात




भाजप उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढविणाऱ्या युवास्वाभिमान च्या उमेदवाराच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले. उद्घाटन करण्यापुर्वी नवनित राणा ह्या मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्या सोबत रोड शो मध्ये सहभागी होत्या. तर मोरबाग मध्ये भाजपाच्या चार उमेदवाराच्या पॅनल मध्ये भाजपाच्या एका उमेदवाराला डावलून भाजपाच्या चार उमेदवाराच्या पॅनल मध्ये चौथा उमेदवार म्हणून युवास्वाभिमान चा उमेदवार असल्याचे जाहिर केले. नवनित राणा यांच्या या कृतीमुळे भाजपाचे कार्यकर्ते व्यथित झाले. दुखी झाले. झालेल्या प्रकाराबद्दल नागपुर मुंबई आणि दिल्ली पर्यंत कानाफुसी झाली. पण झालेल्या या सर्व प्रकाराबद्दल भाजपाने अत्यंत सावध भुमिका घेतली. अमरावती चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आज अमरावतीत होते. या दरम्यान पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना बावनकुळे यांनी पक्ष संघटनेला महत्व देत भाजपाच्या कार्यकर्त्यांचीच समजूत काढली. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांचे चिन्ह कमळ आहे आणि कमळापुढे दुसऱ्या कोणत्याही प्रकाराचा विचार करायचा नाही असे सुचित केले. नवनित राणा यांच्या संदर्भात कोणतीही टिका टिप्पणी न करता बावनकुळे यांनी भाजपाची पडती बाजू सांभाळून घेत सावरले. तर भाजपाचे खासदार डॉ अनिल




बोंडे यांनी एक व्हिडिओ सोशल मिडीयावर प्रसारीत करून भाजपाच्या कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावण्याचा प्रयत्न केला. बोंडे यांच्या आवाहनानुसार, अमरावती महानगरपालिकेच्या निवडणूकीत भाजपाच्या उमेदवारांची निवड ही मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविन्द्र चव्हाण यांच्या संम्मतीने केली आहे. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर आणि अमरावतीच्या विकासाच्या मुद्यावर अन्य कुठेही लक्ष देऊ नका आणि संभ्रमित होऊ नका. एखाद्या समाजाला दोषी ठरविणे आणि एखाद्याला गद्दार संबोधणे हे योग्य नाही यावरही डॉ बोंडे यांनी लक्ष वेधले. हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजपमध्ये फुट पाडू नका. थोडक्यात काय तर,

**'हम रहे ना रहे यह देश रहना चाहिये'**

झालेल्या प्रकारामुळे भाजपाला आपले कार्यकर्ते गमवायचे नाही तर नवनित राणा यांच्यासारख्या कट्टर हिंदुत्ववादी नेत्री ला सुध्दा दुखवायचे नाही. भाजपसाठी कार्यकर्ते आणि नेते किती महत्वाचे आहे? हे कधी कधी एखादवेळेस का होईना पण भाजप नेत्यांच्या कृतीतून दिसतंय हे महत्वाचे आहे. पण आज दिवसभर झालेल्या घडामोडींचा आढावा घेतला असता हेच दिसतं की भाजपाने अगदी सावध भुमिका घेतली आहे. नेत्यांना ही दुखवायचं नाही आणि कार्यकर्ते ही सांभाळायचे अशा सावधान मोडवर भाजपा आली आहे..

**जाता जाता...**

अमरावती महानगर पालिकेच्या निवडणूक प्रचाराकरिता शिवसेना शिंदे गटाने बुधवारी (दि ७)नेहरू मैदानावर जाहिर प्रचार सभा घेतली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभेला संबोधित केले. पण जाहिर सभेला येण्यापूर्वी एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेवर नाराज असलेले जगदीश गुप्ता यांची भेट घेतली. गुप्ता यांनी शिवसेनेवर नाराजी व्यक्त करीत नुकताच राजीनामा दिला होता. मात्र जगदीश गुप्ता यांच्या सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात जाऊन एकनाथ शिंदे यांनी त्याच्यासोबत बंदद्वार चर्चेत मनधरणी केली आणि नाराज असलेले जगदीश गुप्ता पुन्हा शिवसेनेत परतले. मनपा निवडणुकीत शिंदे सेना आता 'अॅक्शन मोडवर' आली आहे. कोणत्याही नेत्याला कार्यकर्त्यांला नाराज न करता प्रचारावर जोर देण्याची शिवसेनेची रणनिती लपलेली नाही.


## जाहीर नोटीस

प्रो.नं. ३३/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.०७/०१/२०२४

**वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.४५६/२०२५ ने.ता.०९.०१.२०२६

**अर्जदार -**
१. **सविता चंदन गिरी,** वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम
रा.साने गुरुजी नगर नं.१, अकोली रोड, साईनगर, अमरावती
ता.जि.अमरावती
२. **मिनाक्षी ज्ञानदेव पुरी,** वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
रा. बिडी, ता.लोणार, जि.बुलढाणा

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार-**
१. **शितल अतुल पुरी,** वय ४० वर्षे, धंदा - घरकाम
२. **वेदिका अतुल पुरी,** वय १९ वर्षे, धंदा - घरकाम
३. **मृदुला अतुल पुरी,** वय १२ वर्षे, धंदा - शिक्षण
अ.पा.क. आई शितल अतुल पुरी
सर्व रा.पुंडलिक नगर, अमर कॉलनी, दस्तुरनगर, अमरावती
ता.जि.अमरावती

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **ज्ञानदेव महादेव पुरी** हे दिनांक **२२.०८.२०२४ रोजी मरण पावले आहेत.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - ज्ञानदेव महादेव पुरी** यांचे नावे मौजा म्हैसपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट क्र.१, ० हे ७६ आर, आ.रु. ३.८३ येणे प्रमाणे शेत व मौजा म्हैसपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील ग्रा.प. म्हैसपुर (मोचर्डा) अंतर्गत अ.क्र.४३,मालमत्ता क्र.४३, क्षेत्रफळ ११६० चौ.फुट यावर बांधलेले घर व काही खुली जागा येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर दोन्ही मिळकतीची बाजारभाव किंमत ३०,००० रु. आहे.

आज दि.०३.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का
**सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**
दिवाणी न्यायालय व.स्तर , दर्यापूर

## जाहीर सुचना

सर्व आम जनतेस सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री भूषण जगन्नाथ उर्फ जगन्नाथराव मेश्राम, रा.साई मंदिर, प्रफुल्ल कॉलोनी, ता.जि.अमरावती** यांचे पासून त्यांचे एकमेव मालकीचे व ताब्यातील खालील वर्णाकित स्थावर मालमत्ता (खुले प्लॉट) विकत घेण्याचा सौदा केला असून त्याबाबत इसार चिठठी केली असून लवकरात लवकर खरेदीखत नोंदवून घेणार आहे, त्या स्थावर मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे -

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

अमरावती महानगरपालिकेच्या हद्दीतील व सहदुय्यम निबंधक, अमरावती यांचे कक्षेतील मौजे-आकोली, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे क्र. व उपविभाग १३/१/अ मधील शेतजमीन रा.म.क्र./एन.ए.पी-३४/ अकोली-६६९/२०२१-२२ मा.तहसिलदार,अमरावती यांचे आदेश दिनांक १९/०७/२०२२ नुसार अकृषक झालेली जमिनीतील खालील वर्णनांकित पांच प्लॉट (५) (खुले प्लॉट) असून त्याचे वर्णन येणेप्रमाणे-

(अ) प्लॉट क्र.१३/१अ/३६ एकुण क्षेत्रफळ ०.९६ चौ.मी.
(ब) प्लॉट क्र.१३/१अ/३७ एकुण क्षेत्रफळ ८५.६० चौ.मी.
(क) प्लॉट क्र.१३/१अ/३८ एकुण क्षेत्रफळ ९२.८० चौ.मी.
(ड) प्लॉट क्र.१३/१अ/३९ एकुण क्षेत्रफळ ०९१.२० चौ.मी.
(ई) प्लॉट क्र.१३/१अ/४० एकुण क्षेत्रफळ ०९१.२० चौ.मी.

**चतुःसीमा मध्ये या ले ऑउट मधील इतर प्लॉट व रोड आहे.**

जर कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा वारस व इतर हक्काने या मालमत्तेवर कोणाचाही कोणताही संबंध असेल किंवा कोणाचेही कोणतेही सावकारी, सरकारी, निमसरकारी, खाजगी कर्ज, अधिकार, हक्क,बोजा, गहन, हित,ताबा, बक्षिस, वाद-विवाद, न्यायालयीन प्रकरण वगैरे काही असेल त्यांनी सदरहू जाहीर नोटीस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाचे खालील दिलेल्या पत्यावर सर्व दस्तऐवजांसह लेखी स्वरुपामध्ये कळवावे.

दिनांक ११/०१/२०२६ पर्यत जर कोणीही कोणतीही हरकत किंवा आक्षेप सादर न केल्यास माझे पक्षकार हे दिनांक ११/०१/२०२६ रोजी किंवा त्यानंतर वरील वर्णाकित मालमत्तेसंबंधी खरेदीखत नोंदवून घेणार, तसेच हा व्यवहार पूर्णपणे वैध खरेदीखताचा व्यवहार आहे. दिनांक ११/०१/२०२६ नंतर कोणाचीही कोणतीही उजर वगैरे चालणार नाही व त्याकरिता माझे पक्षकार हे खरेदीखत नोंदवून घेतल्यानंतर जबाबदार राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

करिता सदरहू जाहीर नोटीस.

**दिनांक - ०८.०१.२०२६**

**संपर्क**
**ॲड.दिपक एस.चौधरी (जैन)**
**ॲडव्होकेट ॲन्ड नोटरी**
**मातृ-स्नेह, सत्यनारायण मंदिर जवळ,**
**रंगारी गल्ली, ता.जि.अमरावती**
**मो.क्र.९७६६४९१४४८**

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ८ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अतिक्रमणाला अर्थपूर्ण संबंधांचे पाठबळ?

## ■ गावठाण हद्दीत घुसखोरी, चौकशी अहवाल मागविला
## ■ जिल्हाधिकारी ( गृह शाखा) कार्यालयाने घेतली दखल

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील ' पोखरा ' प्रकरण संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला आहे. त्यातच आता गावठाण हद्दीत अतिक्रमण करून खोदलेल्या विहिरीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. पोकरातील गैरव्यवहार आणि अतिक्रमित विहीरीच्या नावावर शासनाच्या विविध कृषी योजनांचा घेतलेला लाभ याबाबत वरिष्ठ स्तरावर गावातून तक्रार दाखल करण्यात आली होती.**

सदर तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालय ( गृह शाखा ) यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो आणि जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून पुढील योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात एक पत्र दिले आहे. सदर पत्र तक्रारदार यांना सुद्धा मिळाले असल्याची माहिती समोर येत आहे.

रिसोड तालुक्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना अर्थात पोखरा योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या बाबत शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधान सचिव मुंबई व जिल्हाधिकारी वाशिम यांच्यासह कृषी संचालक, सहसंचालक यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. सदर प्रकरणाची जिल्हास्तरावरून प्राथमिक चौकशी सुरू झाली असून तपास अधिकारी तथा तंत्र अधिकारी अनिल राठोड यांनी गट नंबर ६०२ व गट नंबर ६३३ मधे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली आहे. तक्रारीत नमूद करण्यात आलेल्या मुद्द्यांची बारकाईने पाहणी केली आहे. त्याबाबतचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती संबंधितांनी दिली आहे. सदर तक्रारीसोबतच शेलुखडसे येथील गट नंबर ६०२ मधील एक विहीर गावठाण हद्दीत असल्याची सुद्धा तक्रार करण्यात आली होती. परंतु विशेष बाब म्हणजे सदर विहीर गावठाण हद्दीत अतिक्रमित असून देखील खाजगी सात बारावर कशी ? हा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. शिवाय या अतिक्रमित विहीरीच्या नावावर शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्यात आला असून या गुंतागुंतीच्या गंभीर प्रकाराची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

या बाबत जिल्हाधिकारी कार्यालय, गृह शाखा वाशिम यांनी उपजिल्हाधिकारी रोहयो व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना कक्ष - ८/निवेदन/गृह/मह.सहा./कावि - १०३०/२०२५ पत्र दिले आहे. सदर पत्रसोबत प्राप्त झालेल्या निवेदनाची सहप्रत जोडून संदर्भांकित विषयाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा असे कळविण्यात आले आहे.

# विकासकामांच्या जोरावर भाजपाचा प्रचार वेगात

## मनपा निवडणुकीत भाजप–राष्ट्रवादी युतीला विजयी करण्याचे आमदार रणधीर सावरकर यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहराच्या सर्वांगीण विकासात भारतीय जनता पक्षाने मोलाची भूमिका बजावली असून भूमिगत गटार योजना, अद्ययावत नगरपालिका इमारत, मेन हॉस्पिटल, सुसज्ज मेडिकल कॉलेज, लेडी हार्डिंग रुग्णालय, आंतरराष्ट्रीय दर्जाचे 'गुड मॉर्निंग' तरण तलाव, क्रीडा व सांस्कृतिक भवन, एचडीओ व तहसील कार्यालय, अमृत योजनेतून पेयजल सुविधा, शहरातील दहा पाण्याच्या टाक्या, ई-सिटी बस प्रकल्प तसेच कचऱ्यापासून खतनिर्मिती करणारा कारखाना उभारण्याचे काम भाजपाच्या माध्यमातून झाले आहे, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी केले.



कोठारी वाटिका क्रमांक दोन, मलकापूर, सोमठाणा, गजानन नगर, प्रभाग क्रमांक १४ परिसरात राबविण्यात आलेल्या जनसंपर्क अभियानात ते बोलत होते. स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्यानंतर अकोला शहरासाठी सर्वाधिक निधी देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असून त्यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका हद्दवाढीतील २४ गावांचे महानगरात रूपांतर करण्यात आले, असेही आमदार सावरकर म्हणाले. हद्दवाढ क्षेत्रासाठी १३८ कोटी रुपयांचा निधी देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले असून त्यांनी आतापर्यंत दिलेले सर्व शब्द पूर्ण केल्याचेही त्यांनी नमूद केले. आगामी महानगरपालिका निवडणुकीत भाजप व राष्ट्रवादी युतीच्या प्रत्येक उमेदवाराला विजयी करण्यासाठी मतदारांनी भाजपाच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, असे आवाहन आमदार सावरकर यांनी केले. दरम्यान, 'मतदार राजा' हा केंद्रबिंदू मानून विकासाचा संकल्प भाजपाने सातत्याने मांडला असल्याचे खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मिळालेला निधी अकोला शहराच्या विकासासाठी उपयोगात आणला जात असून केंद्र व राज्यात भाजपाचे सरकार असल्यामुळे कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता भाजपाला विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. ग्रामसेवक राजेश्वर परिसर, मंदिर परिसराचा विकास, ज्येष्ठ नागरिक व मातृशक्तीसाठी योजना तसेच अभ्यासिका उभारणीसाठी भाजपाला संधी देण्याची मागणी त्यांनी केली. या प्रचारात विजय अग्रवाल, जयंत मसने, कृष्णा शर्मा, सौभाग्यवती सुवासिनीताई धोत्रे, अर्चनाताई शर्मा, अर्चनाताई मसने, चंदाताई शर्मा यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. भाजपाने यंदा प्रचाराचे नवे प्रयोग सुरू केले असून मतदारांशी थेट संवाद, प्रश्नोत्तरे, ठिकठिकाणी जादूचे प्रयोग, व्हिडिओ गाडी, तसेच प्रत्येक प्रभागात प्रभारी नेमून नियोजनबद्ध प्रचार केला जात आहे. विविध समित्यांच्या माध्यमातून काम सुरू असून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री ॲड. आकाश कुंडकर यांच्या बैठका तसेच विविध क्षेत्रांतील नागरिकांशी संवाद साधण्याचा अभिनव उपक्रम भाजपाने हाती घेतला आहे.

जनतेच्या विचारांचा आदर ठेवत 'मतदार राजा' हाच लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा घटक असल्याचे मानून त्याच्या मताला प्राधान्य देण्याचा निर्धार भाजपाने केला असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# पक्षनिष्ठेची दखल, अन्याय असूनही निष्ठा अढळ - रमेश गायकवाड



■ प्रतिनिधी | अकोला ■

'मी एक सामान्य शिवसैनिक असलो तरी माझ्या एकनिष्ठ कार्याची दखल घेऊन मा. मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी कौतुकाची थाप दिली. तो क्षण आयुष्यभर विसरता येणार नाही,' अशी भावनिक प्रतिक्रिया शिवसेना अकोला शहरप्रमुख रमेश गायकवाड यांनी व्यक्त केली.

अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना गायकवाड यांनी उमेदवारी नाकारण्यात आल्याबद्दलची खंत व्यक्त केली. भाषावाद व अंतर्गत राजकारणामुळे आपल्यावर अन्याय झाला, असे सांगतानाच, तरीही आपण पक्षाशी एकनिष्ठ राहिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 'मी मूळचा शिवसैनिक आहे. अन्याय झाला तरी पक्षनिष्ठा कधीही डळमळीत होऊ शकत नाही,' असे ठाम मत त्यांनी मांडले.

पक्षात अलीकडेच दाखल झालेल्या काही नेत्यांकडून आपल्यावर अन्याय झाल्याचा आरोप करत गायकवाड म्हणाले, तरीही शिवसेनेशी नाते अखंड आहे. 'आज ज्यांनी माझ्यावर अन्याय केला, त्यांच्यामुळेच मला उमेदवारी गमवावी लागली. मात्र शिवसेनेशी असलेली निष्ठा कायम राहील,' असे त्यांनी सांगितले. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भविष्यात झालेल्या अन्यायाची दखल घेतली जाईल, असा शब्द दिल्याचे गायकवाड यांनी नमूद केले. 'शिंदे साहेबांची ती कौतुकाची थाप माझ्यासाठी मोठे बळ आहे. ती थाप माझ्या पाठीवर आणि मनावर कायमची कोरली गेली आहे,' असे भावनिक शब्दांत त्यांनी सांगितले. या रमेश गायकवाड यांनी कठीण काळात साथ देणाऱ्या सहकारी शिवसैनिक, शुभचिंतक आणि हितचिंतकांचे आभार मानत, भविष्यातही पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

# कृषी संशोधन केंद्रात शेतकरी - शास्त्रज्ञ मंच सभा व शिवार फेरी



## 'जी-राम-जी विधेयकातील तरतुदींविषयी जनजागृती'

■ प्रतिनिधी | वाशिम ■

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषी संशोधन केंद्र, वाशिम व कृषी विज्ञान केंद्र, वाशिम, कृषी विभाग व आत्मा यांच्या संयुक्त सहकार्याने शेतकरी–शास्त्रज्ञ मंच सभा व शिवार फेरी कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी कृषी संशोधन केंद्र, वाशिम येथील प्रक्षेत्रावर करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम आरिफ शहा, प्रकल्प संचालक, आत्मा अनिसा महाबळे, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, कृषी संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. बी. डी. गीते, सुविदे फाउंडेशनचे विश्वस्त संजय उकळकर, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, मत्स्य विभागाच्या सौ. झापे, तसेच प्रगतशील शेतकरी दिलीप फुके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

स्वागतानंतर प्रास्ताविकात डॉ. बी. डी. गीते यांनी शेतकरी–शास्त्रज्ञ मंच उपक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करत कृषी विद्यापीठामार्फत शिफारस करण्यात आलेल्या खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांच्या उत्पादनवाढीसाठीच्या आधुनिक व शाश्वत तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी फळबाग तज्ज्ञ श्री. निवृत्ती पाटील यांनी संत्रा बाग व्यवस्थापनातील शास्त्रीय बाबी, चालू हंगामात बागेत आढळणाऱ्या समस्या व त्यावरील तांत्रिक उपाय याविषयी सखोल माहिती देऊन शेतकऱ्यांच्या शंकांचे समाधान केले. तसेच कीटकशास्त्रज्ञ राजेश डवरे यांनी जैविक निविष्ठांचा शास्त्रोक्त व परिणामकारक वापर यावर मार्गदर्शन केले. सुविदे फाउंडेशनचे विश्वस्त श्री. संजय उकळकर यांनी ग्रामीण युवकांनी शेती क्षेत्रात सक्रिय सहभाग घ्यावा यासाठी जैविक, पर्यावरणपूरक व शाश्वत शेती पद्धती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करून शेतकऱ्यांनी शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शेती करण्याचे आवाहन केले. प्रगतशील शेतकरी श्री. दिलीप फुके यांनी त्यांच्या शेतातील नाविन्यपूर्ण प्रयोगांची माहिती देत चिया पिकासारख्या नव्या पिकांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शासकीय यंत्रणांचे आभार मानले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देत, शेती क्षेत्रात मूलभूत बदल होत असल्याचे नमूद केले. नवीन पीक पद्धती, मूल्यवर्धन व बाजारपेठ व्यवस्थापन स्वीकारून दरडोई उत्पन्न वाढवावे, तसेच चिया पिकापासून तयार होणारे विविध पौष्टिक पदार्थ दैनंदिन आहारात समाविष्ट करावेत, असे आवाहन केले.

# मकरसंक्रांतीला पौष्टिकतेची नवी ओळख



■ प्रतिनिधी | वाशिम ■

मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर वाशिम शेतीशिल्प अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या चिया तिळगूळ, चिया चिक्की व चिया न्यूट्री बार या नाविन्यपूर्ण व आरोग्यदायी उत्पादनांचे ५ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी प्रकल्प संचालक (आत्मा) अनीसा महाबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, कृषी उपसंचालक हिना शेख, उद्योग सहसंचालक (अमरावती) निलेश निकम, तसेच जिल्हा उद्योग केंद्र वाशिमच्या महाव्यवस्थापक पूनम घुले, सीएम फेलो संकेत नरुटे यांची प्रमुख उपस्थिती होती. मकर संक्रांतीच्या पारंपरिक तीळ-गूळ खाण्याच्या प्रथेला आधुनिक पोषणमूल्यांची जोड देत, चिया बियाण्यांचा समावेश करून हे पदार्थ विकसित करण्यात आले आहेत.

## इंदोरमध्ये भव्य गुरु गोरक्षनाथ धर्मबीज महोत्सव

**वाशिम :** नाथ संप्रदायाचे आराध्य दैवत गुरु गोरक्षनाथ यांचा 'धर्मबीज महोत्सव' १९ आणि २० जानेवारी रोजी इंदोर (मध्यप्रदेश) येथे उत्साहात साजरा होणार आहे. 'नाथजोगी मराठी समाज, इंदोर' यांच्या वतीने गेल्या २६ वर्षांपासून हा सोहळा आयोजित केला जात असून, यंदाही बापट रुग्णालयामागील नवनाथ सत्संग वाटिकेत हा महोत्सव पार पडेल. डॉ. अनुराग वैद्य व डॉ. अनुपम वैद्य यांनी दिलेल्या माहितीनुसार, या महोत्सवात महाराष्ट्र, विदर्भ, गुजरात आणि राजस्थानसह देशभरातील समाजबांधव एकत्र येणार आहेत.

# पत्रकारीतेमधील मुल्यांची जपणूक करीत पत्रकारीता समृद्ध व्हावी

- जिल्हा माहिती कार्यालयातील पत्रकार दिन कार्यक्रमातील सूर
- पत्रकार दिन साजरा
- दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

पत्रकारीतेमध्ये मूल्य जोपासले गेले पाहिजे. या मूल्यांच्या बळावरच समृद्ध पत्रकारीता करता येते. पत्रकार समाजाचा पाईक म्हणून कार्य करतो. समाजातील विविध समस्यांचा विषयनिहाय उलगडा करतो. पत्रकारांच्या लेखनीमधूनच अशा विविध सामाजिक समस्यांना वाचा फोडल्या जाते. या समस्यांकडे शासन, प्रशासनाचे लक्ष जावून तिथे शाश्वत विकास घडतो, असा सूर पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात निघाला.

कै. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी काढले होते. त्यानिमित्त हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्याअनुषंगाने दि.६ जानेवारी रोजी जिल्हा माहिती कार्यालयात पत्रकार दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादनानंतर पत्रकार दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पत्रकार सर्वश्री नंदकिशोर नारे, नंदकिशोर वैद्य, सुनील गाडेकर, दत्ता महल्ले, शिखरचंद बागरेचा, अजय ढवळे, सुनील कांबळे, सुनील मिसर, संदीप पिंपळकर, विजय भांदुर्गे, विनोद तायडे, प्रताप नागरे, गजानन पवार, महादेव हरणे, यशवंत पेंढारकर, जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटुडे- राऊत यांच्यासह जिल्हा माहिती कार्यालयाचे राजू जाधव, रुपेश सवाई, प्रमोद राठोड व अनिल कुरकुटे यांच्यासह पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

## बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा तसेच प्रभात फेरीचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

बालविवाह हा एक खोलवर रुजलेला सामाजिक प्रश्न आहे जो विशेषत: मुलींच्या हक्कांवर ,आरोग्यावर आणि भविष्यावर परिणाम करतो .त्यामुळे मुलींची शिक्षण खंडित होते. मुलींना अल्पवयीन गर्भधारणा व लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागते आणि त्यांचे संपूर्ण आयुष्य प्रभावित होते .शासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नानंतरही महाराष्ट्रातील काही भागांमध्ये बालविवाहाचे प्रकार आढळतात. बालविकास अधिकारी कार्यालय यांच्या मार्गदर्शनात 'बालविवाह मुक्त महाराष्ट्र आपला-संकल्प आपला अभियान अंतर्गत 'स्त्रीमुक्ती दिनानिमित्त बालविवाह निर्मुलनाणाबाबत प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.






## वाशिम शहरातील रखडलेल्या विकास कामांबाबत ठेकेदारावर कारवाईची मागणी

# कारवाई न झाल्यास २४ जानेवारीपासून बेमुदत उपोषणाचा इशारा - राम पाटील डोरले



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सुरू असलेली अनेक विकास कामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली असून, वारंवार मुदतवाढ देऊनही संबंधित ठेकेदार कंपनीकडून कामे पूर्ण करण्यात आलेली नाहीत. याबाबत मे. अजयदिप इन्फ्राकॉन प्रा. लि., औरंगाबाद या ठेकेदार कंपनीवर तात्काळ दंडात्मक कारवाई करून काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी ठाम मागणी आम आदमी पार्टीचे नेते श्री. राम पाटील डोरले यांनी केली आहे.

सदर ठेकेदार कंपनीस सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम अंतर्गत येणाऱ्या विविध विकास कामांचा कार्यारंभ आदेश दिनांक ०४ मार्च २०२१ रोजी देण्यात आला होता. ही सर्व कामे ४०० दिवसांत पूर्ण करणे अपेक्षित असताना, आज जवळपास चार वर्षांचा कालावधी उलटून गेला तरीही केवळ ५० टक्क्यांपेक्षा कमी काम पूर्ण झाले आहे.

या दिरंगाईमुळे शहरातील रस्ते, सार्वजनिक सुविधा व इतर विकास कामे रखडली असून नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक निधीचा योग्य वापर होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असून, यामुळे शासन व प्रशासनाची प्रतिमा देखील मलीन होत आहे. ठेकेदार कंपनीकडून होत असलेला निष्काळजीपणा, कामातील दिरंगाई व कराराच्या अटींचा भंग लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार सदर कंपनीवर दंडात्मक कारवाई करून तिला काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशी मागणी श्री. राम पाटील डोरले यांनी केली आहे. या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांना लेखी तक्रार सादर करण्यात आली असून, प्रशासनाने तात्काळ ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

जर प्रशासनाकडून लवकरात लवकर कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही, तर दि. २४ जानेवारीपासून सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ४४ ■ गुरुवार, ८ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# कबड्डी मैदानात माजी सरपंचाची दादागिरी; 'भाऊ'च्या हाकेवरून तरुणाला बेदम मारहाण

## -पोलिसी भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील सुरगाव येथे माजी सरपंच व कथित वाळू तस्कर गोलू शेख याच्या वाढत्या अरेरावीमुळे सामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. किरकोळ कारणावरून झालेल्या मारहाणीच्या घटनेने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दि. ६ जानेवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास सुरगाव येथे कबड्डी सामने सुरू होते. हे सामने पाहण्यासाठी संजय कुबडे हे आपल्या वडिलांसह मैदानावर गेले होते. याचवेळी माजी सरपंच गोलू शेखही तेथे उपस्थित होता. संजयच्या वडिलांनी त्याला सवयीप्रमाणे 'गोलू भाऊ' अशी हाक मारली. यावर संजयने आपल्याच वडिलांशी, तो वयाने लहान असूनही तुम्ही त्याला भाऊ का म्हणता, असे बोलताना माजी सरपंचाने ऐकले. या संवादाचा राग येताच गोलू शेख याने संजयवर तुटून पडत लाथा-



बुक्क्यांनी जोरदार मारहाण केली.

या मारहाणीत संजयच्या नाकातून रक्तस्राव सुरू झाला असून तो गंभीर जखमी झाला. रात्रीचा वेळ तसेच सेलूपर्यंत रस्त्याचे काम सुरू असल्याने तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करता आली नाही. दुसऱ्या दिवशी, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी संजय सेलू पोलीस ठाण्यात गेला असता, माजी सरपंचाची राजकीय पकड व वाळू तस्करीतील 'चालती'मुळे तक्रार घेण्यास सुरुवातीला टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप पीडिताने केला आहे.

पोलीस अधीक्षकांकडे थेट दाद मागण्याचा इशारा दिल्यानंतर नाईलाजाने तक्रार दाखल करून घेण्यात आल्याचे संजयचे म्हणणे आहे. या प्रकरणात पोलिसांकडून पुढे ठोस कारवाई होणार की प्रकरण दबले जाणार, याकडे सुरगाव ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. गावात वाढत चाललेल्या दादागिरीमुळे कायदा सर्वांसाठी समान आहे आहे का असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# पुस्तकांपेक्षा मोठा मित्र नाही

## महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात राष्ट्रीय पुस्तक मेळावा

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ येथे चार दिवसांच्या राष्ट्रीय पुस्तक मेळाव्याचे भव्य उद्घाटन माजी केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ. रमेश पोखरियाल 'निशंक' यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. पुस्तके ही केवळ ज्ञानाची साधने नाहीत, तर ती माणसाला जीवनाचा मार्ग दाखवतात. जगात पुस्तकांपेक्षा मोठा मित्र नाही, असे प्रतिपादन त्यांनी उद्घाटनप्रसंगी केले.

विद्यापीठाचा २९ वा स्थापना दिन ७ ते १० जानेवारी २०२६ या कालावधीत साजरा होत असून, या निमित्ताने शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमांची मालिका आयोजित करण्यात आली आहे. या उत्सवाची सुरुवात कॅम्पसमधील बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन परिसरात आयोजित राष्ट्रीय पुस्तक मेळाव्याने झाली. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा होत्या.




डॉ. निशंक यांनी रिबन कापून पुस्तक मेळाव्याचे उद्घाटन केले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी समता भवन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली. यावेळी साहित्यिक डॉ. भूषण भावे व डॉ. क्षमा कौल विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. निशंक म्हणाले की, उत्तराखंड संस्कृतीचे केंद्र असेल तर वर्धा हे ज्ञान आणि चेतनेचे केंद्र आहे. संस्कृती व ज्ञान यांचा संगम झाला की नव्या विचारांचा जन्म होतो. हिंदी विद्यापीठाने केवळ देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी नियमित लेखन करावे, डायरी ठेवावी आणि हस्तलिखित शब्दाच्या अमरत्वाची जाणीव ठेवावी, असे आवाहन त्यांनी केले.

गांधी-विनोबांच्या कर्मभूमीतील ऊर्जा आजही समाजाला दिशा देत असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा यांनी सर्व पाहुणे, शिक्षक, विद्यार्थी व वर्धावासीयांचे स्वागत केले. छापील पुस्तकांचे अस्तित्व कधीही संपणार नाही, असे ठामपणे सांगत विद्यार्थ्यांच्या अफाट क्षमतेचा सकारात्मक उपयोग होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

ज्येष्ठ पत्रकार व शिक्षणतज्ज्ञ डॉ. गोविंद सिंह यांनी हिंदी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला. तर ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेंद्र दुबे यांनी समाज हळूहळू पुस्तकांपासून दूर जात असल्याची खंत व्यक्त करत तरुणांना अधिकाधिक वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले.

पुस्तक मेळाव्यात वाणी प्रकाशन, रावत प्रकाशन, प्रभात प्रकाशन, साहित्य अकादमी (मुंबई), नई किताब, राष्ट्रीय भाषा प्रचार समिती तसेच विद्यापीठ प्रकाशनांचे स्टॉल्स आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे आभार कुलसचिव डॉ. कादर नवाज खान यांनी मानले, तर सूत्रसंचालन डॉ. संदीप मधुकर सपकाळे यांनी केले.

# गोडावूनमधून नोकरानेच पळविले इलेट्रॉनिक साहित्य; ४.८६ लाखांचा अपहार उघड

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्राम येथील एमआयडीसी परिसरात असलेल्या गोडावूनमधून विश्वासातला नोकरच एलईडी टीव्ही व होमथिएटरसह लाखोंचे इलेट्रॉनिक साहित्य पळवित असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दुकानदार सूरज बलवाणी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सेवाग्राम पोलिस ठाणे येथे नोकर अभिषेक बुद्धे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

झुलेलाल कॉलनी येथील सूरज बलवाणी (वय ३३) यांचे शहरातील बडे चौक परिसरात मनीषा इलेट्रॉनिक्स नावाचे दुकान आहे. बलवाणी यांच्याकडे सोनी कंपनीची अधिकृत डिलरशिप असून एल.जी., हायर, डायकिन, आय.एफ.बी. आदी नामांकित कंपन्यांची डिस्ट्रीब्युटरशिपही आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर इलेट्रॉनिक साहित्य साठविण्यासाठी त्यांनी सेवाग्राम येथील एमआयडीसीमध्ये स्वतंत्र गोडावून ठेवले आहे.

या गोडावूनमध्ये म्हसाळा येथील अभिषेक बुद्धे हा नोकर म्हणून काम करत होता. दरम्यान, १७ डिसेंबर रोजी सूरज बलवाणी यांनी गोडावूनमधील इलेट्रॉनिक साहित्याची आवक-जावक नोंद, पर्चेस बिले तसेच प्रत्यक्ष साठ्याची तपासणी केली. तपासणीदरम्यान एल.जी. कंपनीचा ५५ इंची टीव्ही, सोनी कंपनीचे ५५ इंची दोन एलईडी टीव्ही, सोनी कंपनीचे ४३ इंची चार एलईडी टीव्ही तसेच एल.जी. कंपनीचा एक होमथिएटर असा एकूण ४ लाख ८६ हजार ६९० रुपयांचा माल गोडावूनमधून गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

यानंतर बलवाणी यांनी अंतर्गत चौकशी केली असता, हा सर्व माल नोकर अभिषेक बुद्धे यानेच परस्पर काढून नेल्याचा संशय बळावला. या प्रकारामुळे बलवाणी यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले असून त्यांनी तात्काळ सेवाग्राम पोलिस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दिली.

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अभिषेक बुद्धे याच्याविरुद्ध अपहाराचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. गोडावूनमधील साहित्य नेमके कुठे विकले किंवा साठविले आहे, याचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे.

# कारंज्यात भरदिवसा चोरी; ४० हजार रुपये हिसकावले, शहरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**कारंजा (घा.) जनमाध्यम :** कारंजा शहरातील सुरक्षा प्रकरण पुन्हा चर्चेत आले आहे. चार महिन्यांपूर्वी रस्त्यावरून ३ लाख रुपये लंपास करणाऱ्या चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नसताना, आज ७ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता धनराज भांगे (७०) यांच्या हातून ४० हजार रुपये चोरीला गेले.

माहितीनुसार, धनराज भांगे यांनी भारतीय स्टेट बँक, कारंजा शाखेतून पैसे काढले आणि वीज बिल भरण्यासोबत भाजीपाला खरेदी करून पंचायती चौकातून पायी घरी जात असताना, दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांच्या हातातील पिशवी हिसकावली आणि धूम ठोकली. ही घटना शहराच्या मुख्य चौकात, तीही भरदिवसा घडल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. घटनास्थळी पोहोचून धनराज भांगे यांनी ताबडतोब पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा नोंदविला असून, चौकशी सुरू आहे. शहरातील नागरिकांचा विश्वास आहे की, मादक पदार्थांच्या घटनेनंतर पोलीस निरीक्षकांनी पदभार स्वीकारल्यानंतर गुन्हेगारीवर अंकुश बसेल.

शहरातील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या या घटनेमुळे नागरिकांना मोठा धक्का बसला आहे. चार महिन्यांपूर्वी ३ लाख रुपये रस्त्यावरून लंपास झालेल्या प्रकरणातील चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नसताना, आज पुन्हा अशा प्रकारची घटना घडल्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर देखील प्रश्न उपस्थित झाला आहे.

शहरातील नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे त्वरित कारवाईची मागणी केली असून, अशा प्रकारच्या घटनांपासून बचावासाठी सुरक्षा उपाययोजनांचा आग्रह व्यक्त केला आहे.

# समृद्धी महामार्गावर 'हायटेक' ट्रॅफिक व्यवस्थेचा टप्पा; ९ ते १३ जानेवारी दरम्यान गॅन्ट्री उभारणीसाठी ठरावीक वेळेत वाहतूक बंद

**वर्धा जनमाध्यम :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक व्यवस्थेच्या अधिक प्रभावी नियंत्रणासाठी हायवे ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत गॅन्ट्री (उँईहूब) उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या महत्त्वपूर्ण कामासाठी दि. ९ ते १३ जानेवारी या कालावधीत काही ठरावीक ठिकाणी ४५ ते ६० मिनिटांसाठी महामार्गावरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने दिली आहे.



समृद्धी महामार्गावरील अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे तसेच नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील कि.मी. ९०३५०० ते १५०३३०० या टप्प्यात गॅन्ट्री उभारणीचे काम दहा टप्प्यांत करण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यात संबंधित मुंबई किंवा नागपूर वाहिनीवरील वाहतूक काही काळासाठी पूर्णतः थांबविण्यात येईल. काम पूर्ण होताच वाहतूक तत्काळ पुन्हा सुरू करण्यात येणार आहे.

कामाच्या नियोजनानुसार, दि. ९ जानेवारी रोजी चांदूर रेल्वे तालुक्यातील मांजरखेड व धोत्रा गावाजवळ मुंबई वाहिनीवर दुपारी ३ ते ४, तर मांजरखेडजवळच नागपूर वाहिनीवर दुपारी १२ ते १ वाजेदरम्यान वाहतूक बंद राहील. दि. १० जानेवारी रोजी धामणगाव तालुक्यातील वाढोणा गावाजवळ नागपूर वाहिनीवर दुपारी ३ ते ४, तसेच चांदूर रेल्वे तालुक्यातील खंबाळा गावाजवळ मुंबई वाहिनीवर दुपारी १२ ते १ वाजेदरम्यान ब्लॉक राहणार आहे.

दि. १२ जानेवारी रोजी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शहापूर खेकडी व पाचोड गावांजवळ नागपूर वाहिनीवर दुपारी ३ ते ४ वाजेदरम्यान वाहतूक बंद राहील. तर दि. १३ जानेवारी रोजी देऊळगाव व शहापूर खेकडी गावांजवळ मुंबई वाहिनीवर दुपारी १२ ते १, तसेच देऊळगावजवळ नागपूर वाहिनीवर दुपारी ३ ते ४ वाजेदरम्यान ब्लॉक राहणार आहे.

या कालावधीत महामार्गावरील वाहतूक पूर्णतः थांबविण्यात येणार असल्याने प्रवाशांनी प्रवासाचे योग्य नियोजन करावे, पर्यायी मार्गांचा विचार करावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जनसंपर्क विभागाने केले आहे.

# पोलीस वर्धापन सप्ताहात विद्यार्थ्यांचा महासागर

## -१८ शाळा-महाविद्यालयांचे २२०० विद्यार्थी प्रदर्शनीत सहभागी

**वर्धा जनमाध्यम :** पोलीस स्थापना दिनानिमित्त वर्धा पोलिसांच्या वतीने पोलीस वर्धापन सप्ताह साजरा करण्यात येत असून, त्या अनुषंगाने पोलीस मुख्यालय मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य पोलीस प्रदर्शनीस उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मंगळवारी तब्बल १८ शाळा-महाविद्यालयांतील २२०० विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीला भेट देत पोलिसांच्या कार्यपद्धतीची सखोल माहिती घेतली.

या प्रदर्शनीत पोलीस विभागाच्या १० विविध शाखांचे स्वतंत्र स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना पिस्टल, रिव्हॉल्व्हर, AK-47, AK-56, SLR रायफल, कार्बाईन, मशीनगन, हँड ग्रेनेड, दारुगोळा यांसारखी अत्याधुनिक शस्त्रे जवळून पाहण्याची संधी मिळाली. पोलिस मुख्यालयातील शिस्त, सन्मान व कार्यपद्धती पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल व आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

क्राईम सीन व्यवस्थापन, घटनास्थळ सुरक्षित ठेवणे, पुरावे संकलन, आरोपी निष्पन्न करण्याची प्रक्रिया याबाबत पोलिसांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. श्वान पथकाच्या सादरीकरणाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. इएढ सुजित डांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्वानांनी बॉम्ब शोध, अमली पदार्थ शोध तसेच अडथळे पार करून गुन्हेगार पकडण्याची प्रात्यक्षिके सादर केली.



वाहतूक शाखेच्या स्टॉलवर पोलीस निरीक्षक विलास पाटील व इएढ अमोल लगड यांनी हेल्मेट वापर, अल्पवयीन वाहनचालक, मोबाईल वापर टाळणे, १०८ रुग्णवाहिका व ११२ पोलीस हेल्पलाईनबाबत मार्गदर्शन केले. महिला सहायता कक्षाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती उघडे यांनी गुड टच-बॅड टच, पोस्को कायदा, १०९८ व १०९१ टोल-फ्री क्रमांकांची माहिती दिली. सायबर विभागाने ऑनलाईन व बँक फसवणुकीपासून बचावासाठी १९३० हेल्पलाईनबाबत जागृती केली.

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधत पोलीस-जनता संबंध, कर्तव्य, भविष्यातील आव्हाने तसेच MPSC-UPSC परीक्षांबाबत अभ्यासाची दिशा, शिस्त व व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.

आज दि. ८ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता पोलीस मुख्यालयात पोलीस भरती व स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन पोलिस विभागाने केले आहे.

# अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला, संबंधितांनी संपर्क साधण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** नागपूर-यवतमाळ बायपास रस्त्याच्या बाजुला असलेल्या निवेदिता विलीयम आश्रमजवळ अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आलेला आहे. सदर मृत व्यक्तीची नोंद सेवाग्राम पोलिस स्टेशन मध्ये घेण्यात आली आहे. सदर व्यक्ती हरविला किंवा बेपत्ता असल्यास किंवा कुणाला या व्यक्तीबद्दल माहिती असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर अनोळखी व्यक्ती २ जानेवारी रोजी सकाळी १०.४५ वाजता आढळून आला आहे. त्याच्या अंगावर मेहंदी रंगाचे पुर्ण बाह्याचे जर्किन, लाल रंगाचे पुर्ण बाह्याचे टी शर्ट, त्याखाली पिवळ्या रंगाचे टी शर्ट व निळ्या रंगाचा फुलपँट घातलेला होता. डाव्या हातावर टॅटू व इंग्रजीत एमएस गोंदलेले आहे. उजव्या हातात स्टीलचा कडा व दोन बोटात तांब्याच्या अंगठ्या घातलेल्या होत्या. उंची ५ फुट ६ इंच असून वय अंदाजे ४५ ते ५० वर्ष असावे. दाढी बारीक पांढरी, डोक्याचे केस काळे व पांढरे असून रंग सावळा आहे.

अशी ओळख असलेल्या व्यक्तीची माहिती असल्यास सेवाग्राम पोलिस स्टेशन ०७१५२-२६०३३० किंवा चौकशी अधिकारी पोलिस उपनिरिक्षक अजयकुमार योळणे ९९२११५६२१०, पोलिस उपनिरिक्षक दिलीप कडू ९८९०७९४८०१ किंवा पोलिस निरिक्षक नागेशकुमार चतरकर यांच्या ८८८८८१३७३५ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे सेवाग्राम पोलिस स्टेशनच्यावतीने कळविण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

माझे पक्षकार . रामकृष्ण प्रभाकर चांभारे आणि गणेश प्रभाकर चांभारे हे मौजा - महाबळा तह. -सेलु ॲन्ड जिल्हा वर्धा मौजा क्रमांक 126 प. ह. 19 सर्वे क्रमांक 1/A /2 ॲन्ड 1/A/3 मधील प्लॉट क्रमांक 12 क्षेत्रफळ 228.15 स्क्वे.फुट. सदर प्लॉटची चतु:सीमा - पूर्वेस :- प्लॉट क्रमांक 3 पश्चिमेस :- 9 मीटर ले-आऊट रोड उत्तरेस :- प्लॉट क्रमांक 11 दक्षिणेस: - 9 मीटर लेआऊट रोड सदर मालमत्ता हि जितेंद्र आनंदराव झाडे ॲन्ड सुरेंद्र आनंदराव झाडे ह्यांनी सदर मालमत्ता माझ्या पक्षकाराला दिनांक 21/03/2024 रोजी दस्त क्रमांक 378/2014 विकत घेतलेले आहे. माझ्या पक्षकाराकडून सदर विक्रीपत्र मूळ दिनाक 21/03/2024 रोजी दस्त क्रमांक 378/2014 हरविलेले आहे. माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता The Adhar Housing Finance Ltd येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सदर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व जर कोणालाही सादर विक्रीपत्र मिळाल्यास ते त्यांनी सूचना प्रकाशित केल्याच्या 7 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा**

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार सौ . रेखा विजय तुरक हे मौजा - उमरी मेघे तह - ॲन्ड जिल्हा वर्धा उमरी (मेघे) ग्राम पंचायत वॉर्ड क्रमांक २, मधील गावठाण घर क्रमांक . 136, क्षेत्रफळ 52.31 स्क्वे.फुट.ॲन्ड 562.85 चौ. फुट .सदर प्लॉटची चतु:सीमा:- पूर्वेस:- श्री उघडे ह्यांचे घर पश्चिमेस:- ग्राम पंचायत रोड उत्तरेस: - श्री सोमणकर ह्यांचे घर , दक्षिणेस :- ग्राम पंचायत रोड , सदर मालमत्ता हि सौ, रेखा विजय तुरक हे सदर मालमत्ता हि 2011 पासून त्यांच्या मालकी हक्कात आहे .माझे पक्षकार हे सदर मालमत्ता श्री . नीरज विजय तुरक ह्यांना बक्षीस पत्राद्वारे देणार आहेत. माझ्या पक्षकाराने सदर मालमत्ता गहाण ठेविण्याकरिता ऊप Piramal Finance Finance Ltd येथे कर्जासाठी अर्ज केला आहे सर्व जनतेला सादर नोटिसद्वारे सूचित केले जाते की जर कोणाला वरील व्यवहारांवर काही आक्षेप असेल व तर कृपया ही सूचना प्रकाशित केल्याच्या 7 दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर, वर्धा. मो.९९२२४२६१६८**

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, आर्वी यांचे कार्यालय
प्रशासकीय ईमारत, तळेगाव रोड आर्वी, ता. आर्वी, जि.वर्धा.
फोन नं. ०७१५७-२२२०२२ ई-मेल- roarvi001@gmail.com

## जाहिरनामा

ज्याअर्थी अर्जदार संतोष बकाराम आत्राम, रा. पारगोठान, ता. आर्वी, जि. वर्धा. यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे कि, त्यांचे आई नामे श्रीमती तुळसाबाई बकाराम आत्राम मृत्यु दि. ११/०१/२००० रोजी ग्राम पंचायत कवाडी, ता. आर्वी, जि. वर्धा. येथे नोंद उपलब्ध नसुन त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार मृत्युची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीच्या मृत्युची नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, आर्वी यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विहीत मुदतीत आक्षेप/हरकती प्राप्त न झाल्यास मृत्यु बाबतची नोंद घेनेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. मुदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप किंवा उजर विचारात घेतले जानार नाही, याची नोंद घ्यावी.

**(साईकिरण आवुलवार)**
**नायब तहसिलदार, आर्वी**

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, आर्वी यांचे कार्यालय
प्रशासकीय ईमारत, तळेगाव रोड आर्वी, ता. आर्वी, जि. वर्धा
फोन नं.०७१५७-२२२०२२ ई-मेल- roarvi001@gmail.com

## जाहिरनामा

ज्याअर्थी अर्जदार श्री. राजेश दादाराव वाहाने, रा. सावळापुर, ता. आर्वी, जि. वर्धा. यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे कि त्यांचा जन्म दि. ०९/०५/१९७८ रोजी ग्राम पंचायत सावळापुर, ता. आर्वी, जि. वर्धा. येथे नोंद उपलब्ध नसून त्यांच्या जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) नूसार जन्माची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीच्या जन्माची नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, आर्वी यांचे न्यायालयात स्वतः जातीने / वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिध्दी पासून १५ दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विहीत मुदतीत आक्षेप/हरकती प्राप्त न झाल्यास जन्मा बाबतची नोंद घेनेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. मुदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप किंवा उजर विचारात घेतले जानार नाही याची नोंद घ्यावी.

**(साईकिरण आवूलवार)**
**नायब तहसीलदार आर्वी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# भाजपच्या ध्येय धोरणाला आ.प्रकाश भारसाकळेंनी लावला सुरुंग

## ● प्रदेशाध्यक्षांनी बजावली नोटीस ● सत्तेसाठी एआयएमआयएमशी जवळीक अंगलट

**अकोला /प्रतिनिधी :** राजकारण व विचारधारेचे कट्टर विरोधक भाजप आणि एआयएमआयएम पक्षांचे नगरसेवक सत्ता समीकरणासाठी अकोट विकास मंचाच्या नावावर एकत्र आणण्याचा प्रताप अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या चांगलाच अंगलट आला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भिन्न विचारधारेमुळे युती शक्य नसल्याचे दोन्ही पक्षाच्या नेतृत्वाने स्पष्ट केले. पक्षाच्या ध्येय धोरणाला सुरुंग लावणा-या आमदार भारसाकळे यांना भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नोटीस बजावून खुलासा देण्याचे आदेश दिले आहेत.



भाजप व एआयएमआयएमच्या कथित युतीवरून राज्याच्या राजकारणात चांगलाच गोंधळ उडाला. दोन्ही पक्षांच्या नेत्यांची चांगलीच कोंडी झाली. हे सगळे घडवून आणण्यामागे अकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे असल्याचे समोर आले. अकोट नगरपालिका निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदावर भाजपच्या माया धुळे विजयी झाल्या. नगरसेवक पदाच्या ३३ पैकी ११ जागांवर भाजप, काँग्रेस सहा, शिवसेना एक, वंचित व राष्ट्रवादी दोन, एआयएमआयएम पाच, शिवसेना ठाकरे गट दोन, राष्ट्रवादी शरद पवार गटाला एक जागा मिळाली. कुणाकडेही बहुमत नसल्याने अकोट विकास मंचाची स्थापना भाजपने केली. यामध्ये एआयएमआयएमचे पाच नगरसेवकही सहभागी झाले होते. शिवसेना ठाकरे गट, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाचा देखील त्यात सहभाग आहे. या नव्या आघाडीची नोंदणी अकोला जिल्हाधिका-यांकडे केली. मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्तकरून या प्रकारे आघाडी केली असल्यास ती तोडण्याचे आदेश दिले. एआयएमआयएमनेही भाजपसोबत युती केली नसल्याचे सांगितले. संबंधित नगरसेवकांनी दिलेला पाठिंबा विनाअट परत घेत असल्याचे पत्र अकोट नगर विकास मंचला पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष युसूफ पुंजानी यांच्या स्वाक्षरीने पाठवले.

**प्रदेशाध्यक्षांनी आमदारांची काढली खरडपट्टी-** अकोट नगरपालिकेमध्ये भाजपच्या नेतृत्वातील अकोट विकास मंचामध्ये एआयएमआयएमच्या नगरसेवकांना सोबत घेण्याच्या मुद्द्यावर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आमदार प्रकाश भारसाकळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. पक्षाच्या ध्येय धोरणाला सुरुंग लावला असून कोणालाही विश्वासात न घेता आपल्या कृतीतून पक्षाची प्रतिमा मलिन केल्याचे प्रदेशाध्यक्षांनी पत्रात नमूद करीत आमदारांना चांगलेच सुनावले. आपल्यावर कारवाई का करण्यात येउ नये, याचा खुलासा करण्याचे आदेश प्रदेशाध्यक्षांनी आ.भारसाकळेंना दिले आहेत. आता प्रकाश भारसाकळे त्यावर काय उत्तर देतात, याकडे लक्ष लागले आहे.

# भाजपासोबत युती नडली, कांग्रेसचे नगरसेवक निलंबित

**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने अंबरनाथ ब्लाक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई केली असून, त्यांच्या कार्यकारिणीलाही निलंबीत केले**



**अंबरनाथ-**भाजपासोबत युती करणे कांग्रेसच्या नगरसेवकांना महागाड पडले आहे. अंबरनाथ नगर परिषदेत निवडून आलेल्या कांग्रेसच्या १२ नगरसेवकांनी भाजपच्या १४ नगरसेवकांसोबत युती केली होती. तसा गटही त्यांनी स्थापन केला होता. त्यानंतर आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने अंबरनाथ ब्लाक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांच्यावर थेट निलंबनाची कारवाई केली असून, त्यांच्या कार्यकारिणीलाही निलंबीत केले आहे. वरिष्ठ उपाध्यक्ष गणेश पाटील यांनी दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी जाहीर केलेल्या अधिकृत पत्रातून ही माहिती देण्यात आली. अंबरनाथ नगर परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे १२ नगरसेवक निवडून आले. त्यानंतर कांग्रेस शहरातील तिसरा मोठा पक्ष बनला. या ठिकाणी भाजपचे १४ नगरसेवक निवडून आले. तर नगराध्यक्ष पदावरही भाजपच्या तेजश्री करंजुले यांचा विजय झाला. तर शिंदेंची शिवसेना हा २७ नगरसेवकांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला. त्यामुळे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाकडे निकालानंतर युतीचा हात पुढे केला. त्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासोबत बैठकही घेतली. मात्र त्यानतंरही भाजपने शिवसेनेला युतीपासून दूर ठेवले. तर देशभरात ज्या कांग्रेसला संपवण्यासाठी नरेंद्र मोदींपासून देवेंद्र फडणवीसांपर्यंतचे नेते घोषणा करतात, त्याच कांग्रेससोबत भाजपच्या स्थानिक नेत्यांनी युती केली. यावेळी अजित पवारांच्या राष्ट्रवादी कांग्रेसला सोबत घेतले. मात्र शिवसेनेले दूर ठेवले. त्यामुळे शिवसेनेने संताप व्यक्त केला होता.

ही युती होत असताना या घडामोडीची माहिती प्रदेश कार्यालयाला न देता, ब्लाक अध्यक्ष प्रदीप पाटील यांनी भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसोबत मिळून नगरपालिकेत युती केली. प्रदेश काँग्रेसने याला पक्षशिस्तीचा गंभीर भंग मानला आहे. या संदर्भात कांग्रेसच्या वतीने जाहीर केलेल्या पत्रात स्पष्टपणे नमूद केले आहे की, पक्षाच्या कोणत्याही वरिष्ठ अधिका-यांना माहिती न देता विरोधी पक्षासोबत अशा प्रकारचे राजकीय समन्वय साधणे ही अत्यंत चुकीची आणि पक्षहिताला बाधा आणणारी कृती आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष मा. प्रांताध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार प्रदीप पाटील यांना त्यांच्या पदावरून तत्काळ निलंबित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# प्रशिक्षणास गैरहजर राहणा-या कर्मचा-यांवर कडक कारवाई करा

## राज्य निवडणूक आयुक्तांचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकांसाठीचे मतदान आणि मतमोजणीकरिता पुरेशा प्रमाणात अधिकारी कर्मचा-यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. या सर्वांचे वेळेत प्रशिक्षणही पूर्ण झाले पाहिजे; तसेच प्रशिक्षणास गैरहजर राहणा-या अधिकारी-कर्मचा-यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिले आहेत.




महानगरपालिका निवडणुकांसाठी मतदान व मतमोजणीची तयारी आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात सर्व २९ महानगरपालिका आयुक्त, संबंधित पोलिस आयुक्त व जिल्हा पोलिस अधीक्षक; तसेच निवडणूक निर्णय अधिका-यांची गेले दोन दिवस दिनांक ६ व ७ जानेवारी रोजी दूरचित्र संवादाच्या माध्यमातून (व्हीसी) बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, पोलिस महानिरीक्षक मनोजकुमार शर्मा यांच्यासह आयोगातील विविध अधिकारी यावेळी उपस्थित होते. मतदान आणि मतमोजणीची प्रक्रिया सुरळितपणे पार पाडण्यासाठी सर्वांचे प्रशिक्षण होणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांवर विविध व्यवस्था करण्याबाबतही सर्व अधिकारी-कर्मचा-यांना अवगत करावे. मतदानासाठी येणा-या मतदारांची गैरसोय होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घ्यावी. मतदान केंद्रावर विजेच्या उपलब्धतेबरोबरच पिण्याचे पाणी, सावली, शौचालयाची इत्यादींची व्यवस्था असणे आवश्यक आहे. शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्रे उभारण्यात यावित. मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणा-या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य द्यावे. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प आणि व्हिलचेअरसारख्या व्यवस्थाही असाव्यात, अशा सूचना मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिल्या. महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०१६ रोजी सायंकाळी ५:३० वाजता संपणार असल्याने, त्यानंतर इलेक्ट्रानिक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वरे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मुक्त करा

## सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी; कुत्र्यांचे समादेशन करण्याचा सल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**नवी दिल्ली : भटकी कुत्री केवळ चावतात असे नाही, तर ते गंभीर अपघातांनाही कारणीभूत ठरतात. रस्ते भटक्या कुत्र्यांपासून मुक्त आणि मोकळे ठेवावे लागतील अशी महत्त्वपूर्ण टिप्-पणी आज (दि. ७ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयाने केली. यावेळी न्यायालयाने पीडित, प्राणीप्रेमी आणि विरोधक अशा सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेणार असल्याचे स्पष्ट केले. आज याचिकाकर्ते, प्राणी कल्याण संस्-था, आणि हस्तक्षेपकर्त्यांच्या युक्तिवादानंतर सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या प्रकरणाची पुढील सुनावणी गुरु वार दि. ८ जानेवारीपर्यंत तहकूब केली आहे. ८ जुलै २०२५ रोजी दिल्लीतील एका माध्-यमातील रिपोर्टची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली होती. तेव्हापासून आतापर्यंत या प्रकरणी ५ वेळा सुनावणी झाली आहे. आज अनेक याचिकांवर एकत्रित सुनावणी झाली असून न्यायालय यावर कोणता ठोस आदेश देत, याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. देशातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या सुळसुळाटावर आणि त्यांच्यामुळे होणा-या त्रासावर न्यायमूर्ती विक्रम नाथ, न्यायमूर्ती संजय मेहता आणि न्यायमूर्ती एन.व्ही. अंजारिया यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी सुरू आहे. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रश्न केवळ कुत्रे चावण्याचा नाही, तर सुरक्षिततेचाही आहे. मोकाट कुत्रे अचानक रस्त्यावर धावल्यामुळे वाहनांचे अपघात होतात. सकाळी कोणता



कुत्रा कोणत्या मूडमध्ये आहे, हे सांगता येत नाही असे निरीक्षण न्यायमूर्तींनी नोंदवले. यावेळी न्यायमूर्ती संजय मेहता यांनी शाळा आणि न्यायालय परिसरात कुत्र्यांची काय गरज?, असा सवाल केला. अशा जागा कुत्र्यांपासून मुक्त असायला हव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.कपिल सिब्बल यांनी कुत्र्यांना पकडून, नसबंदी करून पुन्हा त्याच भागात सोडण्याच्या प्रक्रियेचा उल्लेख केला, तेव्हा न्यायालयाने मिश्किल टिप्पणी केली. न्यायालय म्हणाले आता फक्त एकच गोष्ट बाकी आहे, ती म्हणजे कुत्र्यांचे समुपदेशन करणे; जेणेकरून पुन्हा सोडल्यानंतर ते कोणाला चावणार नाहीत.**कपिल सिब्बलांना न्यायालयाचा सल्ला-**भटक्या कुत्र्यांसाठी कार्यरत असणा-या संस्थांच्या वतीने युक्-तीवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले, मी जेव्हा जेव्हा मंदिरात गेलो आहे, तेव्हा मला कधीही काहीही चावलेले नाही. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, तुम्ही भाग्यवान आहात. लोकांना चावले जात आहे, मुलांना चावले जात आहे. लोक मरत आहेत. कपिल सिब्बल म्हणाले, जर कुत्रा एखाद्याला चावला तर तुम्ही केंद्राला फोन करा, ते त्याला घेउन जातील, निर्जंतुकीकरण करतील आणि त्याच भागात परत सोडतील. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले, कुत्र्यांना सोडल्यावर ते चावू नयेत म्हणून त्यांचे समुपदेशन करणे बाकी आहे. कुत्र्यांना हटवणे किंवा मारणे हा उपाय नाही. वैज्ञानिक पद्धतीने (नसबंदी करून) त्यांची संख्या कमी करता येईल. कुत्र्यांचे सरासरी वय १० वर्षे असते, त्यामुळे नियमांचे पालन केल्यास एका दशकात हा प्रश्न सुटू शकतो. मात्र, सिब्बल यांच्या आक्रमक भूमिकेवर न्यायालयाने त्यांना जास्त उत्साहित होउ नका, असा सल्लाही दिला. यावेळी सालिसिटर जनरल तुषार मेहता यांनी गेटेड कम्युनिटीचा मुद्दा उपस्थित केला. एखाद्या गृहनिर्माण संस्थेत कुत्रे असावेत की नाही, याचा निर्णय तिथल्या रहिवाशांनी मतदानाने घ्यावा, असे त्यांनी सुचवले.

# राज्याला ‘पूर्णवेळ गृहमंत्री’ नसल्याचा हा परिणाम

## हिदायत पटेल हत्येवरून काँग्रेसची टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात कोयता गँग, ड्रग्ज माफिया, रेती माफिया, लँड माफिया, आका यांचे पेव फुटले आहे. गावागावात गुन्हेगारीचे लोण पसरले असून अकोल्यातील काँग्रेस नेते हिदायत पटेल यांची झालेली हत्या हे राज्यातील कायदा सुव्यवस्था किती रसातळाला गेली आहे, याचे उदाहरण आहे. राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याचा हा परिणाम आहे, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. या हल्ल्यातील सर्व गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. अमरावती येथे पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष यांनी सर्वप्रथम काँग्रेस नेते हिदायत पटेल यांच्यावरील हल्ल्याचा निषेध करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.‘ही निवडणूक अमरावती महानगरपालिकेची जशी आहे, तशीच राज्यातील इतर २९ महानगरपालिकेची आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत पैसा फेक तमाशा देख, हे वगनाट्य सत्ताधारी पक्षाकडून खेळले गेले. कायदा सुव्यवस्था गुंडाळून ठेवली आहे, निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षांच्या हाताचे खेळणे बनून राहिला आहे, प्रशासन सत्ताधा-यांना मदत करत आहे. बोगस मतदान, पैशाचे प्रचंड वाटप सुरु आहे. राज्यात प्रशासन नावाचे काही चालत नाही.



कुणाचाही वचक राहिलेला नाही,‘ असे सपकाळ म्हणाले. ‘जे नगर पंचायत निवडणुकीत झाले, तेच महानगरपालिका निवडणुकीत होत आहे. घोडेबाजाराला उत आला असून अर्ज मागे घेण्यासाठी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले जात आहे, दबाव आणला जात आहे. बिनविरोध निवडीसाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री गुंडगिरीवर उतरले आहेत.विधानसभेचे अध्यक्ष संविधानाचे, सभागृहाचे कस्टोडीयन आहेत पण त्यांच्या घरातील तीन उमेदवार बिनविरोध व्हावे यासाठी ते निवडणूक निर्णय अधिका-याच्या कार्यालयासमोर उभे होते, त्यांनी दमदाटची केली,धमक्या दिल्या, त्यांचे वागणे हे विचित्र व विकृत होते. सत्ताधारी पक्षाने लोकशाही गुंडळून ठेवली आहे,‘ अशी टीका त्याने केली.‘भारतीय जनता पक्ष व एमआयएम हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

## नागपुरात हाडे गोठवणारी थंडी; सलग दुस-या दिवशी गोंदियाचे राज्यात सर्वात कमी तापमान

# विदर्भात थंडीची लाट



**नागपूर/प्रतिनिधी :** जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात देशभरात कडाक्याची थंडी पडली आहे. विदर्भासह नागपुरात आजही थंडीची लाट पसरल्याचे चित्र आहे. तर गोंदिया जिल्ह्यात राज्यातील सर्वांत कमी तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना दिवसाही थंडीचा सामना करावा लागत आहे. उत्तरेकडील शीत वा-यांच्या प्रवाहामुळे महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. तर या थंडीचा परिणाम उत्तर व मध्य महाराष्ट्रासह विदर्भ आणि मराठवाड्यातही जाणवू लागला आहे. अशातच विदर्भासह नागपुरात आजही थंडीची लाट पसरल्याचे चित्र आहे. नागपुरात आज (७ जानेवारी) सकाळच्या सुमारास ८.० अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर गोंदिया जिल्ह्यात राज्यातील सर्वांत कमी तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांना आता दिवसाही थंडीचा सामना करावा लागतो आहे.राज्यातील सर्वांत कमी तापमानाची नोंद गोंदिया जिल्ह्यात करण्यात आली आहे. गोंदियाचे आजचे (७ जानेवारी) तापमान ७.६ अंश सेल्सियस इतके आहे. सलग दुस-या दिवशी गोंदियाचे तापमान राज्यात सर्वांत कमी असल्याची माहिती आहे. यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत थंडीची लाट पसरली असून बहुतांश जिल्ह्यांतील तापमान १० अंशाच्या खाली गेल्याचे चित्र आहे. यवतमाळमध्ये ९.८ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. उत्तर भारतातील थंडीच्या लाटेचा परिणाम आता विदर्भावर देखील झाल्याचे दिसून आले आहे. तर पुढील तीन दिवस थंडी कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तविण्यात आला आहे.

**सलग दुस-या दिवशी गोंदियाचे राज्यात सर्वांत कमी तापमान**

गोंदिया जिल्ह्यात थंडीचा जोर काही कमी होताना दिसत नसून उलट थंडी आपला कहर आणखी वाढविताना दिसत आहे. काल मंगळवारी गोंदिया जिल्ह्याचा पारा आणखी घसरला असून, थेट ७ अंशावर गेला. विशेष म्हणजे, हे यंदाचे सर्वांत कमी तापमान असून, हवामान खात्याने आज बुधवारी गोंदिया जिल्ह्यात शीतलहरचा इशारा दिला आहे. रविवारी गोंदिया जिल्ह्याचे किमान तापमान १२.२ अंशावर पोहोचले होते व त्यामुळे आता थंडीचा जोर कमी होणार असे वाटत होते. यामुळे थंडीपासून त्रासलेल्या नागरिकांना थोडा दिलासा मिळाला होता. मात्र, लगेच पा-याची घसरण सुरू झाली. अशात मंगळवारी थंडीने कमालच केली असून, पारा थेट ७ अंशावर गेला. ही या वर्षीच्या सर्वांत कमी तापमानाची नोंद आहे.

# ‘तुझा नवरा माजलाय, त्याचे हातपाय तोडावे लागतील’

## अपहरण, हत्या आणि टायर टाकून जाळले; शिर्डीतील घटना

**मुंबई/प्रतिनिधी :** १० डिसेंबर २०२५ रोजी शिर्डीमध्ये राहणा-या सचिन गिधे हा तरु ण बेपत्ता झाला. पोलिसांत तो बेपत्ता असल्याची तक्रार करण्यात आली. सचिनच्या पत्नीने सांगितले की, एका व्यक्तीने तुझ्या नव-याचे हातपाय तोडावे लागतील, अशी धमकी दिली आहे. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली. पण, सचिनचा मृतदेह मिळाला. पोलिसांनी हत्या प्रकरणाचा तपास सुरू केला आणि आरोपींपर्यंत पोहोचले. सापळा रचून पोलिसांनी हत्या करणा-या दोघांना अटक केली. दीपक पोकळे आणि प्रवीण वाघमारे अशी प्रमुख आरोपींची नावे असून त्यांच्या साथीदारांनाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या.

**सचिन गिधे हत्या, काय घडले?**

शिर्डीतील हॉलिडे पार्क परिसरात सचिन कल्याणराव गिधे राहायचा. तो १० डिसेंबर २०२५ रोजी साई सुनिता हॉटेलमध्ये जेवण्यासाठी गेला होता. त्यावेळी प्रवीण वाघमारे सचिनच्या बायकोला कॉल केला आणि म्हणाला की, ‘तुझा नवरा माजला आहे.



त्याचे हातपाय तोडावे लागतील.’या धमकीनंतर सचिन गिधे बेपत्ताच झाला. १५ डिसेंबर रोजी त्याच्या पत्नीने पोलिसांना तक्रार दिली. पोलिसांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखत गुन्हा दाखल केला. पोलिसांनी सचिन गिधे यांचा शोध सुरू केला.

**दुसरी घटना आली समोर, दगडाने ठेचले पाय-**तपास करत असताना पोलिसांना आणखी एक घटना कळली. ज्या दिवशी सचिन गिधेचं अपहरण झालं, त्याच दिवशी याच आरोपींनी गौतम निकाळे नावाच्या तरुणाला साकुरी शिवारात मारहाण केली. त्याचे पाय दगडाने ठेचले आणि मोडले. त्यातून प्रवीण हा सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्याच्या शोधासाठी विशेष पथक स्थापन केले. आरोपी आणि त्याचे साथीदार संगमनेरमधील मेंढवण शिवारात लपून बसले असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी ६ जानेवारी रोजी परिसराला वेढा दिला आणि दीपक पोकळे, दरेकर यांना बेड्या ठोकल्या.

अटक केल्यानंतर पोलिसांनी आरोपींची चौकशी केली. त्यात त्यांनी सचिन गिधेची हत्या केल्याची कबूली दिली. तसेच अनैतिक संबंध आणि पैशाच्या वादातून त्याला मारल्याचे सांगितले. दीपक पोकळे, गणेश दरेकर, प्रवीण वाघमारे आणि कृष्णा वाघमारे यांनी सचिन गिधेची हत्या केली. पुरावा नष्ट करण्यासाठी त्याच्या मृतदेहावर टायर टाकले आणि डिझेल ओतून मृतदेह जाळला.

# महाराष्ट्र सदनात जागतिक पाक संस्कृतीचा संगम

## विविध देशातील ३० दिग्गज शेफकडून राज्याच्या आदरातिथ्याचा गौरव

**नवी दिल्ली:** जगातील विविध देशांतील ३० नामांकित दिग्गज शेफच्या एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने मंगळवारी महाराष्ट्र सदनाला सदिच्छा भेट दिली. महाराष्ट्राचे वैभव आणि येथील आदरातिथ्य पाहून हे आंतरराष्ट्रीय पाहुणे भारावून गेले. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी या शिष्टमंडळाचे स्वागत केले. यावेळी आयोजित विशेष सोहळ्यात त्यांनी सर्व परदेशी पाहुण्यांना राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाची ओळख करून दिली. या भेटीदरम्यान ऑस्ट्रेलिया, युक्रेन, मॅसेडोनिया, मलेशिया, मालदीव, दक्षिण आफ्रिका, सर्बिया, फिलिपिन्स, उझबेकिस्तान, श्रीलंका, मलेशिया, सिंगापूर, व्हिएतनाम, फ्रान्स, दुबई, केनिया, मॉरिशस, इंडोनेशिया, मालदीव देशांतील ३० पाककला तज्ज्ञांनी महाराष्ट्र सदनाच्या वास्तूशिल्पाची पाहणी केली. निवासी आयुक्त आर. विमला यांनी या प्रतिनिधींना महाराष्ट्राची विविधता आणि जागतिक स्तरावर नावाजल्या जाणा-या ’महाराष्ट्रीयन खाद्यसंस्कृती’चे महत्त्व सांगितले. निवासी आयुक्तांच्या हस्ते सर्व पाहुण्यांना ’पारंपरिक दिवे’ भेट म्हणून देउन त्यांचा सन्मान करण्यात आला. भारतीय संस्कृतीत प्रकाशाचे प्रतीक मानले जाणारे हे दिवे स्वीकारताना पाहुण्यांनी मनापासून आनंद व्यक्त केला.या भेटीदरम्यान विदेशी पाहुण्यांनी महाराष्ट्राच्या श्रीखंड, पुरणपोळी, झुणका-भाकरी आणि कढी-मसालाभात यांसारख्या पारंपरिक मराठी व्यंजनांचा आस्वाद घेतला. या मेजवानीने जागतिक स्तरावरील शेफ भारावून गेले. तसेच, विदेशी पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी हिंदी गाण्यांचा एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये भारतीय संगीताच्या तालावर हे सर्व मान्यवर मनसोक्त थिरकले. निवासी आयुक्त आर. विमला आपल्या मनोगतात म्हणाल्या की, जगाच्या पाठीवरील विविध देशांतून आलेल्या कल्पक आणि प्रतिभावंत शेफचे यजमानपद भूषवणे, ही महाराष्ट्र शासनासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे.

# भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत योगदान द्यावे-राज्यपाल

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची व मोलाची आहे. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी युवकांनी विचार, कृती आणि नव कल्पनांच्य माध्यमातून पुढे येउन भारतीय संस्कृतीचा वारसा जपत भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पनेत योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

राष्ट्रीय युवा महोत्सव-विकसित भारत यंग लीडर्स डायलाग २०२५-२६ राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्यातून निवड झालेल्या युवकांशी राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या कार्यक्रमास क्रीडा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, राज्यपालांचे सचिव डा. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे सह सचिव एस. राममूर्ती, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित, मुंबई विभागाच्या क्रीडा उपसंचालक सुवर्णा बारटक्के व राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड झालेले विद्यार्थी उपस्थित होते.राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभाग हा राज्यातील युवकांसाठी गौरवाची व प्रेरणादायी बाब असल्याचे गौरवोद्गार काढून दिल्ली येथील संवाद कार्यक्रमासाठी निवड झालेल्या युवकांना राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी शुभेच्छा दिल्या.राज्यपाल आचार्य देवव्रत युवकांशी संवाद साधताना म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी होणा-या राष्ट्रीय युवा महोत्सवाला नवे स्वरूप देण्यात आले असून देशातील सर्व राज्यातून विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक परीक्षा घेण्यात आली. त्यातून निवड झालेल्या तीन हजार गुणवंत युवकांना थेट पंतप्रधानांशी संवाद साधण्याची संधी या महोत्सवाच्या माध्यमातून मिळणार आहे. मेहनत, परिश्रम व गुणवत्तेच्या बळावर या स्पर्धेसाठी निवड झालेल्या युवकांचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी कौतुक केले. ते म्हणाले, या स्पर्धेसाठी झालेली युवकांची निवड ही विकसित राष्ट्र निर्माणातील त्यांच्या कष्टाच्या भूमिकेची पावती आहे.भारत हा युवकांचा देश आहे. युवक देशाच्या विकासाला अधिक गती देण्याची भूमिका बजावू शकतात, असा विश्वास व्यक्त करून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, भारताचा विकास फक्त आर्थिक किंवा भौतिक उन्नतीपुरता मर्यादित नसून, संस्कृती, सभ्यता, परंपरा व नैतिक मूल्यांचे जतन हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित करतो. संपूर्ण विश्व हे एक कुटुंब मानणारी विचारधारा ही भारताची ओळख असून भारताने संत-महात्म्यांच्या माध्यमातून मानवतेचा संदेश जगभर पोहोचविला असल्याचेही राज्यपाल आचार्य देवव्रत यावेळी म्हणाले.



राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले, देश सर्व क्षेत्रात प्रगती करीत असून स्टार्टअप्स, आत्मनिर्भर भारत अभियानामुळे भारत जागतिक पातळीवर वेगाने प्रगती करत आहे. भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनला असून, तिस-या क्रमांकाकडे वाटचाल करीत आहे. विकासाचा लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचत आहे. युवकांमध्ये देशाला आत्मनिर्भर, समृद्ध आणि शक्तिशाली बनविण्याची क्षमता असल्याचे सांगून राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले युवकांनी अपयश आल्यास खचून न जाता परिश्रम, चिकाटी आणि सकारात्मक विचार करून विकसित राष्ट्र निर्माणात आपले योगदान द्यावे.या संवाद कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांवरही राज्यपालांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी निवड झालेल्या युवकांना प्रातिनिधिक स्वरूपात मान्यवरांच्या हस्ते किटचे वाटप करण्यात आले. २०२५-२६ या वर्षातील राष्ट्रीय युवा महोत्सवाचे दिल्ली येथे ९ जानेवारी २०२६ पासून आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय युवा महोत्सव-विकसित भारत यंग लीडर्स डायलाग या अंतर्गत ऑन लाईन स्पर्धा प्रथम टप्पा विकसित भारत क्विज, द्वितीय टप्पा निबंध लेखन स्पर्धा, तृतीय टप्पा विकसीत भारत पीपीटी चॅलेंज अशी स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेतून राज्यामधून ४५ युवांची निवड करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा, विभाग व राज्यस्तरीय युवा महोत्सव अंतर्गत सांस्कृतिक विभागातून २८ कलाकारांची आणि डिझाईन फार भारत आणि हॅक फार सोशल काज या स्पर्धेतून ५ स्पर्धकांची निवड करण्यात आली आली आहे. राज्यातून निवड झालेल्या युवक व त्यांच्यासोबत असलेल्या अधिकारी वर्गासह ८५ जणांचा चमू दिल्ली येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी आज मुंबई येथून रवाना झाला.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ट्रम्प यांची मुक्ताफळे

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या आपण विश्वाधिपती असल्याच्या गैरसमजुतीत आहेत. आपण कोणाच्याही घरात घुसू शकतो, ही जी गुर्मी ट्रम्प यांना आली आहे, ती अधिक घातक आहे. अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांसाठी जगाच्या सगळ्या जबाबदाऱ्या झटकून टाकण्याची आणि अमेरिकेची प्रतिष्ठा जगात पुन्हा प्रस्थापित करण्याचा शब्द अमेरिकनांना देऊन निवडून आलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांची पावले प्रत्यक्षात भलतीकडेच पडू लागली आहेत. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला त्यांच्याच घरातून शिताफीने उचलून जेरबंद केल्यापासून ट्रम्प यांचा वाह्यात आत्मविश्वास भलताच वाढला आहे. आपल्या एकाच वक्तव्यात परवा त्यांनी निम्म्या जगाला धमकावले; त्यात भारताचाही समावेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी एक वाक्य चांगलं बोलताना त्यांनी पुढे जी मुक्ताफळे उधळली, ती भारताच्या प्रतिष्ठेला आव्हान देणारी आहेत. 'ट्रम्प यांना खूश ठेवणे आवश्यक आहे, हे मोदी चांगले जाणतात' असे म्हणताना ट्रम्प यांनी पुढे रशियाकडून घेतले जाणारे कच्चे तेल पूर्णपणे थांबवले नाही, तर भारतावर आणखी कितीतरी पट आयात कर लादू, अशी धमकी दिली आहे. ट्रम्प आणि मोदी हे दोघेही दोन सार्वभौम राष्ट्रांचे प्रमुख आहेत. त्यांच्यातील संबंधांचे मुख्य कारणही तेच आहे. त्यामुळे, जे अत्यंत जबाबदारीचे संबंध आहेत, त्या संबंधांबद्दल बोलताना ट्रम्प यांनी त्यात ज्या प्रकारे दोन देशांची प्रतिष्ठा गुंफली, ते अत्यंत निषेधार्ह आहे. अर्थात ट्रम्प यांना अशा गोष्टींचा विधीनिषेध नाही. ते तो पाळत नाहीत, हे त्यांच्या यापूर्वीच्या असंख्य विधानांवरून (आणि वर्तणुकीतूनही) सिद्ध झाले आहेच. भारत आणि पाकिस्तानमधला 'ऑपरेशन सिंदूर' वेळचा तणाव निवळवण्याचे श्रेय भारताने आपल्याला द्यावे, यासाठी त्यांनी यापूर्वी केलेले जाहीर प्रयत्न आणि विधाने म्हणजे बालिशपणाचा नमुना होता. मोदी यांनी अत्यंत परिपक्वपणे, मौन पाळून त्याला जो प्रतिसाद दिला, तो लाजवाब होता. यावेळीही तसे च घडेल, यात शंका नाही. प्रश्न अन्य देशांचा आहे. भारताने आपल्या 'हो'त 'हो' मिसळावं यासाठी ट्रम्प यांनी भारत आणि अमेरिकेतली व्यापारी बोलणी रोखून ठेवली आहेत, हे न कळण्याएवढा भारत दुधखुळा नाही. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असिम मुनीर यांनी आपल्या देशातल्या मौल्यवान खाणी ट्रम्प यांच्या हवाली करून त्यांची मर्जी संपादन केली. तशी गरज ना भारताला आहे, ना मोदींना. ट्रम्प यांना जितक्या लवकर हे समजेल, तेवढे ते त्यांच्याच हिताचे असेल! मादुरो यांना जेरबंद केल्यानंतर ट्रम्प यांनी इराण, लॅटिन अमेरिकन देशांसह युरोपलाही एका फटक्यात धमकावले. डेन्मार्कच्या अखत्यारीत; पण स्वतंत्र अस्तित्व असलेल्या ग्रीनलँडचा ताबा ट्रम्पना हवा आहे. निवडून आल्या आल्या त्यांनी आपला हा मनसुबा जाहीर केला होता. तोच परवा पुन्हा अधिक आग्रहपूर्वक केला. त्याला डेन्मार्कचे पंतप्रधान मेट्टे फ्रेडरिक्सन आणि ग्रीनलँडचे पंतप्रधान जेम्स फ्रेडरीक नेल्सन या दोघांनीही कडक शब्दांत उत्तर दिले . वास्तविक डेन्मार्क नाटो देशांचा भाग असल्याने त्याच्या संरक्षणाची जबाबदारी अमेरिकेचीच आहे. करारानुसार ज्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, त्याचाच घास घेण्याची ही अजब आंतरराष्ट्रीय नीती आहे! ट्रम्प यांच्या या धोरणाविरोधात त्यामुळेच नार्डिक, बाल्टिक देशांसह पूर्ण युरोपातून तत्काळ निषेधाचे सूर उमटले आहेत. ग्रीनलँड हे आर्क्टिक महासागरातले सर्वात मोठे बेट. ते खनिज संपत्तीने समृद्ध असल्याने ट्रम्प यांचा त्यावर डोळा असणे स्वाभाविक आहे. पण, त्याशिवाय ग्रीनलँड हे सुरक्षेच्या दृष्टीनेही अमेरिकेला महत्त्वाचे आहे. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीने डेन्मार्कवर आक्रमण केल्या केल्या अमेरिकेने ग्रीनलँडवर चढाई करून ते ताब्यात घेतले होते. युद्धानंतरही बराच काळ अमेरिकन सैन्य तिथे होते. तिथले पिटूफ्फीक विमानतळाचे संचलन आजही अमेरिकेकडेच आहे. रशियाने अमेरिकेवर क्षेपणास्त्र डागलीच, तर त्याचा मुकाबला करण्यासाठी अमेरिकेला हा विमानतळ सर्वाधिक उपयोगी आहेच; पण चीन आणि रशियाच्या आर्क्टिक महासागरातील हालचालींना शह द्यायलाही अमेरिकेच्यादृष्टीने ग्रिनलँड महत्त्वाचे आहे. ग्रीनलँडचे हे महत्त्व खुद्द ग्रीनलँड-डेन्मार्कच काय, अख्खा युरोप जाणतो. अमेरिकेने गोडीत घेतले तर काम सहज होण्यासारखे आहे. पण, ट्रम्प यांचा आपण विश्वाधिपती असल्याचा गैरसमज झाला आहे. त्यातून आपण कोणाच्याही घरात, कोणाच्याही खिशात कधीही हात घालू शकेतो, ही जी गुर्मी आली आहे, ती अधिक घातक आहे. फ्रान्स, ब्रिटनसह सगळे युरोपियन देश त्यामुळेच एका दिवसात एकवटले आणि ग्रीनलँडच्या बाजूने उभे ठाकले. यात ट्रम्प यांनी अमेरिकेची प्रतिष्ठा कशी वाढवली, हे त्यांचे त्यांनाच माहीत. ट्रम्प यांनी पुढची दमदाटीची भाषा केली आहे, ती कोलंबिया, मेक्सिको, इराण आणि क्युबाला उद्देशून. इराण आणि अमेरिकेतले हाडवैर जगजाहीर आहे. २०२० मध्ये जनरल कासिम सुलेमानी यांच्या हत्येसाठी झालेल्या अमेरिकेच्या हवाई हल्ल्यानंतर हे हाडवैर दोघांच्याही नसानसांत पोहोचले. १९५९ मध्ये क्युबात फिडेल कॅस्ट्रो अंमल सुरू झाला. त्या काळात क्युबा रशियाच्या जवळ गेला, तो साम्यवादी विचारातल्या साम्यामुळे. त्याचा वाईट परिणाम अमेरिकेच्या व्यापारी हितसंबंधावर झाला. ते संबंध कॅस्ट्रोनंतरही न सुधारल्याने क्युबासारखा पिटुकला देशही अमेरिकेला सुरक्षेच्या दृष्टीने धोका वाटतो आहे! मेक्सिको आणि कोलंबियावर अमेरिकेचा अमली पदार्थांचा व्यापार आणि तस्करीचा फार जुना आरोप आहे. त्याचाच वापर करून ट्रम्प आपलाही 'मादुरो' करतील, अशी भीती तिथल्या राष्ट्रप्रमुखांना वाटू लागली आहे. दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांनी त्यामुळेच ट्रम्प यांना काल जाहीरपणे अधिकृत इशारा दिला. ट्रम्प त्याने बधतील, असे नाही. पण, येत्या काही दिवसांत जग त्यामुळे अधिक अशांत होण्याची चिन्हे आहेत. भारताची 'वेट अँड वॉच'ची भूमिका या सगळ्या गदारोळात सर्वाधिक शहाणपणाची ठरते आहे.

# बदलती समीकरणे आणि राज्यसभेचे राजकारण

**देशाच्या राजकीय पटलावर २०२६ हे महत्त्वाचे निवडणूक वर्ष ठरणार आहे. दक्षिण भारतात केरळ आणि तामिळनाडू, तर पूर्वोत्तर भारतात आसाम आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. एकूण पाच राज्यांतील निवडणुकांमुळे राजकीय हालचालींना वेग येणार आहे. याच काळात उत्तर भारतात उत्तर प्रदेशपासून बिहारपर्यंत होणाऱ्या राज्यसभा निवडणुकांमध्ये सर्वपक्षीयांची खरी कसोटी लागणार आहे.**

येणाऱ्या वर्षामध्ये एप्रिलपासून नोव्हेंबरपर्यंत सुमारे राज्यसभेच्या ७५ जागांवर निवडणुका होणार आहेत. यामध्ये बिहारच्या पाच आणि उत्तर प्रदेशच्या दहा जागांचा समावेश आहे. या राज्यसभा निवडणुका राष्ट्रीय लोकशाही आघाडी तसेच विरोधी 'इंडिया' आघाडी, दोघांसाठीही अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा, दिग्विजय सिंह, शरद पवार यांच्यासह हरदीप सिंह पुरी, बी. एल. वर्मा, रवनीत सिंह बिट्टू, जॉर्ज कुरियन यांसारख्या केंद्रीयमंत्र्यांचा राज्यसभा कार्यकाळ २०२६ मध्ये संपत आहे. त्यामुळे कोणते ज्येष्ठ नेते पुन्हा संसदेत प्रवेश मिळवतात आणि कोणते नवे चेहरे पुढे येतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागा एप्रिल २०२६ मध्ये रिक्त होत आहेत. बिहारमधील पाच जागाही याच काळात रिक्त होतील. त्याचप्रमाणे झारखंडच्या दोन, आंध्र प्रदेशच्या चार, तेलंगणाच्या एक, पश्चिम बंगालच्या पाच आणि तामिळनाडूच्या सहा राज्यसभा जागांवर निवडणुका होणार आहेत. उत्तर प्रदेशातील दहा जागा नोव्हेंबरपर्यंत रिक्त होतील. मध्य प्रदेश, आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मणिपूर आणि मिझोराम या ईशान्येकडील राज्यांमधून निवडून आलेल्या सदस्यांचाही कार्यकाळ संपणार आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातून प्रत्येकी एक जागा रिक्त होत आहे. राजस्थान आणि छत्तीसगडमधील सदस्यांचाही कार्यकाळ पूर्ण होत आहे.

सध्या राज्यसभेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे एकूण १२९ सदस्य आहेत, तर विरोधकांकडे ७८ सदस्य आहेत. त्यामुळे उच्च सदनातील सत्तासंतुलनाच्या दृष्टीने या निवडणुका निर्णायक ठरणार आहेत. बिहारमधील पाच राज्यसभा जागा दि. ९ एप्रिल २०२६ रोजी रिक्त होणार असून, त्यासाठी मार्चपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. बिहारमधून ज्यांचा कार्यकाळ संपत आहे, त्यामध्ये राष्ट्रीय जनता दलाचे प्रेमचंद गुप्ता आणि अमरेंद्र धारी सिंह, जनता दलाचे (युनायटेड) हरिवंश नारायण सिंह आणि केंद्रीय मंत्री रामनाथ ठाकूर, तसेच राष्ट्रीय लोक मोर्चाचे अध्यक्ष उपेंद्र कुशवाहा यांचा समावेश आहे. बिहार विधानसभा निवडणुकीनंतर राज्यसभा निवडणुकीचे गणित बदलले आहे. एका राज्यसभा जागेसाठी एकेचाळीस आमदारांचे समर्थन आवश्यक असते. सध्याच्या संख्याबळानुसार भारतीय जनता पक्ष आणि जनता दल (युनायटेड) प्रत्येकी दोन जागा जिंकण्याच्या स्थितीत आहेत, तर एक जागा विरोधकांच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पक्षाकडून अनेक इच्छुक उमेदवार असल्याने उपेंद्र कुशवाहा यांच्या पुनरागमनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महाराष्ट्रात एप्रिल २०२६ मध्ये सात जागा रिक्त होतील. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) शरद पवार, शिवसेनेच्या (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) प्रियंका चतुर्वेदी आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा कार्यकाळ संपत आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली असून, शरद पवार आणि प्रियंका चतुर्वेदी यांच्या पुनरागमनावर मर्यादा येण्याची शक्यता आहे. महायुती सातही जागा जिंकण्याच्या स्थितीत असून, विरोधकांच्या वाट्याला केवळ एक जागा जाण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीत सर्वाधिक आमदार काँग्रेसकडे असल्याने काँग्रेस स्वतःचा उमेदवार पाठवते की शरद पवार किंवा उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला संधी देते, याकडे लक्ष आहे.

कर्नाटकातून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे राज्यसभा सदस्य आहेत. त्यांचा कार्यकाळ २५ जून २०२६ रोजी संपत आहे. याचवेळी माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचाही कार्यकाळ पूर्ण होत आहे. हरिवंश नारायण सिंह दि. ९ एप्रिल २०२६ रोजी निवृत्त होत आहेत. कर्नाटकातील चार जागांपैकी तीन जागा काँग्रेस जिंकण्याची शक्यता असून, एक जागा विरोधकांकडे जाणार आहे. भारतीय जनता पक्ष स्वतःचा उमेदवार देणार की जनता दलाला (सेक्युलर) पाठिंबा देणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. उत्तर प्रदेशातून केंद्रीय मंत्री हरदीप सिंह पुरी आणि बी. एल. वर्मा यांचा कार्यकाळ दि. २५ नोव्हेंबर २०२६ रोजी संपत आहे. त्यांच्यासह आणखी आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. या दहा जागांपैकी आठ जागा भारतीय जनता पक्षाकडे, तर एक समाजवादी पक्षाकडे आणि एक बहुजन समाज पक्षाकडे आहे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये बृजलाल, सीमा द्विवेदी, चंद्रप्रभा ऊर्फ गीता, हरदीप सिंह पुरी, रामजी, दिनेश शर्मा, नीरज शेखर, अरुण सिंह आणि बी. एल. वर्मा यांचा समावेश आहे. समाजवादी पक्षाकडून प्राध्यापक रामगोपाल यादव आहेत.

उत्तर प्रदेश विधानसभेतील सध्याच्या संख्याबळानुसार एकूण ४०२ आमदार असून एक जागा रिक्त आहे. एका राज्यसभा जागेसाठी ३७ आमदारांचे समर्थन आवश्यक आहे. या गणितानुसार समाजवादी पक्ष दोन आणि भारतीय जनता पक्ष आठ जागा जिंकू शकतो. बहुजन समाज पक्ष राज्यसभेतून पूर्णपणे बाहेर पडण्याची शक्यता आहे. काँग्रेसमधून भारतीय जनता पक्षात गेलेले केंद्रीय मंत्री रवनीत सिंह बिट्टू यांचाही कार्यकाळ दि. २१ जून २०२६ रोजी संपत आहे. ते राजस्थानातून राज्यसभा सदस्य आहेत. मध्य प्रदेशातून केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांचाही याच दिवशी



कार्यकाळ पूर्ण होत आहे. झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य शिबू सोरेन यांच्या निधनामुळे आधीच एक जागा रिक्त झाली आहे. गुजरातमधून शक्तिसिंह गोहिल यांचा कार्यकाळ संपत आहे.

आंध्रप्रदेशातून तेलुगू देशम पक्षाचे सना सतीश बाबू, वायएसआर काँग्रेसचे अयोध्या रामी रेड्डी, परिमल नथवानी आणि पिल्ली सुभाष निवृत्त होत आहेत. तेलंगणातून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधिज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांचा कार्यकाळही पूर्ण होत आहे. पश्चिम बंगालमधून पाच सदस्य निवृत्त होणार असून, त्यामध्ये साकेत गोखले यांचा समावेश आहे. तामिळनाडूतून सहा सदस्य निवृत्त होत असून, त्यामध्ये माजी उपसभापती थंबी दुराई आणि तिरुचि शिवा यांचा समावेश आहे. आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मणिपूर आणि मिझोराम या ईशान्येकडील राज्यांमधूनही राज्यसभा सदस्य निवृत्त होणार आहेत. उत्तराखंडमधून नरेश बंसल आणि हिमाचल प्रदेशातून इंदू बाला गोस्वामी यांचा कार्यकाळ संपत आहे. राष्ट्रपती नामनिर्देशित सदस्यांपैकी माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळ मार्च २०२६ मध्ये पूर्ण होत आहे.

### बदललेले गणित आणि समीकरणे

प्रमुख राज्यांमधील राज्यसभा निवडणुकांचे सविस्तर राजकीय समीकरण पाहिले असता वेगवेगळ्या राज्यांत वेगळीच चित्रे स्पष्ट होतात. महाराष्ट्रात नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण गणित बदलले आहे. महायुतीकडे २३५ पेक्षा जास्त आमदारांचे भक्कम संख्याबळ आहे. एका राज्यसभा जागेसाठी साधारण ३७ ते ३९ आमदारांच्या मतांची आवश्यकता असते. या संख्याबळाच्या जोरावर महायुती ७ पैकी किमान ६ जागा सहज जिंकण्याच्या स्थितीत आहे. दुसरीकडे काँग्रेस, शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्याकडे मिळून ५० पेक्षा कमी आमदार आहेत. त्यामुळे विरोधी आघाडीला केवळ १ जागा मिळण्याची शक्यता आहे. या एका जागेसाठी शरद पवार आणि प्रियंका चतुर्वेदी यांच्यात थेट चुरस निर्माण होऊ शकते किंवा काँग्रेस स्वतःच्या कोट्यातून जागा मागण्याची भूमिका घेऊ शकते.

बिहारमध्ये नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्तासंतुलन पूर्णपणे बदलले आहे. भारतीय जनता पक्ष आणि जनता दल युनायटेड यांच्या नेतृत्वाखालील आघाडीला २०२ आमदारांचे स्पष्ट बहुमत मिळाले आहे, तर राष्ट्रीय जनता दलप्रणीत महाआघाडीला केवळ ३५ आमदारांवर समाधान मानावे लागले आहे. बिहारमध्ये एका राज्यसभा जागेसाठी सुमारे ४१ आमदारांचे समर्थन आवश्यक आहे. या गणितानुसार सत्ताधारी आघाडी ५ पैकी ४ जागा सहज जिंकू शकते. भारतीय जनता पक्ष आणि जनता दल युनायटेड प्रत्येकी २ जागा मिळवण्याच्या स्थितीत आहेत. उर्वरित एका जागेसाठी राष्ट्रीय जनता दलाला आपल्या उरलेल्या मित्रपक्षांच्या मदतीने कठीण संघर्ष करावा लागणार आहे.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय लोक मोर्चाचे नेते उपेंद्र कुशवाहा यांची खासदारकी धोक्यात येण्याची शक्यता आहे. कारण, सत्ताधारी आघाडीने त्यांना उमेदवारी न दिल्यास त्यांचे पुनरागमन कठीण ठरू शकते.

उत्तर प्रदेशात विधानसभेतील संख्याबळ पाहता भारतीय जनता पक्षाचे वर्चस्व कायम आहे. एकूण ४०३ आमदारांपैकी भारतीय जनता पक्ष आणि मित्रपक्षांकडे २७० पेक्षा अधिक आमदार आहेत, तर समाजवादी पक्षाकडे १०३ आमदार आहेत. एका राज्यसभा जागेसाठी सुमारे ३७ प्रथम पसंतीची मते आवश्यक आहेत. या हिशेबाने भारतीय जनता पक्ष १० पैकी ८ जागा सहज जिंकू शकतो. समाजवादी पक्षाच्या वाट्याला २ जागा येण्याची शक्यता आहे. बहुजन समाज पक्षाकडे केवळ १ आमदार असल्याने त्यांचे खाते उघडणे जवळपास अशक्य मानले जात आहे.

कर्नाटकात सध्या काँग्रेसचे सरकार असल्याने तिथले समीकरण वेगळे आहे. काँग्रेसकडे स्पष्ट बहुमत असल्यामुळे ४ पैकी ३ राज्यसभा जागा त्यांच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. विरोधकांकडे म्हणजे भारतीय जनता पक्ष आणि जनता दल सेक्युलर यांच्या आघाडीकडे मिळून इतके संख्याबळ कमी आहे की, ते जेमतेम १ जागा जिंकू शकतात. या स्थितीत मल्लिकार्जुन खर्गे यांची जागा सुरक्षित मानली जात आहे; मात्र माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या पुनरागमनासाठी भारतीय जनता पक्षाला मोठी राजकीय तडजोड करावी लागण्याची शक्यता आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे विधानसभेत प्रचंड बहुमत आहे.

या संख्याबळाच्या जोरावर ५ पैकी किमान ४ राज्यसभा जागा तृणमूल काँग्रेस सहज जिंकू शकते. विधानसभेतील मुख्य विरोधी पक्ष म्हणून भारतीय जनता पक्षाला १ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये राज्यसभा निवडणूक सत्ताधारी पक्षाच्या बाजूनेच झुकलेली दिसते.

**पोपट नाईकनवरे**

## भारत जगातील सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश

देशात यंदा तब्बल १५०. १८ दशलक्ष टन एवढे विक्रमी उत्पादन झाले आहे . विशेष म्हणजे भारताने हा विक्रम करताना चीनला मागे टाकले आहे.चीनचे उत्पादन १४५. २८दशलक्ष टन एवढे झाले आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. केंद्रीय कृषी मंत्री यांनी नुकतेच एका समारंभात ही माहिती दिली आहे.भारताने अधिक उत्पादन देणाऱ्या बियाणांच्या निर्मितीत मोठे यश मिळविले आहे.याबरोबरच तांदूळ निर्यातीत सुद्धा मोठी आघाडी घेतली आहे.तांदळाचे उत्पादन जरी विक्रमी झाले असले तरीही ग्राहकांना तो योग्य किमतीत मिळावयास हवा. तरच सामान्य जनता आनंदी होईल.सरकारी यंत्रणेने ग्राहकांना तांदूळ योग्य किमतीत कसा मिळेल हे जातीने पहिले पाहिजे . तांदूळ या पिकांबरोबरच इतर पीक उत्पादनात सुद्धा आघाडी घेतली पाहिजे.

**शांताराम वाघ**

## जागतिक व्यापार आणि भारत

भारत जेव्हा समृद्ध होता त्यावेळी जगाच्या कानाकोपऱ्यात व्यापार करत होता. देशात निर्माण होणाऱ्या वस्तू जगभर जात होत्या. गेल्या काही वर्षात अमेरिका जागतिक व्यापारात महासत्ता बनत चालली आहे.'अमेरिकेला पुन्हा महान बनवू'असा उद्घोष करून ट्रम्प यांनी संपूर्ण जगाशी 'शुल्क युद्ध' पुकारले आहे. या दहशतीचा परिणाम एवढा आहे की जपान,युनायटेड किंगडम, स्वित्झर्लंड आदि देशांनी अमेरिकेला सोयीस्कर अशा व्यापारी करारांवर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. भारताच्या कृषी आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्रांमध्ये अमेरिकेला शिरकाव करायचा आहे म्हणून भारताला दबावाखाली आणण्यासाठी आयात शुल्कात ५० टक्के एवढी वाढ केली आहे.तसेच अनेक निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. भारत दबावाखाली येऊन घाईगडबडीत करार करून अमेरिकेला सवलती देईल असा ट्रम्प यांचा समज होता पण भारताने व्यापार संकुचितपणा त्यागून व्यापारात विविधता आणण्याचे धोरण अवलंबून जगातील लहान सहान प्रत्येक देशाशी व्यापार करून स्वतःच्या व्यापारी कक्षा रुंदवण्याचा प्रयत्न केला आहे. भारताने युनायटेड किंगडम, ओमान आणि न्यूझीलंड सहित १८ देशांशी मुक्त व्यापार करार केले आहे.या वर्षभरात भारताने व्यापाराचा नवा मापदंड जगासमोर ठेवला आहे.ओमान समवेत करारामुळे आखाती देशातील पुरवठा साखळी अधिक बळकट होण्यास साहाय्य होणार आहे. आपल्या आर्थिक हिताचे रक्षण करताना खुले व्यापारी धोरण अवलंबण्याचा भारताचा प्रयत्न आहे. करार करताना कोणताही दबाव, समय मर्यादा न ठेवता एका विश्वासाच्या वातावरणात स्वहित जोपासत आत्मविश्वासाने करार केले गेले. महासत्तेच्या जोरावर संपूर्ण जगाला झुकवण्याचे स्वप्न अमेरिकेत पाहत आहे पण भारत उचलत असलेले धाडसी पावले भारताला सर्व क्षेत्रात अग्रेसर करत आहे. अमेरिकेच्या दबावासमोर न झुकता व्यापाराच्या नवनवीन संधी शोधून भारताला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे सरकारचे प्रभावी धोरण आहे.

**लीना गाडगीळ**

## मकरसंक्रांत आणि नायलॉन मांजा

'तिळगुळ घ्या, गोड गोड बोला' असे सांगणारी मकरसंक्रांत आपण येत्या काही दिवसांतच साजरी करणार आहोत. आनंद,आपुलकी आणि ऋतुबदलाचा संदेश देणारा असा हा सण आहे. भारतातील प्रत्येक राज्यात मकरसंक्रांत विविध नावांनी आणि वेगवेगळ्या पद्धतींनी साजरी केली जाते.

या सणातील एक महत्त्वाची परंपरा म्हणजे पतंग उडवणे! पतंग उडवणे म्हणजे एक प्रकारे आकाशासोबत नाते जोडले जाणे असे मानले जाते.मात्र, आज पतंग उडवणे अनेकांसाठी जीवघेणा खेळ ठरत आहे. पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉनचा मांजा हा अत्यंत मजबूत व धारदार असतो. हा मांजा पक्ष्यांच्या पंखात, मानेत किंवा पायात अडकला तर त्यांना असह्य वेदना होतात आणि अनेकदा त्यांचा मृत्यूही होतो. दरवर्षी हजारो पक्षी या मांज्यामुळे मृत्युमुखी पडतात. इतकेच नव्हे, तर दुचाकीस्वारांचे गळे चिरले जाण्याच्या, गळ्याभोवती मांजा आवळल्याने वाहनावरून खाली पडण्याच्या अनेक गंभीर घटना घडतात. बरेचदा, पतंग उडवल्यानंतर मांजा झाडांवर, विजेच्या तारांवर अडकून राहतो त्यामुळे देखील धोका निर्माण होतो.म्हणूनच नायलॉन मांज्याच्या वापरावर कठोर बंदी घालणे अत्यंत आवश्यक आहे. शासनाने अशा मांज्याची विक्री, साठवणूक आणि वापर यांवर कठोर दंड आणि कारावासाची कारवाई अमलात आणली पाहिजे.

**प्रिया बागडदेव**

## अभिव्यक्ती स्वातंत्र्य की अराजकता?

देशातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमधून राष्ट्राला दिशा देणारे विचार बाहेर येणे अपेक्षित असते. मात्र, अलीकडच्या काळात 'जवाहरलाल नेहरू विद्यापीठ' ज्या कारणांमुळे चर्चेत आहे, ते पाहता चिंतेची दाट सावली निर्माण झाली आहे. निषेध नोंदवण्याच्या नावाखाली पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांविरोधात असंसदीय भाषेचा वापर करणे आणि नक्षलवादी कमांडर 'हिडमा'च्या समर्थनार्थ घोषणाबाजी करणे, ही लोकशाहीची कोणती पद्धत आहे ? हा प्रश्न आता देशाला पडला आहे.काही वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे अफझल गुरूच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या गेल्या, त्याच धर्तीवर आता 'हर घर से हिडमा निकलेगा' असे म्हटले जाणे, हे एका मोठ्या वैचारिक कटाचे निदर्शक आहे. हिडमा हा नक्षलवादी चळवळीचा असा चेहरा आहे, ज्याने अनेकदा केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानांचे रक्त सांडले आहे. अशा व्यक्तीचे उदात्तीकरण करणे, हे केवळ सरकारविरोधी नसून ते राष्ट्रविरोधी आहे. ही प्रवृत्ती म्हणजे 'अर्बन नक्षलवादा'चा वाढता प्रादुर्भाव आहे. समाजातील सुशिक्षित वर्ग जेव्हा पडद्यामागून विद्यार्थ्यांचे 'ब्रेनवॉशिंग' करतो, तेव्हा तरुणाई दिशाहीन होऊन हिंसेच्या मार्गावर चालते.आंदोलनाच्या नावाखाली पोलिसांवर 'मिर्ची स्प्रे'ने हल्ला करणे ही प्रवृत्ती अत्यंत घातक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर जेव्हा देशाच्या अखंडतेला तडा देण्यासाठी केला जातो, तेव्हा कायदा कठोर होणे अनिवार्य आहे. केवळ तात्पुरती कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही. शैक्षणिक संस्थांच्या स्वायत्ततेचा आदर राखलाच पाहिजे, पण तिथे देशविरोधी विचार पेरणाऱ्या केंद्रांचा वेळीच बंदोबस्त व्हायला हवा.

**अविनाश देशपांडे**

## जागतिक हिंदी दिन: भारतीय संस्कृतीचा जागतिक वारसा

दरवर्षी १० जानेवारी हा दिवस जगभरात 'जागतिक हिंदी दिन' म्हणून उत्साहात साजरा केला जातो. भारताची संस्कृती, परंपरा आणि विचार जागतिक स्तरावर पोहोचवण्यात हिंदी भाषेचा मोलाचा वाटा आहे. हा दिवस साजरा करण्यामागे हिंदी भाषेचा जगभरात प्रचार आणि प्रसार करणे हा मुख्य उद्देश आहे.परदेशातील भारतीय दूतावास आणि शैक्षणिक संस्थांमध्ये हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.१४ सप्टेंबर हा भारतापुरता मर्यादित तर १० जानेवारी हा जागतिक स्तरावर साजरा होतो.आज हिंदी ही केवळ भारताची भाषा राहिलेली नाही, तर ती एक जागतिक भाषा बनली आहे

.जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या यादीत हिंदी तिसऱ्या क्रमांकावर आहे.इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या काळात हिंदी भाषेचा वापर झपाट्याने वाढत आहे.चित्रपटसृष्टी आणि हिंदी साहित्यामुळे फिजी, मॉरिशस, गयाना, सुरिनाम आणि नेपाळ यांसारख्या देशांमध्ये हिंदी मोठ्या आवडीने बोलली आणि समजली जाते.या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

'वसुधैव कुटुंबकम' ही भारताची भावना जगापर्यंत पोहोचवण्यासाठी हिंदी हे एक प्रभावी माध्यम आहे. आपण सर्वांनी आपल्या मातृभाषेचा सन्मान राखत हिंदी या राष्ट्रभाषेचाही आदर करायला हवा.

**वर्षा आवदे**

# समस्यांचा ध्यास घेऊन चिरस्थायी पत्रकारिता करावी : अविनाश दुधे

## पुसद पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनी पत्रकारांचा सत्कार





**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद : ६ जानेवारी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर हे पत्रकारापेक्षा समाज सुधारक अधिक होते. पत्रकारिता हे त्यांचे समाज सुधारण्याचे साधन होते त्यांच्या पंगतीतील पत्रकार म्हणून आजच्या पत्रकारांनी मिरवणे योग्य नाही. अलीकडे पत्रकारीता हा धंदा झाल्याने मूल्य व निष्ठा जपणाऱ्या पत्रकारांची गोची होत आहे. पत्रकारितेची वाटचाल खूप कठीण आहे. अशा परिस्थितीत आपले वेगळेपण जपण्यासाठी समाजातील समस्यांचा ध्यास घेऊन पत्रकारांनी चिरस्थायी पत्रकारिता करावी, असे आवाहन ज्येष्ठ पत्रकार अविनाश दुधे यांनी केले.

पुसद पत्रकार संघातर्फे मंगळवार ता.६ रोजी देशभक्त शंकरराव सरनाईक वाचनालयाच्या सुधाकर नाईक प्रेक्षागृहात आयोजित पत्रकार दिनी ज्येष्ठ पत्रकार प्रदीप देशपांडे (संपादक, जनमाध्यम अमरावती), 'मीडिया वॉच' चे संपादक अविनाश दुधे यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. त्यांना शाल, श्रीफळ, मानचिन्ह देऊन पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष मोहिनी इंद्रनील नाईक होत्या. त्यांचाही या कार्यक्रमात सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पुसद पत्रकार संघाचे अध्यक्ष ललित सेता, सचिव हरिप्रसाद विश्वकर्मा, माजी अध्यक्ष प्रा. दिनकर गुल्हाने, रवी देशपांडे, अखिलेश अग्रवाल, अनिल चेंडकाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले. प्रास्ताविक हरिप्रसाद विश्वकर्मा यांनी केले. पुसद पत्रकार संघाच्या वतीने जेष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्याची परंपरा जोपासली असल्याचे त्यांनी सांगितले. सत्कारमूर्ती पत्रकारांचा परिचय प्रा. दिनकर गुल्हाने यांनी करून दिला. पत्रकार संघाचे सदस्य कैलास जगताप, राजू दुधे, ज्ञानेश्वर शिंदे, रूपेंद्र अग्रवाल, गणेश राठोड, योगेश राजे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश राजे यांनी केले. आजच्या पत्रकारिता क्षेत्रातील वास्तव स्थितीवर अविनाश दुधे यांनी कोरडे ओढले. पत्रकारिता हा धंदा झाल्याने पैसा उपसण्यासाठी मूल्य जपणाऱ्या संपादकांवर दडपण आणल्या जाते.

जोपर्यंत मालकाच्या हितसंबंधाला धक्का पोहोचत नाही, तोपर्यंत पत्रकार काम करू शकतो. त्यामुळे निष्ठा आणि मूल्यांना या क्षेत्रात आता फारशी किंमत राहिली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शेतकरी आत्महत्या किंवा कुपोषण यासारख्या महत्त्वाच्या बातम्यांना जागा देण्यापेक्षा महसूल महत्त्वाचा वाटतो, तेव्हा संपादकाचे अवमूल्यन होते, याचे त्यांनी उदाहरणासह विवेचन केले. पत्रकारिता हे सतीचे वाण असल्याची कल्पना आजच्या काळात निखालस खोटी असल्याचे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. तुमच्या हाती लेखणी आहे, एवढेच काम करा, एखादा प्रश्न सोडवून कायमचा ठसा उमटवा, अशी अपेक्षा त्यांनी पत्रकारांकडून केली. सोशल मीडिया बद्दल बोलताना अविनाश दुधे म्हणाले की, सोशल मीडिया मानवी मेंदूला गुलाम करते. यातील पत्रकारिता ही विचित्र चक्र असून वाचकांना सापळ्यात अडकवल्या जाते. आकर्षक शीर्षक देऊन ते 'क्लिक' करण्यास उद्युक्त केल्या जाते. त्यातून 'हिट' ची गणना होते आणि जाहिरातीतून त्यांचा महसूल वाढतो. यातून मूल्य जोपासणाऱ्या संपादकांची अवहेलना होत आहे, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले.

### प्रिंट मीडियाची विश्वासार्हता वाढत आहे : प्रदीप देशपांडे

अलीकडच्या काळात ऑफसेट, वेब ऑफसेट यापुढे मीडियात तांत्रिक प्रगती झाली आहे. पत्रकारितेची गती वाढली आहे .मात्र विश्वासार्हता गमावली आहे. सोशल मीडिया पेक्षा लोक वृत्तपत्रात काय छापून येते यावर जास्त विश्वास ठेवतात. तीन व चार वर्षाच्या कालावधीत प्रिंट मीडियाची विश्वासार्हता वाढत आहे. वाचकांचा कल वैचारिक लेखनावर पुन्हा वाढेल अशी अपेक्षा ज्येष्ठ संपादक प्रदीप देशपांडे यांनी या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणातून नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांनी पत्रकारांचा गौरव केला. पुसदच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून त्यांनी पत्रकारांनी योग्य ठिकाणी मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. पत्रकार संघाचे पत्रकार भवन उभारण्यासाठी राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांच्याकडे पाठपुरावा करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. या कार्यक्रमाला नवनिर्वाचित नगरसेविका दीपाली जाधव , अश्विनी जिल्हेवार, जयश्री दुधे, नगरसेवक दीपक काळे , शिवाजी खडसे,माजी नगराध्यक्ष डॉ. माधवी गुल्हाने, विनोद जिल्हेवार, राजन मुखरे, उमाकांत पापिनवार, प्राचार्य गणेश पाटील, अनिल उत्तरवार, शरद बजाज, सुरेश धनवे, ज्ञानेश्वर अजमिरे यांच्यासह शहरातील मान्यवर उपस्थित होते.

# कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे विचार क्षमतेला धोका..!

## पत्रकारांनी एआय वापराची मर्यादा ठरवावी : नितीन पखाले

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) पत्रकारितेतील अनेक कामे सोपी झाली असली, तरी पुढील काळात हीच तंत्रज्ञान पत्रकारितेसमोर मोठे आव्हान ठरू शकते. एआयचा अतिरेक झाल्यास पत्रकारांची विचारक्षमता खुंटण्याचा धोका आहे. त्यामुळे एआयचा किती आणि कसा वापर करायचा, हे पत्रकारांनी स्वतः ठरवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार नितीन पखाले यांनी केले.

महाराष्ट्र राज्य श्रमिक पत्रकार संघाशी संलग्नित यवतमाळ शाखेच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त शहरातील केमिस्ट भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी पत्रकार आरती गंधे होत्या. प्रमुख उपस्थितीत तहसीलदार डॉ. योगेश देशमुख, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, पत्रकार भास्कर मेहरे, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्रीकांत राऊत व सचिव अमोल ढोणे यांचा समावेश होता. पखाले पुढे म्हणाले की, ६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले आणि त्याच स्मरणार्थ हा दिवस पत्रकारदिन म्हणून साजरा केला जातो. आजच्या काळात पत्रकारांनी चौकस दृष्टी, वैचारिक स्वातंत्र्य आणि सामाजिक बांधिलकी जपणे अधिक गरजेचे आहे.

यवतमाळातील पत्रकार भवनाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित असून, त्यासाठी सर्व पत्रकारांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासन अनुकूल असून, मुंबई व पुणे प्रमाणे यवतमाळ येथेही पत्रकार भवन उभे राहावे, यासाठी पुढील वर्षात ठोस पावले उचलावीत, असे त्यांनी आवाहन केले. अध्यक्षीय मनोगतात आरती गंधे यांनी महिला पत्रकार म्हणून काम करताना प्रशासन व ग्रामीण पातळीवर कुठलीही अडचण आली नसल्याचे सांगितले. सकारात्मक, निर्भीड आणि समाजाभिमुख पत्रकारिता जपण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. यावेळी तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांनी संयमी पत्रकारितेची गरज अधोरेखित करत, समाजापर्यंत खरी माहिती पोहोचवण्याचे आवाहन केले. पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी पत्रकारांना लोकशाहीचा चौथा स्तंभ संबोधत, वास्तव व सत्याधारित पत्रकारितेवर भर दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकांत राऊत यांनी, सूत्रसंचालन केशव सवळकर यांनी तर आभार अमोल ढोणे यांनी मानले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने पत्रकार उपस्थित होते.

# वेचक

## निःशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचा लाभ घ्यावा : दर्शन अग्रवाल यांचे नागरिकांना आवाहन

उमरखेड : डोळे हे मानवी जीवनातील अत्यंत मौल्यवान इंद्रिय असून चांगल्या दृष्टीशिवाय दैनंदिन जीवन अडचणीचे होते. विशेषतः ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व गरजू रुग्णांना नेत्रतपासणी व उपचार वेळेवर मिळणे अनेकदा कठीण जाते. ही बाब लक्षात घेऊन समाजहिताच्या उद्देशाने स्व. बाबा तुकाराम रतनलाल अग्रवाल यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने समता फाउंडेशन, तुकाराम रतनलाल अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट व आचार्य विनोबा भावे आय हॉस्पिटल, सावंगी (मेघे), वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने निःशुल्क नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये सर्व सहभागी रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून निःशुल्क नेत्र तपासणी करण्यात येणार असून मोतीबिंदू आढळून आलेल्या गरजू रुग्णांवर आचार्य विनोबा भावे आय हॉस्पिटल, सावंगी (मेघे), वर्धा येथे निःशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन, रुग्णांची निवड, तसेच पुढील उपचारांची व्यवस्था आयोजकांच्या वतीने करण्यात येणार आहे. सदर शिबिर शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत स्टुडंट्स वेलफेअर इंग्लिश मीडियम स्कूल, दहागाव, पुसद रोड, उमरखेड, जि. यवतमाळ येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचा लाभ परिसरातील गरजू नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी, अवश्य घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. डोळ्यांचे आजार दुर्लक्षित केल्यास दृष्टीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे डोळ्यांमध्ये धुसरपणा, जळजळ, कमी दिसणे किंवा मोतीबिंदूची लक्षणे असलेल्या नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा व आपल्या परिचयातील गरजू व्यक्तींनाही या शिबिराची माहिती द्यावी, असेही आयोजकांनी आवाहन केले आहे.

## टिपेश्वर जि. प. शाळेत शिक्षण परिषद संपन्न, विस्तार अधिकारी सुनिल बोंडे यांचे मार्गदर्शन



घाटंजी – शिक्षण प्रणाली दर्जेदार व्हावी, शिक्षक वर्गात ऊर्जा निर्माण व्हावीत, नवनवीन उपक्रमाची माहिती शिक्षकांना माहिती होऊन ते अध्यापन कार्यात उपयोगी पडेल अश्या विविध उद्दिष्टातून दरमहा होणारी केंद्रास्तरीय शिक्षण परिषद टिपेश्वर जिल्हा परिषद शाळेत नुकतेच सावरगांव व पारवा केंद्रातील शिक्षकांसाठी संपन्न झाले. या आयोजित शिक्षण परिषदेत अध्यापन कार्यासोबतच टार्गेट पिक ऍप बद्दल व मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा यावर विस्तृत मार्गदर्शन विस्तार अधिकारी (शिक्षण) सुनिल बोंडे, एरंडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल यमसनवार, पार्डी नष्करी चे केंद्रप्रमुख शशिकांत कैलासवार, विस्तार अधिकारी मुंडे यांनी भेट देऊन केले. कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख मिनाताई धोटे यांनी सर्व उपस्थित शिक्षकांना आपले कर्तव्य व जबादाऱ्या काय यावर लक्ष केंद्रीत करून शिक्षण परिषदेदरम्यान भेटी देणाऱ्या अधिकाऱ्यांचे आभार मानले. या परिषदेत सावरगांव व पारवा केंद्रातील बहुसंख्य शिक्षक उपस्थित होते. या परिषदेचे उत्कृष्ट सूत्रसंचालन रामनगर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणवीर यांनी केले तर आभार प्रदर्शन विकेश दावडा यांनी केले. शिक्षण परिषद उत्तमरित्या पार पडावे यासाठी केंद्रप्रमुख मिनाताई धोटे यांच्या मार्गदर्शनात टिपेश्वर शाळेचे मुख्याध्यापक संदीप पडगीलवार व पेसा अंतर्गत मधिल शिक्षिका प्रतिभा चौधरी यांनी अथक परिश्रम घेतले.

## सुनिल वासनिक यांची बँक प्रतिनिधी म्हणून निवड!



यवतमाळ - यवतमाळ न. प. कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा कवी कलावंत व साहित्यिक सुनिल वासनिक यांची जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधी म्हणून न. प. कर्मचारी पतसंस्थेचे संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.
सुनिल वासनिक हे गेली अनेक वर्षे सहकार क्षेत्रात कार्यरत असून विगत २५ वर्षापासून न. प. कर्मचारी पतसंस्थेचे संचालक म्हणून काम करताहेत. सोबतच साहित्य व कलाक्षेत्रातील एक जेष्ठ रंगकर्मी म्हणूनही त्यांची ओळख आहे. या नियुकीबद्दल त्यांचे पतसंस्थेचे संचालक मंडळातील सदस्य सर्वश्री महेश जोशी, प्रफुल जनबंधू, शेख शहजाद, नानाजी तलांडे, श्रीमती प्राजक्ता वाघमोडे, रेखाताई डफळे आणि सबा अफरोज आदींनी अभिनंदन केले आहे.

# मराठा सेवा संघाचा 'मराठा कृषी भूषण पुरस्कार' अमृत पॅटर्नचे जनक शिवश्री अमृतराव देशमुख यांना जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - मराठा सेवा संघ द्वारा आयोजित जिजाऊ सृष्टी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे राजमाता, राष्ट्रमाता, स्वराज्य संकल्पिका जिजाऊ मासाहेब यांचा 428 वा जिजाऊ जन्मोत्सव 12 जानेवारी 2026 रोजी आयोजित केला आहे.

जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त शिवधर्म पिठावर कापूस व इतर पिकांमध्ये विक्रमी उत्पादन घेणारे अमृत पॅटर्नचे जनक शिवश्री अमृतराव दादाराव देशमुख रा.आंबोडा यांना यावर्षीचा "मराठा कृषी भूषण पुरस्कार "जाहीर करण्यात आला.

या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय शिवश्री पुरुषोत्तमजी खेडेकर साहेब, केंद्रीय मंत्री खासदार प्रतापरावजी जाधव व इतर मान्यवर तसेच लाखो जिजाऊ व शिवभक्त उपस्थित राहणार आहेत. अमृतराव देशमुख यांना मिळणारा हा मराठा कृषी भूषण पुरस्कार महागाव तालुका व यवतमाळ जिल्ह्यासाठी अभिमानाची गौरवाची बाब आहे.

त्यांनी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची पावती आहे. जिजाऊ जन्मोत्सवाचे व या पुरस्कार सोहळ्याचे आमंत्रण देण्यासाठी शिवश्री दिगंबरराव जगताप राज्य उपाध्यक्ष मराठा सेवा संघ, सुरेशराव कदम विभागीय अध्यक्ष, वसंतराव देशमुख केंद्रीय कार्यकारणी सदस्य, पी डी शिंदे जिल्हाध्यक्ष जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषद, श्रीकांत देशमुख जिल्हा उपाध्यक्ष, डॉ. संदीप शिंदे जिल्हा सचिव,अमोल जगताप जिल्हा सहसचिव,उदय भाऊ नरवाडे तालुकाध्यक्ष,पंकज देशमुख तालुका सचिव, सतीश ठाकरे तालुका कोषाध्यक्ष, प्रसिद्धीप्रमुख गजानन वाघमारे, नानाभाऊ ठाकरे,दत्तराव कदम सुनील भरवाडे,सतीश ठाकरे, दिनेश देशमुख व सर्व मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांनी अमृतराव देशमुख यांना मराठा सेवा संघाची दिनदर्शिका, निमंत्रण पत्रिका,पुष्पगुच्छ देऊन निमंत्रण दिले अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल उमरखेड येथे 'संस्कृती संगम' कार्यक्रम उत्साहात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड : दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा युनिव्हर्सल इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये संस्कृती संगम स्नेहसंमेलन नुकतेच संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन व दिप प्रज्वलन तहसीलदार राजेश सुरडकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून उमरखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ, गटशिक्षणाधिकारी विजय बेतेवाड हे होते. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोषजी जैन, उपाध्यक्ष कमलजी माहेश्वरी,सचिव संतोषजी माहेश्वरी, संस्थेचे सदस्य भगवानजी अग्रवाल, सतेजजी जैन, गोरक्षण संस्थेचे सदस्य मनोजजी माहेश्वरी यांचे सह शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषा फुलेवार, मुख्याध्यापिका विजया ठाकरे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

तहसीलदार राजेश सुरडकर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा अतिवापर न करणे व वाहतुकीच्या नियमांचे पालन करण्याचा सल्ला दिला तर गटशिक्षणाधिकारी विजय बेटेवाड यांनी विद्यार्थ्यांना अशा कलागुणातून कौशल्य प्राप्त करण्याची संधी प्राप्त होते म्हणून अशा सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेण्याची सूचना केली. संस्थेचे अध्यक्ष ॲड. संतोषजी जैन यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करेल व विद्यार्थ्यांना सर्व सुविधा देण्याचा मानस व्यक्त केला. या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये नर्सरीतील चिमुकल्यापासून ते दहावीच्या विद्यार्थ्यापर्यंत सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या कार्यक्रमांमध्ये देशभक्ती गीत, सामाजिक प्रबोधन, स्वच्छ भारत अभियान, शिक्षण आणि अंधश्रद्धा अशा विविध विषयावर नृत्य आणि नाटिका सादर करण्यात आल्या व इतर राज्याचे लोककला व मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले. सदर स्नेहसंमेलनाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. दोन दिवस चाललेल्या स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेसाठी संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# पत्रकारांच्या भावनांचा आदर करतात संतोष आणि राजेश बंधू

# अंजली ड्रेसेसमध्ये पत्रकार दिन साजरा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी - येथील सुप्रसिद्ध अंजली ड्रेसेस मध्ये, 6 जानेवारीला पत्रकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी संचालक संतोष श्रीवास व राजेश श्रीवास या दोघा श्रीवास बंधूंनी पत्रकारांचा यथोचित सत्कार व सन्मान केला. दिवाळी असो वा जन्मदिवस, श्रीवास बंधू सर्वांना सन्मानाने आमंत्रित करून शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मिठाई व भेटवस्तू देऊन पत्रकारांच्या भावनांचा आदर करतात. कुठे नव्हे एवढ्या आदरातिथ्याने सर्व पत्रकार मंडळी तसेच अनेक प्रतिष्ठित नागरिक अगदी गदगद होतात.

आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रभर पत्रकार दिन 6 जानेवारीला साजरा होतो. यावर्षी आर्णी येथील अंजली ड्रेसेस मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व हार अर्पण करून पत्रकार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नेहमीप्रमाणे संतोष श्रीवास व राजेश श्रीवास यांनी पत्रकारांचा सत्कार व सन्मान करून आदरातिथ्य केले व सर्वांच्या कार्याचे कौतुक केले.

तसेच पत्रकारांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. पत्रकारांच्या व प्रतिष्ठित जनमानसांच्या भावनांचा नेहमीच आदर करणारे श्रीवास बंधू लोकांच्या आपुलकीसाठी पात्र ठरत आहेत. या कार्यक्रमास पत्रकार श्रीकृष्ण जावळकर, राजेश माहेश्वरी, हरिओम बघेल, बबलू जाधव, राजु इंगोले, आबीद फानन, रामभाऊ होले, अनिकेत खारोळ, गणेश धनोडे, प्रल्हाद इंगळे (काका), नौशाद अली, जफर पठाण, परवेज बेग, प्रसाद जाधव, जाकीर हुसेन, रंजना आडे, पूजा ढाले, बबीता शिवणकर, मनोज माघाडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# यवतमाळ मुख्य बस स्थानकावर एसटीची धडक, ६७ वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - यवतमाळ येथील मुख्य बस स्थानक परिसरात आज सकाळी घडलेल्या भीषण अपघातात एसटी बसच्या धडकेत एका ६७ वर्षीय वृद्धाचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे बस स्थानकात एकच खळबळ उडाली असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

राजुरा (जि. चंद्रपूर) येथील रहिवासी मधुकर रामचंद्र इंगळकर (वय ६७) हे आज सकाळी यवतमाळ मुख्य बस स्थानकात आले होते. सकाळी सुमारे १०.३० वाजताच्या सुमारास नागपूर विभागाची MH 40 AQ 6252 क्रमांकाची एसटी बस प्लॅटफॉर्मवर उभी करत असताना बसच्या दरवाजाचा जोरदार धक्का इंगळकर यांना बसला. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. घटनेची माहिती मिळताच अवधूतवाडी पोलीस स्टेशनच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून अपघातास कारणीभूत ठरलेल्या बाबींचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. गजबजलेल्या बस स्थानकात असा अपघात घडल्याने एसटी प्रशासनाच्या निष्काळजीपणाबाबत प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत असून, बस स्थानकातील वाहतूक व्यवस्थापन व प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कोट्यवधींची फसवणूक करणारा केंद्रप्रमुख गिरीश दुधे पोलिसांनी केला जेरबंद

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - शहरासह तालुक्यातील अनेक शिक्षकांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना गुंतवणुकीवर परतावा देण्याचे आमिष दाखवून तब्बल कोट्यवधी रुपयांची फसवणूक बँकेच्या परताव्यापेक्षा अधिक प्रमाणात परतावा देण्याचे लालच लावून जिल्हा परिषद च्या शाळेवर केंद्रप्रमुख असणारा शहरातील गिरीश किसनराव दुधे याला पोलिसांनी अखेर अटक केली आहे.

त्याच्यासह अन्य ४ आरोपींविरुद्ध दिग्रस पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पुष्पांजली दिनेश रंधेरिया आणि मनोज अशोक पाटील रा. वर्धा यांनी "ग्रो कॅपिटल" आणि "विश्वांजली व्हेंचर एलएलपी" नावाच्या बोगस कंपनीची स्थापना केली. या कंपनीत गुंतवणूक करण्यासाठी गिरीश दुधे याच्यासह विनोद किसनराव दुधे व अर्पणा विनोद दुधे तिघे रा. दिग्रस यांनी शिक्षक, कर्मचारी व परिचितांना गुंतवणुकीचे आमिष दाखवले. आकर्षक नफ्याच्या लालसेपोटी काहींनी आजीवन जमा-ठेवी गुंतवल्या, तर काहींनी कर्ज काढूनही कोट्यवधींची रक्कम या योजनेत टाकली. काही महिन्यांपर्यंत बँकेपेक्षाही अधिक परतावा टक्के परतावा दिल्यानंतर अचानक नोव्हेंबरपासून परतावा बंद झाला आणि आरोपी दुधे कुटुंबासह पसार झाला. त्यामुळे गुंतवणूकदारांमध्ये खळबळ उडाली. अखेर काही पीडितांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. दिग्रस पोलिसांनी ६ जानेवारीला ५ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करून गिरीश दुधे याला अटक केली आहे. या घोटाळ्यात जवळपास ३० कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याची चर्चा होत असून वृषाली कथळकर यांनी दिग्रस पोलिसात यांच्या कुटुंबातील 30 लाख रुपये गुंतवणूक केली दिग्रस पोलिसात तक्रार दिली आहे अनेक गुंतवणूकदार पुढे येत असल्याने तक्रारींची संख्या व फसवणुकीचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. या प्रकरणी फसवणूक झालेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांच्या तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी ५ आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला आहेत.

# मातोश्री विद्यालय महागाव येथे पोलीस व जनता यांच्यातील समन्वय कार्यक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



महागाव - पोलीस स्टेशन महागाव यांच्या अंतर्गत पोलीस व जनता यांच्यातील समन्वय या विषयावर मातोश्री विद्यालय महागाव येथे मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पोलीस स्टेशन महागाव येथील मा. अमोल राठोड पोलीस उपनिरीक्षक प्रमुख अतिथी तथा मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

तसेच पोलीस जमादार राजू तिजारे व पोलीस नाईक राजू शर्माते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्य अनुताई गावंडे होत्या. मा. अमोल राठोड पोलीस उपनिरीक्षक प्रमुख अतिथी तथा मुख्य मार्गदर्शक यांनी आपल्या मार्गदर्शनात पोलीस हा खाकी वर्दीतील दबाव तंत्र किंवा हुकुमशहा नसून जनतेची सुरक्षा आहे. समाजात सुव्यवस्था निर्माण व्हावी, समाज एक संघ तयार व्हावा, जनतेने आपल्यावर झालेले कोणतेही अन्याय निर्भीडपणे पोलिसाकडे उघड करावे घटनेची नोंद लगेच करावी, आपली सुरक्षितता निश्चित करावी तसेच विविध घटना घडण्यापासून व अनर्थ टाळण्यापासून समाज सुरक्षितता निर्माण होण्यासाठी प्रत्येक अनिष्ट गोष्टीची नोंद पोलिसाकडे नोंदवावी व समाज सलोखा साधावा असे उद्बोधन केले. शालेय विद्यार्थी व शालेय परिसर तसेच शिस्तप्रिय वातावरण पाहून दंग झालो असे उद्गार सुद्धा प्रगट केले. जीवनात आदर्श विद्यार्थी घडावे अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पी. के. शिंदे यांनी केले तर आभार प्रा. एस.व्ही.जंजाळ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त कर्मचारी वृंदांनी सहकार्य केले.

# आमरण उपोषण यशस्वी ; भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.)च्या पाठबळाने रस्ता व पाणी प्रश्न निकाली

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - तालुक्यातील मौजा असोली, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाला भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.)च्या ठोस पाठबळामुळे यश मिळाले. उपोषणाच्या प्रमुख मागण्या म्हणजे असोली ते गौळ रस्त्याचे डांबरीकरण तत्काळ सुरू करणे तसेच ग्रामपंचायत असोली येथील बंद वॉटर फिल्टर सुरू करून पाच रुपये दराने स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे या होत्या. या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास भीम आर्मी व आजाद समाज पार्टी (कां.)च्या वतीने पुसद ते उमरखेड रोडवर चक्का जाम आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. या इशाऱ्यानंतर प्रशासनाने दखल घेत संबंधित उपअभियंता, जि. प. बांधकाम विभाग, पुसद जि. यवतमाळ मा. नांदगावकर साहेब यांच्याशी चर्चा करण्यात आली.

यावेळी भीम आर्मी यवतमाळ जिल्हाध्यक्ष अशोक भालेराव, आजाद समाज पार्टी (कां.) युवा जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत व भीम आर्मी पुसद टीम यांनी ठाम भूमिका घेत मा. गटविकास अधिकारी साहेब यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याची मागणी केली. या पाठपुराव्याला यश येत आज असोली–गौळ रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात आली, तसेच बंद वॉटर फिल्टर येत्या दोन दिवसांत सुरू करून गावकऱ्यांना पाच रुपये दराने पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. यानंतर उपोषणकर्ते मा. यशवंत कोल्हे यांनी आमरण उपोषण मागे घेतले.

# ‘रील आणि व्हिडिओ’मुळे राजकीय वातावरण झाले डिजिटल

## निवडणूक आयोग काय करीत आहे?

**अमरावती/का.प्र.**

निवडणुका जवळ येताच, राजकीय वातावरण पूर्णपणे डिजिटल होते. फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर आणि यूट्यूबवर, नेते, समर्थक आणि तथाकथित ‘प्रभावशाली’ - प्रत्येकजण - रिल आणि व्हिडिओद्वारे उघडपणे प्रचार करत आहे. काहींमध्ये तथ्ये आहेत, काही अफवा आहेत, काही द्वेष आहेत आणि काही उघड प्रलोभने आहेत.परंतु निवडणूक आयोगाचे यावर कोणतेही ठोस आणि प्रभावी नियंत्रण नसल्याचे दिसून येते. विडंबना म्हणजे, निवडणूक आयोग प्रिंट मीडियावर, म्हणजेच वर्तमानपत्रांवर कडक देखरेख ठेवतो आणि कठोर नियम लागू करतो, तर सोशल मीडियावरील नियम केवळ कागदावर मर्यादित असल्याचे दिसून येते. आज, निनावी आणि पत्ता नसलेल्या खात्यांमधून राजकीय व्हिडिओ व्हायरल होत आहेत. आचारसंहितेचे उघडपणे उल्लंघन केले जात आहे. जात, धर्म आणि व्यक्तींबद्दल आक्षेपार्ह टिप्पण्या सामान्य आहेत. खोटे सर्वेक्षण, खोटे दावे आणि दिशाभूल करणारे क्लिप सर्रासपणे प्रसारित केले जात आहेत. असे असूनही, क्वचितच त्वरित कारवाई होताना दिसते.



लोकशाहीचा निवडणूक उत्सव आता धोरणे आणि मुद्द्यांबद्दल नाही तर रील्स, व्हिडिओ आणि व्हायरल क्लिप्सबद्दलचा युद्ध बनला आहे असे म्हणणे अतिशयोक्ती नाही. मोबाईल फोनच्या आगमनाने प्रत्येकजण नेता, प्रचारक आणि न्यायाधीश बनतो. फरक एवढाच आहे की कोणतीही जबाबदारी नाही, नियंत्रण नाही आणि भीती नाही. निवडणूक आयोगाची आचारसंहिता वर्तमानपत्रांसाठी लोखंडी साखळी बनते, परंतु तोच आयोग सोशल मीडियासमोर असहाय्य आणि गप्प का दिसतो? प्रश्न असा उद्भवतो: जेव्हा वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक शब्दासाठी जबाबदारी निश्चित केली जाते आणि पेड न्यूज, जाहिराती आणि बातम्यांमध्ये फरक करणे अनिवार्य असते, तेव्हा अगदी लहान चूक देखील सूचना आणि कारवाईमध्ये परिणाम करते. मग सोशल मीडियावर फिरणाऱ्या उघड प्रचार, चिथावणी आणि बनावट सामग्रीवर तीच कडक कारवाई का केली जात नाही?

आज सोशल मीडियावर खोटेपणा सत्य म्हणून सादर केला जात आहे, धर्म आणि जातीच्या नावाखाली विष पसरवले जात आहे, विरोधकांची प्रतिमा मलिन करण्यासाठी संपादित व्हिडिओ प्रसारित केले जात आहेत आणि बनावट खात्यांद्वारे संघटित प्रचार केला जात आहे. हे सर्व उघडपणे घडत आहे आणि निवडणूक आयोगाचे नियंत्रण औपचारिक विधानांपुरते मर्यादित आहे. सोशल मीडियाला चेहरा, पत्ता किंवा जबाबदारी नसल्यामुळे सोडले जाते? अशा परिस्थितीत, याला निवडणूक समानतेची थट्टा म्हणता येईल. कारण जेव्हा एक पक्ष नियमांनी बांधलेला असतो आणि दुसरा निर्बंधाशिवाय प्रचार करतो, तेव्हा ती निष्पक्ष निवडणूक मानली जाणार नाही, तर निवडणूक असंतुलन मानली जाईल. जर निवडणूक आयोग खरोखरच निष्पक्ष असेल, तर कोणत्या कायद्यानुसार व्हायरल खोटेपणा गुन्हा मानला जातो हे त्याला स्पष्ट करावे लागेल.निवडणूक आयोगाचे प्राथमिक उद्दिष्ट निष्पक्ष, पारदर्शक आणि समान निवडणुका आयोजित करणे आहे. तथापि, जेव्हा नियंत्रित प्रिंट मीडियापासून अनियंत्रित डिजिटल प्रचाराकडे वळले जात आहे, तेव्हा ही समानता कशी शक्य आहे? मीडिया तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की जर सोशल मीडियासाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे, पूर्व-प्रमाणन प्रणाली, त्वरित देखरेख कक्ष आणि कठोर दंडात्मक कारवाई वेळेत लागू केली गेली नाही तर भविष्यातील निवडणुकांची निष्पक्षता गंभीरपणे धोक्यात येऊ शकते. आज, मतदानावर विचारांनी नव्हे तर अल्गोरिदमचा प्रभाव पडताळला जात आहे. जितके जास्त व्हायरल व्हिडिओ खरे मानले जातात तितके धोकादायक मानसिकता लोकशाही ची मुळे नष्ट करत आहे.निवडणूक आयोगाने वर्तमानपत्रे आणि डिजिटल मीडियासाठी एकसमान नियम स्थापित करावेत, सोशल मीडिया पोस्टची पूर्व-आणि-पश्चात पडताळणी लागू करावी आणि बनावट सामग्रीविरुद्ध त्वरित आणि सार्वजनिक कारवाई करावी. अन्यथा, इतिहास लिहील की लोकशाहीचा पराभव झाला नाही, तर ती व्हायरल करून पराभूत झाली.

# प्रगतिशील शेतकऱ्यांकरीता कृषी पुरस्कारांसाठी आवाहन

**अमरावती/का.प्र.**

कृषी विभागामार्फत जिल्ह्यात कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या संस्था, शेतकरी यांच्याकडून सन २०२५ साठी विविध पुरस्कारांसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. इच्छुकांनी कृषी पुरस्काराचे प्रस्ताव दि. ३१ जानेवारी २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्यात यावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

डॉ.पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार (पुरस्कार स्वरूप : ३ लाख रूपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार), वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभूषण पुरस्कार, कृषीभूषण सेंद्रीय पुरस्कार ( २ लाख रूपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार), वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार ( १ लाख २० हजार रूपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार), उद्यान पंडीत पुरस्कार ( १ लाख रुपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार,), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार (सर्वसाधारण व आदिवासी गट) ( ४४ हजार रूपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार), युवा शेतकरी पुरस्कार (वयोमर्यादा कमाल ४० वर्षे) (रूपये १ लाख २० हजार रूपये रोख व स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार )असे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

कृषी पदवी, पदविका, पदव्युत्तर शिक्षण असल्यास प्राधान्य राहील. प्रस्ताव सादरकर्ता हा शासकीय, निमशासकीय किंवा सेवानिवृत्त अधिकारी नसावा.

कृषी भूषण सेंद्रीयसाठी सेंद्रीय मालाचे पीजीएस प्रामणीकरण केलेले असावे. जिल्हा पोलीस अधिक्षक यांचा सन २०२५ चा चारित्र्य पडताळणीचा दाखला असावा. प्रस्तावासोबत अद्यावत ७/१२, ८अ सादर करणे आवश्यक आहे. दि. २८ जुलै २०२५ च्या मार्गदर्शक सूचना नुसार विहीत प्रपत्रात आवश्यक त्या पुराव्यासह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय व मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या वेबसाईटवर व तालुका कृषी अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत. प्रस्ताव तीन प्रतीत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावा.

प्रस्ताव सादरकर्ता अमरावती जिल्ह्यातील रहिवासी असावा. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागा मार्फत करण्यात आले आहे.

# मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित -पोलिस आयुक्त राकेश ओला

**अमरावती/का.प्र.**

वेगवेगळी माध्यमे उदयास आली आहे. पण, मुद्रित माध्यमांचे महत्त्व अबाधित आहे. बरेचदा आम्हाला आमच्या गोपनीय यंत्रणेच्याही आधी पत्रकारांकडून माहिती मिळते. पत्रकारांचे हे जाळे फार महत्त्वाचे आहे. या शब्दात पोलिस आयुक्त राकेश ओला यांनी पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघातर्फे मंगळवारी दुपारी आयोजित पत्रकार दिन व पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. तत्पूर्वी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. संघाचे अध्यक्ष गोपाल हरणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, ज्येष्ठ पत्रकार अ‍ॅड. दिलीप एडतकर, विलास मराठे, प्रवीण आहुजा, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, श्रमिक पत्रकारांच्या पुरस्कार निवड समितीचे समन्वयक डॉ. विलास नांदुरकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मनपा आयुक्त सौम्या शर्मा म्हणाल्या, मराठी पत्रकारितेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. या पत्रकारितेचा व्याप दिवसेंदिवस वाढतो आहे. आगामी मनपा निवडणुकीत मतदान करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. याप्रसंगी उपस्थित उपरोक्त अन्य मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

अमरावती श्रमिक पत्रकार संघाचा यंदाच्या जीवनगौरव पुरस्काराने जेष्ठ पत्रकार मनोहर परिमल यांना उपस्थित मान्यवरांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले. प्रतिदिन व वृत्तकेसरी प्रायोजित या पुरस्काराचे स्वरूप ३१ हजार रोख, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे होते. दै. हिंदुस्थान प्रायोजित पत्रमहर्षी बाळासाहेब



श्रमिक पत्रकार संघाचे पुरस्कार वितरण सोहळा

मराठे व डॉ. अरुण मराठे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रभावी पत्रकारिता पुरस्कार टी. व्ही. ९ मराठी वाहीनीचे बातमीदार स्वप्नील उमप, दै. विदर्भ मतदार प्रायोजित ममता एडतकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार दै. हितवादचे जिल्हा प्रतिनिधी प्रवीण कपिले, दै. जनमाध्यम प्रायोजित दर्पणकार अनिल कुचे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शोध पत्रकारिता पुरस्कार लोकमतचे बातमीदार प्रदीप भाकरे तर तख्तगढ राजस्थान येथील स्व. सुमतीदेवी व स्व. डॉ. सोहनमल जैन यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उद्योजक (कोल्हापूर) सुरेंद्र जैन प्रायोजित लक्षवेधी पत्रकारिता पुरस्कार विदर्भ मतदारच्या प्रतिनिधी योगिनी अर्डक यांना देऊन सन्मानित करण्यात आले. प्रत्येकी ११ हजार रुपये रोख, शाल-श्रीफळ आणि सन्मानचिन्ह, असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे. प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या सोनी टी. व्ही.वरच्या कौन बनेगा करोडपती या अत्यंत प्रसिद्ध कार्यक्रमात दै. पुण्यनगरीचे जिल्हा प्रतिनिधी सुनील धर्माळे व त्यांच्या पत्नी विनिता धर्माळे नुकतेच सहभागी झाले होते.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल या दोघांचा विशेष सन्मान मान्यवरांच्याहस्ते करण्यात आला. याशिवाय राज्य शासनातर्फे दरवर्षी दिल्या जाणाऱ्या लोकनायक बापूजी अणे पुरस्कारासाठी लोकमतचे गजानन मोहोड व दिव्य मराठीचे अनुप गाडगे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

पुरस्कारार्थीतर्फे मनोहर परिमल व स्वप्नील उमप यांनी भावना व्यक्त केल्या. प्रास्ताविक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष मोहन अटाळकर, संचालन कार्यकारिणी सदस्य शैलेश धुंदी यांनी केले. पुरस्काराबद्दलची मांडणी संघाचे कोषाध्यक्ष गिरीश शेरेकर आणि आभार सचिव रवींद्र लाखोडे यांनी मानले. पाहुण्यांचे स्वागत संघाचे उपाध्यक्ष अमोल इंगोले, कृष्णा लोखंडे, संतोष ताकपिरे, महेश कथलकर, भैय्या आवारे, वैभव बाबरेकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

## संक्षिप्त

### ‘काळोखमुक्ती’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तिवसा**- कविता म्हणजे फक्त शब्द नसून त्या बडांचे निशाण असतात. अशा बंडखोर कवितेने आंबेडकरी साहित्य समृद्ध केले आहे. त्यात आंबेडकरी कवी स्मृतिशेष अशोक ढोलेंच्या क्रांतीप्रवन कविता ह्या विद्रोह पुकारणाऱ्या आहेत, असे प्रतिपादन प्रसिद्ध आंबेडकरी साहित्यिक प्रा. भारत सिरसाट यांनी केले.



ते वरखेड येथे आयोजित काळोखमुक्ती काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी साहित्यिक प्रा. भारत सिरसाट तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. रवींद्र मुंद्रे, प्रा. सुभाष गडलिंग, प्रा. रवी दलाल, स्वागताध्यक्ष विनायक केने, अस्मिता ढोले यांची उपस्थिती होती.आंबेडकरी साहित्याला परिवर्तनाचा वारसा लाभला असून वरखेडच्या मातीत दलित साहित्याची मुहूर्तमेढ रोवणारे अशोक ढोलेंच्या कविता आंबेडकरी साहित्यात मोलाची भर टाकणाऱ्या आहे असे मत डॉ. रवींद्र मुंद्रे यांनी व्यक्त केले तर अशोक ढोलेंच्या कवितेने मानवी समाजाला विद्रोहाचे धडे दिले असून त्यांचा काव्यसंग्रह आजही साहित्यक्षेत्रात ताकदीने उभा राहील असे विचार प्रा. सुभाष गडलिंग यांनी मांडले. कवी अशोक ढोले यांच्या निधनाने आंबेडकरी साहित्य क्षेत्राची मोठी हानी झाली असून त्यांचे अप्रकाशित साहित्य जनतेसमोर आणण्याची जबाबदारी नवलेखकांची असून ढोलेंच्या विद्रोही कवितेचा वारसा आम्ही जपण्यासाठी कटिबद्ध असू असा विश्वास प्रास्ताविक प्रसंगी सागर भवते यांनी व्यक्त केला.संचालन ज्वाला ढोले तर आभार वंदना हरणे यांनी मानले.

### महिला सभा व संविधान जागर

**अमरावता**- वसा साऊ जिजाऊ या उपक्रमांतर्गत महिला सभा व संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम मिल चाळ, नवी वस्ती, बडनेरा येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.उपक्रमांतर्गत मैत्री महिला बचत गट व जनसेवा वस्ती स्तर संघ यांच्या माध्यमातून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीमा मडामे (अध्यक्ष, जनसेवा संघ) होत्या. तर विजय डवरे (प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती) व प्रफुल्ल मंदा श्रीधर (कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अमरावती) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सीमा मडामे, किरण दुपारे, मोनाली राठोड, उषा कोठार, मालती रोतडे, शीतल रोतडे, कमला ठाकूर, आरती रोतडे, लक्ष्मी तिजारे, हरदीप कौर आदींनी परिश्रम घेतले.

### माहिती कार्यालयात आचार्य जांभेकर यांना अभिवादन

**अमरावती**- मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आद्य पत्रकार ‘दर्पणकार’ आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विभागीय माहिती कार्यालयात पत्रकार दिन आज साजरा करण्यात आला. यानिमित्त उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.६ जानेवारी १८३२ रोजी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ‘दर्पण’ हे मराठीतलं पहिलं वृत्तपत्र सुरू करत मराठी पत्रकारितेचा पाया रचला. त्यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात भरीव योगदान दिले असून पत्रकारांसाठी त्यांचे कार्य दिपस्तंभाप्रमाणे सदैव मार्गदर्शक ठरेल, असे आलुरकर यांनी यावेळी सांगीतले.

*प्रो. राम मेघे इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च चमूची*

# अविष्कार २०२६ च्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठद्वारे घेण्यात आलेल्या संशोधन अविष्कार २०२५ मध्ये प्रो. राम मेघे इंस्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि अँड रिसर्च, बडनेरा च्या चार संशोधकाची आंतरविद्यापीठ संशोधन अविष्कार - २०२६ साठी निवड करण्यात आली. प्रो. राम मेघे इंस्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि अँड रिसर्च, बडनेरा या महाविद्यालयातून प्राद्यापक अनिकेत देशमुख (पीपीजी-इटि), अभिषेक वाहुरवाघ (पीजी - इटि), यश साठे (युजी -सी एम एल ) तसेच अर्पण गोहत्रे (युजी -सी एम एल ) या श्रेणी मध्ये जवळ पास २५० जिल्हास्तरीय स्पर्धकांमध्ये व ३०० विद्यापीठस्तरावर स्पर्धकांमध्ये निवड करण्यात आली. या सर्व विद्यार्थी संशोधकांना विद्यापीठ द्वारे कलरकोट प्रदान करण्यात आले. या स्पर्धेसाठी यशस्वी नियोजना करीता महाविद्यातील डॉ. नितीन कटारिया, डॉ. पियुष कोल्हे आणि डॉ. प्रतीक देशमुख यांनी अगोदर महाविद्यालय स्तरावर स्पर्धा नंतर विद्यपीठा सोबत समन्वय केले.स्पर्धेसाठी महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बमनोटे, रिसर्च आणि डेव्हलपमेंट विभागाचे प्रमुख डॉ. समीर देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष अ‍ॅड. उदयजी देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंगजी चौधरी, सन्माननीय सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकजजी देशमुख, प्रो.विनय गोहाड, गजानन काळे यांनी विजेताचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी सर्व विद्यार्थी संशोधकांना शुभेच्छा दिल्या.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे सहा विद्यार्थी झळकले विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळद्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती येथील दरवर्षी प्रमाणे यावर्षी आपला पायंडा कायम ठेवीत एकूण सहा विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा च्या उन्हाळी २०२५ चे गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी गुणवत्ता यादीत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



नुकतीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर झाली. या गुणवत्ता यादीमध्ये महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या विविध अभ्यासक्रमाचे विद्यार्थ्यांनी स्थान प्राप्त केले. संगणक शास्त्र पदव्यूत्तर विभागातील कु. वैष्णवी अरुणा सिंग ठाकूर ही संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संगणक शास्त्र गुणवत्ता यादीत सातव्या स्थानावर तर संगणक शास्त्र पदवी स्तरावरील तनुजा आनंद शेगोकार आठवी व प्रज्वल डोंगरे हा गुणवत्ता यादीत नवव्या स्थानावर आहेत. मानसशास्त्र पदव्युत्तर विभाग ातील मानसशास्त्र व समुपदेशन या विषयात मानसी संतोष राठी प्रथम, सेजल श्रीचंद फुलवाणी द्वितीय तर स्नेहा तुलसीराम मुंदे ही तृतीय स्थानावर गुणवत्ता यादीत झळकलेली आहे. गुणवत्ता यादी स्थान प्राप्त केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ मीनल भोंडे, अस्मिता शिक्षण मंडळाचे सचिव प्रा. डॉ मुकुल भोंडे, सर्व कार्यकारिणी सदस्य, महाविद्याल याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केलेले आहे. हे सर्व विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. मीनल भोंडे, प्रा. डॉ. गजानन रत्नपारखी ,मानसशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. विद्या अंभोरे, सहा. प्रा. मानसशास्त्र विभाग, मानसशास्त्र पदव्युत्तर विभागात कार्यरत प्रा.उज्वला गोडबोले तसेच प्रा. दिग्विजय कडू , संगणक शास्त्र विभागात कार्यरत राहिलेल्या प्रा.सोनाली बारड, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रीतम पवार, तसेच याच विभागाचे प्रा. दर्शन नर्सिंगकर व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देतात.

# माध्यमांचा वापर योग्य दिशेने करावा-संपादक गजानन चोपडे

**अमरावती/का.प्र.**

माध्यमांची ताकद अफाट आहे. महापुरुषांनी ही ताकद ओळखूनच पत्रकारितेला शस्त्र बनविले आणि स्वातंत्र्याची चळवळ यशस्वी केली. आज तंत्रज्ञानाच्या विस्ताराने ही माध्यमे अधिक बलशाही झाली असून त्यांचा वापर योग्य दिशेने करण्यासाठी नव तंत्रज्ञान अवगत करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन दैनिक लोकमतचे आवृत्ती संपादक गजानन चोपडे यांनी केले. ते आयआयएमसीत पत्रकारिता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

आयआयएमसीत मराठी पत्रकारिता दिनानिमित्त विशेष व्याख्यान



भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) पश्चिम क्षेत्रीय परिसरात मराठी पत्रकारिता दिनानिमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून दैनिक लोकमतचे आवृत्ती संपादक गजानन चोपडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे अध्यक्ष क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा होते. यावेळी विचारमंचावर डॉ विनोद निताळे, डॉ आदित्य मिश्रा, डॉ प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने, रोहन तायडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे माल्यार्पण करून पूजन करण्यात आले. तत्पूर्वी पत्रकारिता दिनानिमित्य आयोजित पुस्तक प्रदर्शनी आणि जुने वर्तमानपत्रांच्या छायाचित्र दालनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी दोन प्रायोगिक वृतपत्र विशेषांक म्हणून प्रकाशित केले. यावेळी शुभम घोडके, पुष्पक गोंडाणे, कल्याण शोभना, स्वप्नील माहुरे, खुशबू आणि पालाश प्रिया या विद्यार्थ्यांनी मराठी पत्रकारितेवर मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात डॉ राजेश कुशवाहा म्हणाले, लोकांना सुसंस्कृत करण्याचे कार्य पत्रकारितेने केले आहे. या कार्यात सहभागी होणेसाठी विद्यार्थ्यांनी सत्य आणि असत्य यातील सीमा ओळखून पुढे मार्गक्रम करावे. आपल्या कामाप्रती प्रामाणिक, प्रतिबद्ध आणि समाज हित जपावे असा सल्ला ही त्यांनी यावेळी दिला.प्रास्ताविक डॉ. विनोद निताळे यांनी केले.

संचालन निशिगंधा चौधरी व विवेक बडे याने तर आभार रजनीश शुक्ल याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, नूरुज्जमा शेख, भूषण मोहोकर, राजेश कुमार, अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट आदि ने सहकार्य केले.

# ई.व्ही.एम. प्रशिक्षणात निवडणूक प्रक्रिया पारदर्शक ठेवण्यावर भर

**अमरावती/का.प्र.**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित व कार्यक्षमरीत्या राबविण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिकेच्या वतीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. निवडणूक अधिकारी तथा अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी ई.व्ही.एम. संदर्भात सविस्तर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या प्रशिक्षण कार्यक्रमात ई.व्ही.एम. मशीनची रचना, कार्यपद्धती, मतदान प्रक्रियेपूर्वीची तयारी, मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यवाही, तसेच मतदानानंतरची सुरक्षित साठवणूक व मतमोजणी प्रक्रियेबाबत सखोल माहिती देण्यात आली. यासोबतच ई.व्ही.एम. संदर्भातील नियम, मार्गदर्शक सूचना,आपत्कालीन परिस्थितीत घ्यावयाची काळजी तसेच तक्रार निवारण प्रक्रियेवरही प्रकाश टाकण्यात आला.कार्यक्रमाला निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक अधिकारी तसेच संबंधित विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणामुळे आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने अधिकारी अधिक सज्ज होतील व निवडणूक प्रक्रिया अधिक सुकर, पारदर्शक व विश्वासार्ह पद्धतीने पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

सदर प्रशिक्षणात अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त दादाराव डोलारकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी श्रीमती श्रद्धा बबन उदावंत, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी दुर्गा देवरे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण, निवडणूक निर्णय अधिकारी तथा वन जमाबंदी अधिकारी विवेकानंद काळकर, निवडणूक निर्णय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विविध खात्यांचे विभागप्रमुख, महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# महापालिकेच्या निवडणुका तोंडावर मुख्य प्रश्नांकडे दुर्लक्ष

**अमरावती/का.प्र.**

महापालिकेच्या निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांचा प्रचार रंगात आलेला असताना आरोप-प्रत्यारोपांची मालिका देखील सुरू झाली आहे. पण, यात शहरातील मुलभूत प्रश्न, विकासाचे मुद्दे बेदखल झाल्याचे चित्र आहे.

शैक्षणिक, सांस्कृतिक नगरी ही अमरावतीची ओळख. पण, बेशिस्त आणि नियोजनशून्य कारभार, मूलभूत सेवा-सुविधांकडे कमालीचे दुर्लक्ष, केवळ आर्थिक हितापायी राबवल्या जाणाऱ्या अतर्क्य योजना, यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या. वर्षानुवर्षे समस्यांचे भांडवल करून राजकारण सुरू आहे. आताही महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने तेच प्रश्न मांडत शिळ्या कढीला ऊत आणून आश्वासनांच्या पेट्या उघडल्या जात आहेत.

अलीकडच्या काळात झालेल्या रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून बेरोजगारीचा प्रश्न किती गंभीर आहे, याचे दर्शन घडले. नोकरी किमान खासगी का होईना, ती मिळावी, ही सुशिक्षितांची धडपड. पण हा विषय म्हणजे निवडणुकांमध्ये तोंडी लावायला लोणचे असते. रोजगाराच्या विषयावर कोणी बोलत नाही. सर्वच पक्षाचे जाहीरनामे तर केवळ जाहीर करण्यासाठीच. नाही म्हणायला, रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमरावतीत 'आयटी पार्क' उभारण्याची घोषणा करून आशा पल्लवीत केल्या आहेत.

स्वच्छ वायू सर्वेक्षणात अमरावतीने ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या गटात देशातून पहिला क्रमांक पटकावला, तरी कचऱ्यांचे ढीग अस्वच्छतेचे दर्शन घडवतात. सांडपाणी निचऱ्याची व्यवस्था जर्जर. अमरावतीत सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे.शहर बस वाहतूक अत्यंत अपुरी आहे. नियोजनात्मक पार्किंगचा अभाव, बेशिस्त वाहतूक यामुळे मुख्य मार्गावर वाहतुकीची कोंडी ही नित्याचीच. अमरावतीसाठी स्वतंत्र वाहतूक आराखडा तयार करावा, अशी मागणी आहे.

महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांचा अभाव शहर बस वाहतुकीची जबाबदारी महापालिका कधी घेणार, इलेक्ट्रक बसेस कधी येणार, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न केव्हा सोडवणार, असे सवाल आहेत.

# संक्रांतीचा सण प्रचारासाठी ठरत आहे लक्षवेधी

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचे वारे अंबानगरीत जोरदार वाहू लागले असून १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांकडून प्रचारासाठी नवनीवन कल्पनांची रेलचेल सुरू आहे. यंदा संक्रांतीचा सण प्रचारासाठी लक्षवेधी ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.

संक्रांत म्हटली की, वाण, हळदी कुंकू आणि महिलांचा उत्साह आणि याच भावनेला हात घालत अनेक महिला उमेदवार तसेच उमेदवारांच्या प्रचार यंत्रणा वाणाच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. परिणामी, शहरातील बाजारपेठेत वाणासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची मागणी वाढली आहे. स्टीलच्या वाट्या, प्लास्टिक डबे, हळद-कुंकू सेट, कंगण, सौभाग्यवस्तू, साडयांचे कव्हर, पिशव्या, तसेच छोट्या उपयोगी गृहसाहित्याला मागणी वाढली असून व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावरही समाधान दिसत आहे. निवडणूक आणि संक्रांत एकत्र आल्याने यंदा विक्री चांगली आहे, असे व्यापारी सांगत आहेत. विशेष म्हणजे, अनेक उमेदवारांनी वाणासोबत प्रचार साहित्याचीही 'गोड पॅकिंग' केली आहे. कुठे उमेदवाराचे वाण असलेली चिठ्ठी, कुठे निवडणूक चिन्हाची आठवण करून देणारा स्टिकर, तर कुठे आपली माणसं' हा भावनिक संदेश दिला जात आहे. अशा कल्पक संकल्पनांनी संक्रांतीचे वाण प्रचाराचे प्रभावी साधन ठरत आहे. राजकीय प्रचारात आता भाषणांपेक्षा भावनिक नाते जपण्यावर भर दिला जात असून संक्रांतीच्या निमित्ताने प्रचाराला आलेली गोडी नक्कीच शहरात रंग भरत आहे. प्रचार फेऱ्यांदरम्यान महिला उमेदवार घराघरांत भेट देत असताना त्यांना हळदी-कुंकू लावूनच निरोप दिला जात आहे. प्रचार भेटीमध्ये हळदी-कुंकवाचे अनौपचारिक कार्यक्रम होत आहेत. संक्रांतीच्या वाणातून मतदारांपर्यंत पोहोचण्याची ही धडपड मतदानाच्या दिवशी किती फलदायी ठरणार, हे मात्र १५ जानेवारीलाच स्पष्ट होणार आहे.

### महिला उमेदवारांच्या प्रचार फेऱ्यांत हळदी-कुंकू कार्यक्रम

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात यंदा महिला उमेदवार आणि महिला मतदारांमधील संवादाला संक्रांतीची पारंपरिक ओळख लाभताना दिसत आहे. संक्रांत अद्याप आठवडाभर दूर असली तरी अनेक प्रभागांत महिला उमेदवार आणि महिलांमध्ये हळदी-कुंकवाचे कार्यक्रम आधीच सुरू झाल्याचे चित्र आहे.

# प्रभाग क्रमांक-७ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमेदवारांच्या प्रचाराचे फुटले नारळ..

**अमरावता/का.प्र.**

महानगर पालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक - ७ जवाहर स्टेडियम मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अधिकृत उमेदवार - रेखाताई भुषण बनसोड ,मनीष बजाज, अंजली महल्ले ,मोहित भोजवानी यांच्या मांगीलाल प्लॉट व रामपुरी कॅम्प येथील प्रचार कार्यालयाचा उदघाटन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश संघटन महासचिव - आ.संजय खोडके, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष (ग्रामीण ) संतोष महात्मे, यश खोडके, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष माजी नगरसेवक - भुषण बनसोड, प्रवीण महल्ले आदी मान्यवर उपस्थित होते.



यावेळी स्थानिक सहकारी व पदाधिकाऱ्यांच्या वतीने आमदार महोदयांचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन महासचिव आ.संजय खोडके यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, अमरावती शहर हे विभागाचे मुख्यालय आहे. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या आरोग्य यंत्रणा, शासकीय कार्यालये , सामाजिक , शैक्षणिक व क्रीडा सुविधा या जुन्या झाल्या असून मोडकळीस आल्या होत्या. त्यामुळे विकासाला गती देऊन या सर्व शासकीय यंत्रणा पुन्हा उभ्या करणे आवश्यक असल्याने शासनाकडे पाठपुरावा करून भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. याची फलश्रुती म्हणून जिल्हा स्त्री रुग्णालय येथे ४०० खाटांची नूतन इमारत कार्यान्वित झाली असून , सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे किडनी , कॅन्सर , मेंदूरोग , हृदयरोग उपचार युनिट सुरु करून आता फेज-तीन चे नियोजन सुरु आहे. इर्विनची नूतन इमारत साकारण्यात येत आहे. विभागीय क्रीडा संकुल येथील क्रीडा सेवांचा विस्तार होत असून राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा प्रशिक्षण व स्पर्धांची सोय झाली आहे. या सर्व यंत्रणा जवाहर स्टेडियम प्रभागात असल्याने स्थानिक नागरिकांना त्याचा भरपूर लाभ घेणे सुविधाजनक आहे. केवळ रस्ते , नाली , साफसफाई असा विकास करणे हेच जनप्रतिनिधींचे काम नसून आरोग्य , शिक्षण , उद्योग व रोजगार अशा विषयांना योग्यपणे हाताळून जनतेच्या जीवनात नवा बदल घडविणे महत्वाचे आहे. अशा शब्दात आ. संजय खोडके यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी प्रभाग क्रमांक - ७ जवाहर स्टेडियम अंतर्गत रामपुरी कॅम्प , कृष्णानगर , सिद्धार्थ नगर ,भीमनगर , मांगीलाल प्लॉट , श्रीकृष्ण पेठ , कॅम्प परिसर , आदी भागातील मतदार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन २०१७ च्या तुलनेत

# १ लाखाने वाढली मतदारांची संख्या

## नवमतदार कोणाला निवडणार?

**अमरावती/का.प्र.**

निवडणुकीत तरुणांचा मोठा प्रभाव असतो. हाच गट उत्साहाने त्यांच्या कुटुंबियांना आणि परिसरातील वृद्धांना मतदान केंद्रावर आणून मतदान करण्यासाठी पुढे नेतो. अनेक तज्ञांचा असा विश्वास आहे की तरुण कार्यकर्त्यांच्या उत्साहावर आधारित निवडणूक समीकरणे तयार होतात. परिणामी, नऊ वर्षांनी येणाऱ्या अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत तरुण पिढीचा कल हा एक दशलक्ष डॉलर्सचा प्रश्न मानला जातो. २०१७ च्या तुलनेत, मतदारांची संख्या अंदाजे ९७ हजाराने वाढून १ लाख झाली आहे.

या बदलत्या काळात, तरुण पिढीला झेन जी म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. काही महिन्यांपूर्वी देशाच्या आणि जगाच्या विविध भागात झालेल्या निषेधानंतर या भावनेला महत्त्व प्राप्त झाले आहे. अमरावतीमध्ये, प्रत्येक प्रभागात १८-२५ वयोगटातील हजारो मतदारांची संख्या वाढली आहे. २०१७ मध्ये, महानगरपालिका क्षेत्रातील मतदारांची संख्या ५.८ लाख होती. आज, महानगरपालिकेने जाहीर केलेल्या यादीनुसार, मतदारांची संख्या ६ लाख ७७ हजार पेक्षा जास्त झाली आहे. हे स्पष्ट आहे की नवीन पिढीतील मतदारांची संख्या जवळ जवळ एक लाखाने वाढली आहे. तथापि, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या तरुण मतदारांची संख्या मर्यादित असू शकते.

राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांच्या निवडणुका एकाच वेळी होणार आहेत. १५ जानेवारी रोजी मतदानाच्या दिवशी तरुण कामगार किती सक्रिय असतात आणि जास्तीत जास्त मतदारांना मतदान केंद्रावर आणण्यात त्यांना किती रस असतो हे पाहणे मनोरंजक ठरेल. तरुणांशी झालेल्या चर्चेत तज्ज्ञांनी स्पष्ट केले की कोणत्याही निवडणुकीत तरुणांचा सक्रिय सहभाग निकालावर लक्षणीय परिणाम करू शकतो. अलिकडेपर्यंत, शहरांमधील तरुण पिढी सामान्यतः निवड-णुकीत फारशी रस घेत नव्हती. त्याऐवजी मतदानाच्या दिवशी त्यांच्या पालकांना सोबत घेण्यास ते अधिक इच्छुक होते. त्यामुळे, पुढील आठवड्याच्या १५ तारखेला होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत झेन जीचा किती सहभाग असेल हे पाहणे मनोरंजक ठरेल.

प्रारूप मतदार यादीनंतर, महानगरपालिकेने अलिकडेच नवीन अंतिम यादी प्रसिद्ध केली. ज्यामध्ये १८ वर्षे वयाच्या मतदारांची नावे समाविष्ट केली गेली. यामुळे सर्व प्रभागांमध्ये मतदारांची संख्या १ वरून २२ पर्यंत वाढली आहे.प्रभाग १ मध्ये सर्वाधिक ६ हजार मतदारांची वाढ नोंदवली गेली आहे. त्याचप्रमाणे २००० आणि इतरत्र ३,००० मतदारांची वाढ झाली आहे. या आधारे, प्रशासनाने अहवाल दिला आहे की, अंतिम यादीनुसार, महानगरपालिका क्षेत्रात ३ लाख ३७ हजार ९३५ महिला, ३ लाख ३९ हजार १७७ पुरुष आणि ६८ इतर मतदार आहेत.

अमरावती महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तरुण पिढीला आकर्षित करण्याची स्पर्धा सुरू आहे. सर्व पक्षांमध्ये तीव्र स्पर्धा सुरू आहे. तरुणांना लक्षात घेऊन, पक्षांनी अनेक प्रभागांमध्ये नवीन चेहरे उभे केले आहेत. प्रभागांसाठी उमेदवार पॅनेलने तरुणाई आणि अनुभव यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यातील तरुण पिढी कोणत्या पक्षाला महापालिकेची सत्ता सोपवण्यास इच्छुक आहे हे पाहणे बाकी आहे.

# आज ई. व्ही. एम. मशीन प्रात्यक्षिकाचे आयोजन

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांसाठी ८ जानेवारीला ई. व्ही. एम. प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले आहे. महानगरपालिका सार्वत्रिक १५ निवडणुकीकरिता गुरुवार, जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

महानगरपालिकेत बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू असल्याने प्रत्येक मतदारास अ, ब, क, ड अशा चार जागांसाठी प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ४ वेळा मतदान करावे लागणार आहे, तसेच प्रभाग क्रमांक ९ वडाळी एस. आर. पी. एफ. या प्रभागासाठी अ, ब, क या तीन जागांसाठी ३ वेळा मतदान करावे लागणार आहे.यासंदर्भातील सविस्तर माहिती व मतदान यंत्र ई. व्ही. एम. वापराबाबत जनजागृती व्हावी, यासाठी ८ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका, अमरावती येथे EVM प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले आहे. सदर EVM प्रात्यक्षिकासाठी सर्व माध्यम प्रतिनिधी तसेच इच्छुक नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. या माध्यमातून मतदान प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती मिळणार असून, मतदारांमध्ये योग्य जनजागृती होण्यास मदत होणार आहे. तरी अमरावती शहरातील सर्व माध्यम प्रतिनिधी व इच्छुक नागरिकांनी मोठ्यासंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अमरावती महानगर पालिकेच्यावतीने करण्यात येत आहे.

# शहरात घरोघरी जनसंपर्क

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध प्रभागांमध्ये निवडणूक प्रचाराला वेग आला असून उमेदवार व पक्षांकडून जोरदार जनसंपर्क मोहिमा राबविण्यात येत आहेत. घरोघरी भेटी, पदयात्रा, सभा, कॉर्नर मीटिंग्स तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न उमेदवारांकडून केला जात आहे.

निवडणूक प्रचारादरम्यान विकासकामे, नागरी सुविधा, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण या मुद्यांवर भर देण्यात येत असून मतदारांच्या समस्या थेट ऐकून घेण्यावर उमेदवारांचा कल दिसून येत आहे. अनेक प्रभागांमध्ये कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रचार साहित्याचे वाटप करण्यात येत असून प्रचार फेरी, वाहन रॅली व घोषणाबाजीमुळे निवडणुकीचे वातावरण तापले आहे.दरम्यान, निवडणूक आयोगाच्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले असून प्रचारादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस व प्रशासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. बेकायदेशीर प्रचार, पैशांचा अथवा दारूचा वापर रोखण्यासाठी विशेष पथके कार्यरत असून शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# महिलांचे सक्षमीकरण आणि राजकारणातील पारदर्शकता

आपल्या देशाने स्वातंत्र्यप्राप्ती पासून आजपर्यंत तब्बल ७५ वर्षाचा टप्पा गाठून सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले. या काळात देशाच्या राजकीय व्यवस्थेने मोठ मोठे प्रगतीचे टप्पे गाठले. अर्थव्यवस्थेने लक्षणीय भरारी मारली. देशाने राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अवकाश संशोधन, वैद्यकीय, शैक्षणिक, दळणवळण, अन्नधान्य निर्मिती, विज्ञान व तंत्रज्ञान अशा सर्वच क्षेत्रात प्रगती केली. आज भारत अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जगातील चवथी महासत्ता असून संरक्षण सिध्दतेच्या बाबतीत स्वयंपूर्ण, सार्वभौम व अण्वस्त्रसंपन्न देश आहे.

साक्षरतेच्या बाबतीतही आज आपला देश बराच पुढे आहे. परंतू खेदाची बाब म्हणजे असे असतानाही आपल्या देशात महिलांची स्थिती आत्मचिंतन करण्याजोगी निश्चितच आहे. महिला सर्व क्षेत्रात वावरल्या पाहिजेत, समाजाच्या प्रवाहात त्यांच्याकडून विविध जनहिताची कामे झाली पाहिजेत, ज्या महिलांजवळ संघटनशक्ती आहे, ज्यांना समाजसेवेची आवड आहे, तळागाळातील लोकांची-गोरगरीबांची कामे करण्याची तळमळ आहे अशा महिलांना अधिकार सत्ता प्राप्त होण्यासाठीच महिलांना पन्नास टक्के आरक्षण राजकीय क्षेत्रात दिले आहे. राजकीय व्यवस्थेचा हा मूळ हेतू लक्षात घेवून प्रशासकीय पातळीवर जरी अंमलबजावणी होत असली तरी कार्यकुशल, सेवाभावी, राजकीय-सामाजिक क्षेत्रात काम करणा-या अग्रगण्य महिलांना सत्तेच्या प्रवाहात वाव दिल्या जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.

स्पष्टच सांगायचे झाल्यास, ज्या महिलांना निवडणुकीत निवडून येवून लोकांसाठी काम करायचे आहे, ज्या महिलांची जनतेमधून निवडून येण्याची सहज व पूर्ण क्षमता आहे, ज्या महिलांनी सार्वजनिक क्षेत्रात अनेक वर्षे सामाजिक कार्यकर्ता म्हणून आपले योगदान दिले आहे, तळागाळातील गोरगरीब लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन दरबारी आवाज उठवून शासनाचे लक्ष वेधले, विविध संघटनांच्या माध्यमातून काम केले अशा महिलांना अनेक ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत उमेदवारी टाळण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे.ज्यांच्याजवळ पैसा, विशेष वशीला असेल अशा अनेकांना लोकशाही व्यवस्थेतील यावर्षीच्या महानगरपालिका, नगरपालिका अशा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवारी देण्यात आल्याचे दिसून तर आले आहेच पण जनतेमध्ये सुध्दा या पंक्तिप्रपंच कार्यपध्दतीची ओरड होत आहे.



राजकारणातली ही अपारदर्शी वृत्ती लोकशाही व्यवस्थेला अतिशय घातक व नुकसान पोहचवणारी आहे. या बाबीचा राजकीय पक्षश्रेष्ठींनी गांभीर्याने विचार व आत्मचिंतन करायला हवा. ज्या महिला ग्राउंड फ्लोअरवर अहोरात्र समाजसेवा करीत आहे, ज्यांच्या समाजसेवेमुळे तळागाळातील लोकांचे हित साधल्या जाते, लोकांना प्रगतीची दिशा मिळते, ज्यांना राजकीय इच्छाशक्ती, कार्यतत्परता, कार्यप्रवणता आहे अशा महिलांना राजकीय प्रवाहात निश्चितच स्थान मिळाले पाहिजे. याबाबतीत कोणताही भेदभाव मूळीच होता कामा नये. कर्तृत्ववान महिलांना सत्तेच्या प्रवाहात स्थान मिळण्यासाठी राजकारणात पैसा, वशीला हा पॅरामिटर कधीच नसावा. आज ज्या कर्तृत्ववान महिलांना निवडणुकीत उमेदवारी देतांना टाळण्यात आले आहे त्यामुळे समाजाचे फार मोठे राजकीय नुकसान झाले आहे ही बाब सत्य आहे.

देशाच्या प्रगतीमध्ये पुरुषांसोबत स्त्रियांचाही वाटा असावा या उद्देशाने आता नव्या धोरणाप्रमाणे सर्वच क्षेत्रात पन्नास टक्के आरक्षण स्त्रियांना दिल्या गेले आहे. असे असतांना याच पृष्ठभूमीवर महिलांना आणखी सन्मानाचे स्थान मिळावे, त्यांची अस्मिता अबाधित राहावी या हेतूने राज्य सरकारने नुकतीच एक सन्मानजनक योजना आमलात आणली आहे आणि ती योजना म्हणजे 'महिला सन्मान योजना' होय.दळणवळण क्षेत्रात स्त्रियांना राज्यभरात कुठेही कमी खर्चात प्रवास करता यावा यासाठी परिवहन विभागांतर्गत बस प्रवासाच्या तिकीटामध्ये त्यांना अर्ध्या तिकीटामध्ये म्हणजे अर्धे भाडे काढून प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.उपरोक्त सुविधेमुळे अनेक शिक्षीत स्त्रिया किंवा ज्यांना काहीतरी करायचे आहे. आपले भवितव्य नोकरीच्या, शिक्षणाच्या क्षेत्रात घडवायचे आहे त्यांना प्रवासाचे दालन उघडे झाले आहे.

खासकरुन कौटुंबिक जीवन जगत असतांना अनेक महिला अश्या आहेत की ज्या नोकरी, व्यवसाय करीत नसून फक्त गृहिणी म्हणून जबाबदारी पार पाडतात. या महिलांमध्ये अनेक कुटुंब अशीही आहेत की जे आपल्या नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे प्रवास खर्च सुध्दा करण्यास सक्षम नसतात पण या गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील महिलांना आपल्या माहेरच्या लोकांच्या भेटीची आर्त इच्छा असते. या बाबीचा राज्य सरकारने सहानुभूतीपूर्वक विचार करुन महिला सन्मान योजनेचा शासन निर्णय पारीत केला व महिलांना दिलासा दिला. प्रवासाची ही सवलत देतांना सरकारने जेष्ठ नागरीकासारखी कोणतीही अट ठेवली नाही ही गोष्ट येथे खास उल्लेखनीय आहे. आपल्या माहेरी आई-वडील, भाऊ, बहिणीची भेट घेण्यासाठी कितीही दूर अंतर असले तरी अगदी अर्ध्याच भाड्यामध्ये प्रवास करुन आपल्या माहेरच्या लोकांची भेट महिलांना घेता येईल.

दुसरी विशेष बाब म्हणजे अर्ध्या भाड्याची सुविधा दिल्यामुळे ज्या रुग्ण महिला आहेत. दुर्धर आजाराने त्रस्त आहेत त्यांना आपल्या वैद्यकीय उपचारासाठी मोठ्या शहरातील हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी प्रवास खर्च कमी येणार आहे. हे ही एक उद्दिष्ट या योजनेमुळे साधल्या गेले आहे. कल्याणकारी राज्याची कल्पना व लोक कल्याणकारी योजना या दोन्हींचा संगम साधल्या गेला आहे.महिलांचा सन्मान करण्याचे धोरण, आदर्श राज्याची संकल्पना साकार करणारी ठरली असली तरी आज राजकारणात जे बडे प्रस्थ प्रस्थापित झाले आहेत ज्यांच्यामुळे राजकारणातील पारदर्शकता धुळीत मिळाली आहे हे नाकारुन चालणार नाही

**सतनाम कौर हुडा**
समाजसेविका, अमरावती
मो. ८३२९९३२४०७

# अकोल्याच्या विकासाचे शिंदेंचे अभिवचन

# विकासाला निधी कमी पडू देणार नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे





■ प्रतिनिधी | अकोला ■

**अकोला : अकोला शहराला सुंदर, स्वच्छ आणि विकसित शहर बनवण्याचे आमचे स्वप्न असून, त्यासाठी शिवसेनेला संपूर्ण सत्ता दिल्यास विकासासाठी ना निधी कमी पडू देणार, ना इच्छाशक्ती–असे ठाम अभिवचन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अकोलेकरांना दिले. अकोला महानगरपालिकेतील शिवसेना उमेदवारांच्या प्रचारार्थ जुन्या शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.**

शिंदे म्हणाले, अकोल्याने आजवर सर्वच पक्षांना संधी दिली. मात्र आता एकवेळ शिवसेनेला सेवेची संधी देऊन बघा. शहराचा योजनाबद्ध विकास करण्यावर आमचा भर राहील. नगरविकास खाते आमच्याकडे असताना अकोल्यासाठी विविध योजनांसाठी भरघोस निधी दिला आहे. शहराच्या प्राथमिक समस्या, गरजा आणि अपेक्षा आम्हाला अचूकपणे माहिती आहेत. त्यासाठी काम करणारी सक्षम टीम आमच्याकडे आहे. आम्ही दिलेला शब्द पाळणारे लोक आहोत. त्यामुळे हा तुमचा भाऊ जे बोलतो, ते जिवाची बाजी लावून करून दाखवतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, अकोल्यात शिवसेनेला सत्ता सोपवा, बाकी काळजी मी करेन. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची सर्वच खाती शिवसेनेकडे आहेत. एकदा आमच्यावर विश्वास ठेवा, अकोल्याचा कायापालट करून दाखवण्याचा माझा शब्द आहे.

यावेळी अकोला शहरासाठी शिवसेनेकडून स्वतंत्रपणे तयार करण्यात आलेल्या वचननाम्याचे लोकार्पण उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या वचननाम्यात नमूद सर्व बाबी टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी शिंदे यांनी विरोधकांवरही जोरदार टीका केली. आजवर ज्यांनी सत्ता उपभोगली, त्यांनी नागरिकांना साधे नियमित पिण्याचे पाणीही दिले नाही. मग ते शहराचा विकास काय करणार, असा टोला त्यांनी भाजपला लगावला. परिवर्तन घडवायचे असेल, तर यावेळी महापालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकवा, असे आवाहनही त्यांनी केले.

सभेचे प्रास्ताविक शिवसेना उपनेते गोपीकिशन बाजोरिया यांनी केले. या सभेला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, आमदार संजय राठोड, निरीक्षक श्रीकांत देशपांडे, शशिकांत खेडेकर, उपनेते गोपीकिशन बाजोरिया, जिल्हाप्रमुख श्रीरंग पिंजरकर, अश्विन नवले, नारायणराव गव्हाणकर, पांडे गुरुजी, विठ्ठल सरप पाटील, महिला जिल्हाध्यक्ष उषाताई वीरक, रेखाताई राऊत, शहरप्रमुख राजेश मिश्रा, वैभव चौधरी, रमेश गायकवाड, तरुण बगेरे, अल्पसंख्यांक सेलचे मोहसिन खान यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन योगेश अग्रवाल यांनी केले.



# अवैध सावकारांचे 'त्रिकोणी युद्ध'

## 'त्या' प्रभागात 'नोटा'च नागरिकांचा खरा शस्त्र!

■ प्रतिनिधी | अकोला ■

मनपा निवडणूक म्हटली की लोकप्रतिनिधी निवडण्याचा लोकशाही उत्सव; मात्र यंदा एका प्रभागात हा उत्सव थेट अवैध सावकारांच्या जत्रेत रूपांतरित झाल्याचे धक्कादायक चित्र आहे. राजकीय सभ्यतेचा मुखवटा बाजूला ठेवत तिन्ही प्रमुख पक्षांनी या प्रभागात तोडीस तोड अवैध सावकार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहेत. कुणाचा भाऊ सावकार, कुणी स्वतः सावकार, तर कुणी सावकारीतून थेट भूमाफिया बनलेला अशीच उमेदवारांची ओळख झाली आहे.



या तिन्ही उमेदवारांनी अवैध सावकारीतून कमावलेल्या बक्कळ पैशांचा अक्षरशः पाऊस प्रभागात पाडायला सुरुवात केली आहे. मतदारांना विविध आमिषे, प्रलोभने, आर्थिक मदतीचे गाजर दाखवून मते विकत घेण्याचे प्रयत्न उघडपणे सुरू आहेत. विडंबन म्हणजे, ज्यांच्याच घरांमध्ये आधी व्याजाने पैसे टाकले, अवाच्या सव्वा व्याजाने वसुली केली, त्यांच्याच दारात आज हेच सावकार 'विकास' आणि 'सेवे' च्या घोषणा देत मत मागायला उभे आहेत.

पाच वर्षांपूर्वी व्याजाच्या ओझ्याखाली पिचलेले नागरिक, आज पर्याय नसल्याने पुन्हा त्याच लोकांच्या हातात सत्ता देण्यास भाग पाडले जात आहेत. तिन्ही उमेदवार 'तोडीस तोड' असल्याने प्रभागात प्रचंड नाराजी असली तरी पर्याय शून्य असल्याची हताश भावना नागरिकांमध्ये दिसून येते. मात्र, या अंधारातही एक लोकशाहीचा दिवा आहे - नोटा!

निवडणूक आयोगाने दिलेला 'नन ऑफ द अबव्ह' (NOTA) हा पर्याय यंदा या प्रभागातील नागरिकांसाठी अत्यंत प्रभावी शस्त्र ठरू शकतो. जर नोटाचे प्रमाण लक्षणीय वाढले, तर या तिन्ही उमेदवारांना त्याचा थेट फटका बसणार आहे. भविष्यात अशा उमेदवारांना उमेदवारी मिळणेही कठीण होऊ शकते. अवैध सावकार, भूमाफिया आणि पैशांच्या जोरावर सत्ता मिळवू पाहणाऱ्यांना धडा शिकवायचा असेल, तर नागरिकांनी नोटाचा निर्भयपणे वापर करणे हीच काळाची गरज आहे. अन्यथा, आज मत विकत घेणारेच उद्या पुन्हा व्याजाने जीवन गहाण ठेवतील, हे वास्तव नाकारता येणार नाही.

# मतदार जनजागृती रॅलीला नागरिकांचा प्रतिसाद



**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ अनुषंगाने अकोला महानगरपालिका क्षेत्रात मतदान जनजागृती करण्यासाठी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले असून या अनुषंगाने आज दि. ७ जानेवारी २०२६ रोजी अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये जनजागृती पर वाहन, पथनाटय वाहन, आठ चित्ररथ व कचरा संकलन घंटागाडी, मोटर सायकल इत्यादीसह विविध जनजागृतीपर फलक रॅलीमध्ये समाविष्ट करण्यात आले होते. सदर रॅलीची सुरूवात अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथे मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.सुनिल लहाने आणि महाव्यवस्थापक प्रशासन डॉ.संजय गर्कल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीची सुरूवात करण्यात आली. तसेच सदर रॅली, ओपन थिएटर मार्गे फतेह चौक, संतोषीमाता मंदीर चौक, रामदास पेठ पोलीस स्टेशन मार्गे रेल्वे स्टेशन रोड, गड्डम प्लॉट, सातव चौक, गणेश स्वीट मार्ट, जठार पेठ चौक, सिव्हिल लाइन चौक मार्गे मोठे पोसस्ट ऑफिस ते नवीन बस स्थानका समोरून महानगरपालिका मुख्य कार्यालय येथे सामुहिकरित्या मतदान शपथ घेऊन सदर रॅलीचे समारोप करण्यात आले.

# ॲक्शन टेसाकडून 'टेसा सलाम' उपक्रमांतर्गत अकोल्यात कारपेंटर्स मेगा मीट

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतातील एमडीएफ, एचडीएचएमआर, बॉयलो आणि पार्टिकल बोर्डसारख्या इंजिनिअर्ड पॅनल उत्पादनांमध्ये अग्रगण्य असलेल्या ॲक्शन टेसा कंपनीतर्फे कारपेंटर्सच्या सन्मानार्थ आयोजित 'मेगा कारपेंटर्स मीट – टेसा सलाम' हा भव्य कार्यक्रम सोमवारी (५ जानेवारी) सायंकाळी अकोला येथील व्ही. एस. हॉटेलमध्ये उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमास कंपनीचे जीएम मनोज उपाध्याय, ब्रांच मॅनेजर राजन दीक्षित, विदर्भ व छत्तीसगड विभागातील सर्व सेल्स प्रतिनिधी तसेच अकोला जिल्ह्यातील वितरक व मोठ्या संख्येने कारपेंटर्स उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी कारपेंटर्स बांधवांचे मनःपूर्वक स्वागत करून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन करताना डीजीएम अमिताभ घोषाल यांनी सांगितले की, कारपेंटर्सच्या कुशल कारागिरीमुळेच देशभरातील घरे व व्यावसायिक ठिकाणांना सौंदर्य आणि मजबुती मिळते. त्यांच्या या अमूल्य योगदानाचा सन्मान करण्यासाठी ॲक्शन टेसा सदैव कटिबद्ध आहे.

या मेगा मीटच्या माध्यमातून कारपेंटर्सना आधुनिक तंत्रज्ञान, नवीन डिझाइन ट्रेंड्स तसेच नाविन्यपूर्ण संकल्पनांची माहिती देण्यात आली. 'कोणीच नाही असा' या ॲक्शन टेसाच्या ब्रँड तत्त्वज्ञानाशी सुसंगत असलेला हा उपक्रम दर्जा आणि उत्कृष्टतेवर भर देणारा असल्याचेही त्यांनी नमूद केले. गेल्या एक दशकापासून ॲक्शन टेसा अशा उपक्रमांच्या माध्यमातून कारपेंटर्सशी जवळीक साधत प्रशिक्षण व उपयुक्त माहिती देत असून, यामुळे लाकूड उद्योगातील नाते अधिक दृढ होत आहे. दरम्यान, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक अजय अग्रवाल यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे कारपेंटर्सप्रती कृतज्ञता व्यक्त केली. 'कारपेंटर्स हेच लाकूड उद्योगाचा कणा आहेत. त्यांच्या मेहनत, कौशल्य आणि सर्जनशीलतेमुळे उद्योगाला नवनवीन उंची मिळत आहे,' असे ते म्हणाले. उत्साही वातावरण, संवाद आणि आपुलकीच्या भावनेत या कार्यक्रमाचा समारोप झाला.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे ज्ञानेश्वर रुपराव बाळापुरे यांचे मालकीचे पश्चीमेकडील ले आऊट प्लॉट क्र. ३४/अ, शेत सर्वे क्र. २४/३, चे एकून क्षेत्रफळ ५११.०१ चौ.फुट., असून त्यास चतुर्सिमा पूर्वेस - वानखडे चे घर, पश्चिमेस - सर्विस लाईन, उत्तरेस - ३० फुटाचा ले आऊट रस्ता, दक्षिण – रोठे चे घर, मौजे - कौलखेड ता. जी. अकोला, याचे साखळीचे मूळ रजी. खरेदी खत क्र. २७५५ दिनांक ०८/०७/२००४, मी दि. ०४/१२/२०२६ रोजी अकोट फैल चौकात हरवले आहे त्याबाबत ज्ञानेश्वर रुपराव बाळापुरे यांनी पोलीस स्टेशन अकोट फैल, अकोला, ता. जी. अकोला येथे दि. ०५/०१/२०२६ रोजी तक्रार दिली आहे त्याचे तक्रार क्र. २६/२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ७ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :-०६/०१/२०२६

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५८३८२४२

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३०३/२०२५ — प्रोसेस नं.१८६/२०२६
चौ.ता. ०६/०२/२०२६ — दिनांक : ०३/०१/२०२६

**अर्जदार :** १. ललिता सुरेश नेरकर २. अश्विनकुमार सुरेश नेरकर ३. सौ. माधुरी प्रशांत बेलोकार रा. सुरवाडा, पोस्ट चमक बु. ता. अचलपूर, जि. अमरावती ४. अभिजीत सुरेश नेरकर नं. १, २ व ४ रा. कोठारी वाटिका, संतोष नगर, खडकी - २, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुरेश रामचंद्र नेरकर
**पत्ता :-** रा. कोठारी वाटिका, संतोष नगर, खडकी- २, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेश रामचंद्र नेरकर यांचे दि. १०/०१/२०२४ रोजी मेन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला. निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११/२०२६ — प्रोसेस नं.२९१/२०२६
चौ.ता. १०/०२/२०२६ — दिनांक : ०६/०१/२०२६

**अर्जदार :** १. गोकुळ व्यंकट इंगोले रा. हनुमान मंदिर जवळ, ढोमणे कॉलनी, शिवर. अकोला. ता. जि. अकोला. २. व्दारकाबाई व्यंकट इंगोले रा. दोनवाडा, ता. जि. अकोला. ह. मु. रा. हनुमान मंदिर जवळ, ढोमणे कॉलनी, शिवर, अकोला. ता. जि. अकोला. ३. निर्मला राहुल आठवले रा. शिवर, अकोला. ता. जि. अकोला. ४. प्रमिला अन्ना गवई रा. ढोणे कॉलनी, शिवर, अकोला. ता. जि. अकोला. ५. सुभाष व्यंकट इंगोले रा. गॅलेक्सी अपार्टमेंट जवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ६. सुवर्णा सुभाष सदांशिव रा. निंभोरा, ता. जि. अकोला. ७. सुशिला ओंकार भटकर रा. केळीवेळी, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : व्यंकट नंगाजी इंगोले
**पत्ता :-** रा. हनुमान मंदिर जवळ, ढोमणे कॉलनी, शिवर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत व्यंकट नंगाजी इंगोले यांचे दि. १६/०१/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३०३/२०२५ — प्रोसेस नं.१८६/२०२६
चौ.ता. ०६/०२/२०२६ — दिनांक : ०३/०१/२०२६

**अर्जदार :** १. ललिता सुरेश नेरकर २. अश्विनकुमार सुरेश नेरकर ३. सौ. माधुरी प्रशांत बेलोकार रा. सुरवाडा, पोस्ट चमक बु. ता. अचलपूर, जि. अमरावती ४. अभिजीत सुरेश नेरकर नं. १, २ व ४ रा. कोठारी वाटिका, संतोष नगर, खडकी-२, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुरेश रामचंद्र नेरकर
**पत्ता :-** रा. कोठारी वाटिका, संतोष नगर, खडकी-२, अकोला, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेश रामचंद्र नेरकर यांचे दि. १०/०१/२०२४ रोजी मेन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला. निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२५५/२०२५ — प्रोसेस नं.२०४५८/२०२५
चौ.ता. २०/०१/२०२६ — दिनांक : १२/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती चंपाबेन भिखालाल उर्फ भिखुलाल जोबनपुत्रा २. राजेंद्रकुमार भिखालाल उर्फ भिखुलाल जोबनपुत्रा ३. हरिदास भिखालाल उर्फ भिखुलाल जोबनपुत्रा ४. सुधा भिखालाल उर्फ भिखुलाल जोबनपुत्रा सर्व १ ते ४ रा अमृतवाडी जवळ, न्यु राधाकिशन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. संगिता सुरेश राजा उर्फ संगीता भिखालाल उर्फ भिखुलाल जोबनपुत्रा रा. लाटेबाई शाळेजवळ, शारदा नगर, अमरावती, ता. जि. अमरावती. ४४४६०६

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : भिखुलाल उर्फ भिखालाल वसंतजी जोबनपुत्रा
**पत्ता :-** रा. अमृतवाडी, न्यु राधाकिशन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिखुलाल उर्फ भिखालाल वसंतजी जोबनपुत्रा यांचे दि. १४/ ११ / २०२५ रोजी अमृतवाडी जवळ, न्यु राधाकिशन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे छगन प्रल्हाद धौसे यांचे मालकीचे ले आऊट प्लॉट क्र. ७०, शेत सर्वे क्र. ७२/क, चे एकून क्षेत्रफळ ५३८.०० चौ. फुट., असून त्यास चतुर्सिमा पूर्वेस - प्लॉट क्र. ७, पश्चिमेस - प्लॉट क्र. ६९, उत्तरेस - ९ मीटर रुंदीचा चा रस्ता, दक्षिण - सर्विस लाईन, मौजे - मलकापूर, ता. जी. अकोला, याचे साखळीचे मूळ रजी. खरेदी खत क्र. ३६०० दिनांक २१/१०/२००२ मी दि. ०३/०१/२०२६ रोजी खरेदी विक्रीच्या कामाने कलेक्टर ऑफिस मध्ये जात असताना कौलखेड ते सिंधी कॅम्प रोडवर हरवले आहे त्याबाबत छगन प्रल्हाद धौसे यांनी पोलीस स्टेशन खदान अकोला, ता. जी. अकोला येथे दि. ०५/०१/२०२६ रोजी तक्रार दिली आहे त्याचे तक्रार क्र. ११/२६ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर ७ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :– ०६/०१/२०२६

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५८३८२४२

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२५१/२०२५ — प्रोसेस नं.२३५/२०२६
चौ.ता. २३/०१/२०२६ — दिनांक : ०५/०१/२०२६

**अर्जदार :** १. बबिता अनिल पारधे २. अभिजीत अनिल पारधे ३. अंकिता अंकुश विरूळकर ४. अनिकेत अनिल पारधे सर्व रा. न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अनिल विठ्ठलराव पारधे
**पत्ता :-** रा. न्यू खेतान नगर, कौलखेड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनिल विठ्ठलराव पारधे यांचे दि. २६/१०/२०२५ रोजी न्यु खेतान नगर, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ४२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अतिवृष्टीमुळे झालेले संत्रा पिकांचे नुकसान भरपाईपोटी शासनाकडून १२.३८ कोटी रुपये मंजुर

## खा. अमर काळे यांच्या पाठपुराव्याला यश

**आर्वी/जनमाध्यम**

आष्टी, कारंजा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीने संत्राबागांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले या नुकसानीची पाहणी करण्याच्या दृष्टीने खा. अमर काळे यांनी आष्टी तालुक्यातील लहान आर्वी येथे पाहणी केली व मा. जिल्हाधिकारी यांच्याशी दुरध्वनीवर संपर्क साधून तात्काळ नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाईचे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते.

वर्षभर वाट पाहून हातातोंडाशी आलेले संत्र्याचे पिक झालेल्या अतिवृष्टीने गळून पडले. त्यामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्याचे निमित्ताने खासदार अमर काळे यांनी लहान आर्वीत आष्टी भागात दौरा केला. यात हातातोंडाशी आलेला संत्रा पिक अतिवृष्टीने संपुर्ण गळून पडला असून शेतकऱ्यांचे संत्रा पिकाचे व शेतांचे पण मोठया प्रमाणात नुकसान झाले.आधीच शेतकरी बँकेच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबून असून यावर्षी आलेले संत्र्याचे पिक पाहून शेतकऱ्यांच्या मनात आशा व आनंद निर्माण झाला होता. परंतु इथे सुध्दा शेतकऱ्यांवर असलेली साडेसाती आडवी आली व हातातोंडाशी आलेले संत्र्याचे पिक पुर्णतः अतिवृष्टीने गळून पडले. झालेले नुकसानीची दाहकता व शेतकऱ्यांची अवस्था बघता खा.अमर काळे यांनी तात्काळ जिल्हाधिकारी यांना फोनवर बोलणे करुन तात्काळ नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते.



त्यानुसार महसुल व कृषी ? विभागाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाईचा १३ कोटींचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनास सादर करण्यात आला होता. या नुकसान भरपाई प्रस्तावाला शासनाकडून मंजूरी देण्यात आली व रु. १२.३९ कोटी मदत विशेष बाब म्हणून शासनाने मंजूर केली. खा. अमर काळे यांनी शेतकऱ्यांच्या संत्रा बागांच्या झालेल्या नुकसानीची वेळीच दखल घेऊन प्रशासनाला पंचनामे करण्याचे निर्देश देऊन नुकसान भरपाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडून शासनास सादर करण्याचे निर्देश दिले होते. याबाबत खा. अमर काळे यांचे कडून सतत पाठपुरावा सुरु होता. याचीच फलश्रृती म्हणून शासनाने वर्धा जिल्हयातील आर्वी उपविभागातील आर्वी, कारंजा व आष्टी येथील संत्रा पिकांचे अवकाळी पाऊस व तापमानामुळे मृग बहार गळून झालेल्या नुकसानीपोटी महाराष्ट्र शासनाने रु. १२.३९ कोटी मदत मंजूर केली. सदर बाब आर्वी, आष्टी, कारंजा या भागातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून झालेल्या नुकसानीची काही प्रमाणात का होई ना शासनाकडून मदत मिळाल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. खा. अमर काळे यांनी संत्रा बागाईतदारांच्या व्यथेची तात्काळ दखल घेतल्याबाबत सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी खासदार अमर काळे यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

## संक्षिप्त

### गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**वर्धा** - समतानगर परिसरात गळफास घेऊन एका तरुणाने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. हर्षल नाकाडे (वय १९) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो सावंगी (मेघे) येथील बीएससी नर्सिंग महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेत होता व समतानगर येथे भाड्याच्या खोलीत राहत होता. आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नसून, याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी नोंद केली आहे.

### आजारी पतीवर पत्नीचा बॅटने हल्ला

**वर्धा** - सावंगी (मेघे) पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समतानगर येथे आजारी पतीवर पत्नीने बॅटने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. दीपक हे आरोग्य विभागात आरोग्य सेवक असून, लकव्याचा झटका आल्याने त्यांची प्रकृती बिघडलेली आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर पत्नीने रागाच्या भरात पतीच्या डोक्यावर बॅटने वार केला. या प्रकरणी पत्नीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### दुचाकींच्या समोरासमोर धडकेत दोघे जखमी

**हिंगणघाट** - शहरातील मोहता चौक परिसरात दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दोघे जखमी झाले. कन्हैय्या भक्षी व महेश नक्षिणे हे दुचाकीने जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकीने त्यांना धडक दिली. अपघातात दोघांनाही दुखापत झाली. या प्रकरणी तक्रारीवरून संबंधित दुचाकी चालकाविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

### १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिनाचे आयोजन

**वर्धा-** भारतीय ऑलिंपिक पदक विजेते स्व. खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जयंती निमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने १५ जानेवारी रोजी राज्य क्रीडा दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात शैक्षणिक संस्था, क्रीडा संघटना व नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. क्रीडा संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले असून विविध क्रीडा स्पर्धा व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव क्रीडा दिन कार्यक्रम प्रसंगी करण्यात येणार आहे. खाशाबा जाधव यांच्या जिवनावर व्याख्यान तसेच तरुणांसाठी क्रीडा क्षेत्रातील करीअरच्या संधी या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये तसेच क्रीडा संघटनांनी आपल्या स्तरावर उपक्रम राबवून याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयास सादर करावी, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.

# श्रद्धा, संस्कार आणि सेवेतून उजळले ७५ वर्षांचे अमृतपर्व

## चिन्मय मिशनची 'अमृत गौरव यात्रा' उद्या वर्धेत;

**वर्धा /जनमाध्यम**

श्रद्धा, ज्ञान आणि सेवाभावाच्या त्रिसूत्रीवर उभ्या असलेल्या चिन्मय मिशन संस्थेच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने काढण्यात आलेली अमृत गौरव यात्रा उद्या दि. ९ रोजी सकाळी १० वाजता वर्धा येथे दाखल होत आहे. पुणे येथून प्रारंभ झालेली ही यात्रा येथील साई मंदिरात पोहोचणार असून, त्यानिमित्ताने चिन्मय मिशनच्या गौरवशाली कार्याचा भावस्पर्शी मागोवा घेणारी माहितीपूर्ण प्रदर्शनीही वर्धावासीयांसाठी खुली होणार आहे.

गेल्या साडेसात दशकांत लाखो साधकांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या चिन्मय मिशनच्या आध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक कार्याचे हे अमृतपर्व आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतून प्रवास करत असलेल्या या यात्रेचे नेतृत्व स्वामी अनुकुलानंद (कोईम्बतूर), स्वामी प्रत्यानंद (नांदेड), ब्रह्मचारिणी तारिणी चैतन्या तसेच चिन्मय मिशनच्या प्रशिक्षित युवा वर्गाकडून करण्यात येत आहे. ज्ञानप्रसार, संस्कारनिर्मिती आणि सेवाभावाचा संदेश देणारी ही यात्रा भाविकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.वर्धेत अमृत गौरव यात्रेचे स्वागत जय महाकाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी चिन्मय सेवा सदन ट्रस्टच्या पदाधिकारी डॉ. मीना राव, अरुणा कुळकर्णी, ब्रह्मचारी सुचेत चैतन्य तसेच चिन्मय साधना केंद्र, पवनारच्या प्रमुख स्वामीनी भद्रानंदा यांची उपस्थिती लाभणार आहे.या यात्रेसोबत साकारण्यात आलेली प्रदर्शनी ही चिन्मय मिशनच्या ७५ वर्षांच्या तपश्चर्येची, सेवाकार्याची आणि अध्यात्मिक जागृतीची साक्ष ठरणार आहे. जीवनमूल्ये, आत्मज्ञान आणि समाजसेवेचा संदेश देणाऱ्या या सोहळ्यात सर्व साधक, भक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे भावनिक आवाहन चिन्मय मिशनचे अध्यक्ष सुरेश भडांगे व सचिव प्रदीप अग्निहोत्री यांनी केले आहे.

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकाच्या नववर्ष विशेषांकाचे प्रकाशन

## नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ व मुख्याधिकारी देशमुख यांच्या हस्ते

**वर्धा/जनमाध्यम**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७१३/२०२५
**पुजाबाई व ईतर -वि- प्रभात**
पुढील ता.१६.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः** 1. Pujabai Yogesh Yawalikar, Age 44 Yrs. Occu.: Household
R/o Gajanan Township Kathora Road, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः**
1. Prabhat Yogesh Yawalikar, Age 25 Yrs. Occu.: Education
2. Ayush Yogesh Yawalikar, Age 16 Yrs. Occu.: Education.
Appli.No.2, Minor, through it guardian Appli.No.1, his brother
Both R/o Gajanan Township Kathora Road, Amravati.

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **योगेश गोविंदराव यावलीकर** हे दिनांक 17.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रभात व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रभात व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२५.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९८६/२०२५
**श्रीमती रेखा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Rekha Arvind Joshi, Age 77 Yrs. Occu.: Household
2. Aniruddha Arvind Joshi, Age 46 Yrs. Occu.: Service
3. Bhargav Arvind Joshi, Age 41 Yrs. Occu.: Business
4. Darshan Arvind Joshi, Age 37 Yrs. Occu.: Service
All R/o Madhav Nagar, Near HVPM College, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **अरविंद वामनराव जोशी** हे दिनांक 04.10.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रेखा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेखा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११६**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# रमाई आवास योजनेच्या दुसरा टप्पा वितरणासाठी २८.८४ कोटींच्या निधी

## आ.सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्याला यश, अर्थसंकल्पिय तरतुदीचा अमरावतीला प्रत्यक्ष लाभ

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगर पालिका क्षेत्रातील रमाई आवास योजनेच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील अनुदान मिळण्याची प्रतीक्षा आता संपली आहे. अमरावतीच्या आ.सुलभा खोडके यांच्या सातत्यपुर्ण पाठपुराव्याने आता अमरावती महापालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेच्या कामांना गती देण्यासाठी शासनाकडून २८.८४ कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून शहरी भागात अर्धवटरीत्या रखडलेल्या रमाई आवास योजनेच्या कामांना गती मिळणार असल्याने लाभार्थ्यांच्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. याबद्दल आ.सुलभा संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

अमरावती महानगर पालिकेने वर्ष २०२५ मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत २,००० लाभार्थ्यांचे उद्दिष्टय ठेवून यादीला मंजुरी दिली होती. या करिता साधारणतः ५० कोटींची आवश्यकता असल्याने अमरावतीच्या आ. सुलभा खोडके यांनी सुरुवातीलाच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा करिता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. अशातच गेल्या मार्च २०२५ चा अर्थसंकल्प मांडत असतांना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना. अजितदादा पवार यांनी रमाई आवास योजनेकरिता अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद केली. तसेच रमाई आवास योजनेच्या कामासाठी अमरावती महापालिकेला टप्पाटप्याने निधी मिळणार असल्याने



त्यापैकी एप्रिल २०२५ मध्ये पहिल्या हप्त्यात अमरावती महानगर पालिकेला रमाई आवास योजनेकरिता २१.१६ कोटींचा निधी वितरित करण्यात आला. सदर निधीतुन लाभार्थ्यांच्या खात्यात आरटीजीएस प्रणाली द्वारे योजनेचा प्रथम हप्ता जमा होताच शहरात रमाई आवास योजनेच्या कामांना गती मिळाली. अमरावती शहरातील लाभार्थ्यांना प्रथम टप्प्यात २१.१६ कोटींचे वाटप झाल्यानंतर ज्यांचे योजनेच्या निकषाप्रमाणे सज्जा -लेंटर पर्यंत बांधकाम झाले आहेत, अशा ८०६ लाभार्थ्यांचे रमाई आवास योजनेची कामे प्रगतीपथावर असतांना लाभार्थ्यांना आता दुसऱ्या टप्प्यातील अनुदानाची प्रतीक्षा होती. या संदर्भात आ. सुलभा खोडके यांनी अमरावती महानगर पालिका आयुक्तांशी चर्चा करून या संदर्भात उर्वरित निधी प्राप्त होण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची सूचना केली. महापालिकेकडून तसा प्रस्ताव पाठविण्यात आल्या नंतर आ.सौ.सुलभाताई खोडके यांनी शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून राज्याच्या अर्थसंकल्पिय तरतुदीनुसार अमरावती महानगर पालिकेसाठी रमाई आवास योजनेचा उर्वरित २८.८४ कोटींचा निधी लवकरात लवकर वितरित करण्याची मागणी पत्राद्वारे केली. दरम्यान या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना सुद्धा अवगत करण्यात आल्याने त्यांनी आयुक्त,समाज कल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांना रमाई आवास योजनेचा निधी वितरित करण्यासंदर्भात निर्देशित केले. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या समाज कल्याण आयुक्तालय पुणे, यांनी अमरावती महानगर पालिका क्षेत्राकरिता रमाई आवास योजनेसाठी २८.८४ कोटींचा निधी वितरित केला आहे. सदर निधीतुन रमाई आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पात्र ठरलेल्या ८०६ लाभार्थ्यांच्या खात्यात आरटीजीएस प्रणाली द्वारे अनुदान जमा करण्यात येत आहे. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून शहरी भागात अर्धवटरीत्या रखडलेल्या रमाई आवास योजनेच्या कामांना गती मिळणार असल्याने लाभार्थ्यांच्या हक्काच्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण होणार आहे. याबद्दल आ.सुलभा संजय खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजित पवार यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे.

# प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव आजपासून

## क्रीडा महाकुंभात तीन हजार विद्यार्थी करणार क्रीडेचे सादरीकरण

**अमरावती/क्रा.प्र.**

शालेय जीवनात विद्यार्थ्यांमधील खेळ व कलागुणांना वाव मिळावा या हेतूने शिक्षण विभाग जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन ८ ते १० जानेवारी दरम्यान श्री.शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे होणार आहे.या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन ८ जानेवारी, २०२६ सकाळी ११ वा.विभागीय आयुक्त डॉ.श्वेता सिंघल यांच्या हस्ते होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र ह्यांच्या अध्यक्षेत होणाऱ्या या कार्यक्रमास विशेष अतिथी जिल्हाधिकारी आशिष येरेकर, प्रमुख अतिथी म्हणून



शिक्षण उपसंचालक निलिमा टाके, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुलकर्णी, विलास मरसाळे, बालासाहेब बायस, बाळासाहेब रायबोले, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिल्पा पवार आदींची उपस्थिती राहणार आहे. या क्रीडा महोत्सवास उपस्थित राहण्याचे आवाहन शिक्षणाधिकारी सतिश मुगल,प्रिया देशमुख, सुरेश वाघमारे उपशिक्षणाधिकारी गंगाधर मोहने, रजनी शिरभाते, निखिल मानकर, इम्रान खान अधीक्षक नरेंद्र गायकवाड, क्रीडा संयोजक प्राविण खांडेकर, सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख सर्व शिक्षक संघटना पदाधिकारी तथा समस्त मुख्याध्यापक, शिक्षक वृंद जिल्हा परिषद, अमरावती यांनी केले आहे असे क्रीडा महोत्सवाच्या प्रसिध्दी समितीने कळविले आहे.या जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवात प्राथमिक विभागामध्ये प्राथमिक विभाग कबड्डी (मुले), कबड्डी (मुली), खो-खो (मुले), खो-खो (मुली), लंगडी (मुली), वैयक्तीक खेळ-७५ मीटर धावणे (मुले), ७५ मीटर धावणे (मुली),लांब उडी (मुले),लांब उडी (मुली), उंच उडी (मुले), उंच उडी (मुली), माध्यमिक विभाग-कबड्डी (मुले), कबड्डी (मुली),खो-खो (मुले), खो-खो (मुली),हॉलीबॉल (मुले), हॉलीबॉल (मुली), टेनिक्वॉईड दुहेरी (मुली), बॅडमिंटन दुहेरी (मुली), बॅडमिटन दुहेरी (मुले), १००' ४ रीले (मुले), १०० ६ ४ रीले (मुली),१०० मीटर धावणे (मुले), १०० मीटर धावणे (मुली)लांब उडी (मुले),लांब उडी (मुली), उंच उडी (मुले), उंच उडी (मुली), कुस्ती (मुल), गोळाफेक(मुले), बॅडमिंटन एकेरी (मुली), बॅडमिंटन एकेरी (मुले), टेनिक्वॉईड एकेरी (मुली)या खेळाचा समावेश राहणार आहे.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पत्रकारांचा सन्मान



**खल्लार** - दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र नवनिर्माण सेना दर्यापूर शहर व ग्रामीणच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्य महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मनोज तायडे यांनी पत्रकार दिनाचे आयोजन करुन उत्साहात साजरा करण्यात आला. दर्यापूर तालुक्यातील सर्व पत्रकारांचा सन्मान सोहळा हॉटेल ग्रीन लॉट्स येथे पार पडला. यावेळी गजानन देशमुख, अनंत बोबडे, शशांक देशपांडे, विलास महाजन, युवराज डोंगरे, सचिन बोदडे, राम रघुवंशी,गौरव टोळे, सचिन मानकर, धनंजय धांडे, शुभम घाटे, अमोल कंटाळे, शिलवंत रायबोले, महेश बुंदे, सुरज देशमुख, धनंजय देशमुख, गणेश साखरे,गजानन चौरपगार यांचा सन्मान करुन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष मनोज तायडे, प्रथमेश राऊत, विद्यार्थी सेना अध्यक्ष पंकज कदम, संदीप झळके, शहराध्यक्ष, अनिकेत सुपेकर, उपशहर अध्यक्ष, जनार्दन पाटील गावंडे बंडूभाऊ सांगोले ,मेहर ठाकरे, संतोष रामेकर,गोपाल तराळ उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कांबळे लेआऊट येथे धम्मयात्रा समापन व महिला मुक्ती दिन



**अमरावती/का.प्र.**

स्थानिक मानव विकास बहुउद्देशीय मंडळ तसेच महिला उपासक मंडळाद्वारा कांबळे लेआऊट येथील विहारामध्ये दोन दिवशीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. माता सावित्रीबाई फुले जयंती आणि बौद्ध धम्मयात्रा समापन सोहळा साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महिला उपासक मंडळाद्वारा बुद्ध वंदना तसेच माता सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त अभिवादन सभा घेण्यात आली. याप्रसंगी महिला उपासिकानी त्यांच्या भाषणातून अभिवादनपर कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाचो सूत्रसंचालन आयु. सुनील वंजारी यांनी केले. दुसऱ्या दिवशीचे कार्यक्रमामध्ये मानव विकास संस्थेचे पदाधिकारी यांचा बौद्ध धम्म स्थळांचा अभ्यास दौरा आटोपून परतल्यानंतर त्यांचे स्थानिक नागरिकांच्या वतीने यथोचित स्वागत करण्यात आले. या दौऱ्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष दीपक प्र. खडसे, सुनील वंजारी, चंद्रकांत कोष्टी, दीपमाला मेश्राम व त्यांचे कुटुंबियांचा समावेश होता. याप्रसंगी आ. धम्मचारी मनायू यांनी धम्मदेसना दिली. त्यांनी बौद्ध धम्म दैनंदिन जीवनात कसा आचरण्यात आणावा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर बुद्ध विहार समन्वय समिती मार्फत घेण्यात आलेल्या पालीभाषा परीक्षेचे प्रमाणपत्र व बक्षीस वितरण आ. धम्मचारी मनायू यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बुद्ध विहार समन्वय समितीचे जिल्हा समन्वयक पी.जी.ढोले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक तथा संचालन मंडळाचे अध्यक्ष दीपक प्र. खडसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे पदाधिकारी आयु. चंद्रकांत कोष्टी, सुनील वंजारी यांचे विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी पी.जी. ढोले, सिद्धार्थ नागदिवे, अजय थुल, उज्ज्वला मोहाळे, रेखाताई सपकाळे, अर्चना रंगारी, माया गोष्टी, भारती गुडधे, घरडेताई, नेहा खडसे, इंदु रंगारी, नम्रता घरडे, सुनिता वानखडे, घोडेस्वार व ईतर महिला मोठ्या संख्येने पुरुष व महिला नागरिक उपस्थित होते.

# शस्त्र प्रदर्शन कार्यक्रमाला विद्यार्थ्यांची भेट

**तिवसा/वार्ताहर**

पोलीस स्टेशन तिवसा येथे महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त शस्त्र प्रदर्शन व त्यासंबंधी माहिती घेण्यासाठी या.द.व. कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक यांनी भेट दिली.



तिवसा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाल उपाध्याय यांनी महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त माहिती देत असताना सांगितले की, ०२ जानेवारी १९६१ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस ध्वज हा पोलीस विभागाला दिला. त्या दिवसाची आठवण म्हणून महाराष्ट्र पोलीस दिन म्हणजेच रेसिंग डे हा दरवर्षी विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून तिवसा पोलीस स्टेशनच्या वतीने साजरा करण्यात येतो, पोलीस उपनिरीक्षक पिसाळकर यांनी विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनमध्ये चालणाऱ्या कामकाजाविषयी आणि पोलीस स्टेशनमध्ये असणाऱ्या विविध विभागांविषयी विस्तृत असे मार्गदर्शन केले.त्यानंतर पोलीस कॉन्स्टेबल चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना विविध शस्त्रांबद्दल माहिती दिली. कोणत्या प्रसंगी कोणती शस्त्रे वापरली जातात, तसेच त्यांची मारक क्षमता इत्यादी विषयी माहिती दिली. कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना बिस्कीटचे पॅकेट वाटप करण्यात आले.महाविद्यालयाच्या वतीने प्राध्यापक योगेश देशमुख यांनी महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिनानिमित्त पोलीस बंधू आणि भगिनींना शुभेच्छा दिल्या तसेच पोलीस विभागाच्या लोगो मध्ये असणाऱ्या 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याचा अर्थ विद्यार्थ्यांना समजून सांगितला. पोलीस विभाग आणि सर्व सामान्य नागरिक यांच्यातील नाते दृढ करण्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने आभार मानले. या उपक्रमास खुफिया पोलीस प्रमोद इंगळे, महेश सर तथा महाविद्यालयाचो संदीप चक्रनारायण , संदीप दहाट यांचे विशेष सहकार्य लाभले.याप्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. के.जी. सोनटक्के, प्रा. कुलदीप गावंडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. राजकुमार तिडके, प्रा. भरत गोंजारे, प्रा. अक्षय धुर्वे, रामलाल चव्हाण उपस्थित होते.

## पीडीएमसी येथे उमेद-पंख-विश्वासाचे कार्यक्रमांतर्गत

# खुशबू सुखदेवे हिला कृत्रिम पाय बसविण्यात यश

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त 'उमेद-पंख-विश्वासाचे' या सामाजिक उद्देशाने दिव्यांग बांधवांसाठी मोफत जयपुर फुट वितरणाचा उपक्रम डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे) आणि दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे.

जयपुर फुट या सामाजिक उपक्रमांतर्गत दिव्यांगांसाठी आशेचा किरण ठरणा-या कार्यातून आज भंडारा जिल्ह्यातील मेंढा चपराळा या गावची सातव्या वर्गात शिकत असलेली खुशबू विनोद सुखदेवे हया गरजू मूलीला कृत्रिम पाय (जयपुर फुट) बसविण्यात आला. या उपक्रमामुळे तिच्या आयुष्यात नव्या आशा निर्माण झाल्या असून ती पुन्हा स्वावलंबी जीवनाकडे वाटचाल करू शकणार आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने महागडी उपचार पध्दती तिच्यासाठी शक्य नव्हती.





ही बाब लक्षात घेऊन जयपुर फुट उपक्रमाच्या माध्यमातून तिला मोफत कृत्रिम पाय बसविण्याचा निर्णय घेण्यात आला.तज्ञ डॉक्टर व तांत्रिक कर्मचा-यांच्या उपस्थितीत योग्य मोजमाप करून आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जयपुर फुट बसविण्यात आलेला आहे. पाय बसवल्यानंतर मुलीने स्वतःच्या पायावर उभे राहत चालण्याचा प्रयत्न केला. संबंधित मुलीच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त करत आयोजक व जयपुर फुट संस्थेचे मन:पुर्वक आभार मानले आहे. यावेळी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, इंडियन रेड कॉस सोसायटी अकोलाचे चेअरमन डॉ. किशोर मालोकर, जयपुर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक्ट रामेश्वर मणियार (पुणे), दि अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशनच्या अध्यक्ष आर्टिस्ट रजनी अंबादे, आकाश अंबादे, जयपूर फुटचे मानद सचिव संदिपजी पुंडकर, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड, जयपुर फुटचे तांत्रिक कर्मचारी सुर्यनारायनजी पांडे, सामाजिक कार्यकर्ता अक्षय पाथ्रीकर, विनोद सुखदेवे उपस्थित होते.

## संक्षिप्त



### गांधी विद्यालय येथे सावित्रीबाई फुले जयंती

**अंजनगावबारी**-न्यू एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित गांधी विद्यालय बडनेरा येथे ३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले जयंती उत्सव संपन्न झाला. याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिगंबर करडे यांच्या शुभ हस्ते प्रतिमा पूजन, हारार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्याप्रसंगी शरयू बारब्दे या विद्यार्थिनीने सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली. तिने तिच्या मनोगतातून प्रत्येक कुटुंबातील मुलगी शिकली तरच कुटुंबाची समाजाची, पर्यायाने देशाची, प्रगती होईल असा संदेश अभिनय व मनोगतातून व्यक्त केला. तसेच वंशिका गणवीर, अवंतिका कैथवास, नयना बोधले, आरुषी जंवजाळ, प्राची हजारे, तब्बू राऊत, आराध्य भोकरे, ईश्वरी निचत, विधिना मेश्राम, पायल आकांते, सिद्धी गोंडाने, विधी खंडारे, रियांश लांडोरे, कृष्णा मुळे, धनराज नेवारे, भूमिका हरवणे, प्रिया धुर्वे इत्यादी मुलींनी मनोगत व्यक्त केली. नीलिमा देव व शोभा खंडारे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. प्राचार्य वंदना टिक्कस यांनी सावित्रीबाई फुले यांची यशोगाथा व तत्काली रूढी, प्रथा,परंपरा या विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरिता शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम यशस्वी करता मोलाचे सहकार्य केले.



### सामाजिक कार्यकर्ते शरद आठवले यांच्या हस्ते पत्रकारांचा सन्मान

**खल्लार**-मराठी पत्रकारीतेची पायाभरणी करणारे आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्यापूर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा सांगळूद ग्रामपंचायतचे उपसरपंच शरद आठवले यांनी ६ जानेवारीला दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी विश्राम गृह दर्यापूर, येथे तालुक्यातील पत्रकारांचा सन्मान करुन सत्कार केला. तसेच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब टोबरे यांच्याकडूनही पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.त्यावेळी गजानन देशमुख, बबनराव शिरभाते, लक्ष्मण जाधव, हरिदास खडे, शशांक देशपांडे, गजानन चौरपगार,युवराज डोंगरे, नावेद सय्यद,शिलवंत रायबोले,अमोल कंटाळे,रवि नवलकार, अनिल तायडे, महेश बुंदे, मोहन खरबडकर, आदेश खांडेकर यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अनिल गवई, पॉलेंन्द्र ढोके सतिश जामनिक उपस्थित होते.




### डॉ.रुपाली ढेकेकर भारत गौरवरत्न पुरस्काराने सन्मानित

**अमरावती**-भारत गौरव रत्न श्री सन्मान परीषद च्या वतीने भारत गौरव रत्न श्री सन्मान समारंभाचे आयोजन भारताची राजधानी दिल्ली हॉटेल द अशोका, चाणक्यपुरी येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये सेवा, खेळ,संस्कृती आणि सामाजिक कल्याण या क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.या पुरस्कार सोहळ्यात देशभरातून आलेल्या राजकीय, सामाजिक आणि विविध क्षेत्रातील २०० पेक्षा अधिक प्रमुख अतिथी सहभागी झाले होते,तर या सोहळ्याचे विशेष आकर्षण होते आशिकी फेम अभिनेत्री अनु अग्रवाल. या सोहळ्यामध्ये पं. स.भातकुली शिक्षण विभाग येथे कार्यरत असलेल्या डॉ.रुपाली समीर ढेकेकर यांना शिक्षण व सांस्कृतिक विभागाकरिता भारत गौरव रत्न व डॉक्टरेट हा सन्मान देवून सन्मानित करण्यात आले.डॉ.रुपाली ढेकेकर यांना हा सन्मान मिळणे ही आपल्या पं. स.भातकुली शिक्षक विभागाकरिता व अमरावती जिल्ह्याकरिता अभिमनाची बाब आहे.डॉ.रुपाली ढेकेकर यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.त्यांचा अमरावती जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र,शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख,सतिश मुगल,भातकुली पं.स.चे गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे,शिक्षण विस्तार अधिकारी संतोष घुगे,सर्व केंद्रप्रमुख,विषय तंज्ञ,मुख्याध्यापक,शिक्षक शिक्षक समितीचे जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे,उमेश चुनकीकर,संतोष राऊत,राजेश सावरकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### सत्यपाल महाराज यांचा हस्ते समाजसेवा गिरीश चौधरी यांचा सत्कार

**अंजनगाव बारी**-येथील खंडोबा यात्रा महोत्सव जलका शहापूर,अमरावती, येथे मंदिराच्या व गावच्या वतीने महाराष्ट्रातील थोर समाज प्रबोधक कीर्तनकार तसेच आपल्या सप्तखंजिरीच्या माध्यमातून महापुरुषांचा ग्रामस्वच्छतेचा संदेश देणारे सत्यपाल चिंचोलीकर उर्फ सत्यपाल महाराज, आकोट यांचा 'सत्यपाल वाणी' कार्यक्रमाचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित लोकांच्या समवेत समाजसेवक गिरीश चौधरी यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्यांनी गावकऱ्यांचे वतीने सर्वांचे आभार मानले.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# अमरावती शहर सीसीटीव्हीच्या जाळ्यात आणणार

## अमरावती महापालिकेचा महापौर भाजपचाच -महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंना विश्वास

### भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पक्ष पूर्णपणे सज्ज असून, कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी संपूर्ण अमरावती शहर सीसीटीव्हीच्या जाळ्यात आणण्यात येणार आहे, अशी घोषणा महसूल मंत्री तथा भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज (दि.७) पत्रकार परिषदेत केली. सुरुवातीला अमरावती महापालिका निवडणुकीसाठी भाजपचा अधिकृत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला.

बावनकुळे म्हणाले की, अमरावतीच्या विकासासाठी राज्य सरकारकडून ११० कोटी रुपयांची विशेष आर्थिक तरतूद मिळावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठोस मागणी करण्यात येणार आहे. शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी अत्याधुनिक सीसीटीव्ही यंत्रणा उभारली जाणार असून, गुन्हेगारी व जातीय तणाव निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. पुढील वर्षीच्या अर्थसंकल्पात अमरावतीसाठी ११० कोटी रुपयांची विशेष



#### कमळ चिन्हाविरोधात भूमिका मान्य नाही

यावेळी त्यांनी पक्षातील शिस्तीवर ठाम भूमिका मांडत सांगितले की, भाजपच्या अधिकृत उमेदवारांव्यतिरिक्त इतर कोणाचाही प्रचार करणे अथवा कमळ चिन्हाविरोधात भूमिका घेणे हे पक्षाला मान्य नाही. भाजपच्या सर्व नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकसंघ राहून अधिकृत उमेदवारांच्या विजयासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

भाजप नेत्या नवनीत राणा यांच्याबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, त्यांनी भाजपच्या कमळ चिन्हाचा प्रचार करावा, ही पक्षाची अपेक्षा आहे. भाजपचा विजय आणि अमरावतीचा विकास हेच आमचे ध्येय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

अमरावतीला विकसित शहर ☞(पान २ वर)

तरतूद मागणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

डबल इंजिन सरकार अमरावतीच्या विकासासाठी पूर्ण ताकदीने सोबत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा थेट लाभ अमरावतीकरांना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असून, सीसीटीव्ही प्रकल्पामुळे गुन्हेगारीवर ☞(पान २ वर)

# इंदूरहून अमरावतीत गुटखा तस्करीचा पर्दाफाश

## -गुन्हे शाखेचा ट्रान्सपोर्ट नगरमध्ये छापा, -२९.४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** इंदूरहून अमरावतीत आणण्यात आलेली गुटख्याची खेप नागपुरी गेट पोलिस स्टेशन हद्दीतील ट्रान्सपोर्ट नगर परिसरात पकडण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी १४.४३ लाखांचा बंदी असलेला गुटखा व सुगंधित तंबाखू तसेच १५ लाख किमतीचा आयशर ट्रक असा एकूण २९.४३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही धडक कारवाई मंगळवारी (दि. ६) रोजी करण्यात आली.



क्राईम ब्रँचचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना खबऱ्यामार्फत माहिती मिळाली होती की वलगाव रोडवरील ट्रान्सपोर्ट नगरमध्ये डायमंड ट्रान्सपोर्टसमोर उभा असलेला एमएच १५/ईई १८७७ क्रमांकाचा आयशर ट्रक सामान्य मालाच्या आड बंदी असलेला गुटखा व सुगंधित तंबाखू घेऊन आला असून तो लवकरच उतरवण्यात येणार आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी छापा टाकला. तपासादरम्यान ट्रक चालकाला ताब्यात घेऊन चौकशी ☞(पान २ वर)

# माजी मंत्री जगदीश गुप्ता पुन्हा शिवसेनेत

## -एकनाथ शिंदेनी दूर केली नाराजी



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकी समोर शिवसेना शिंदे गटाला मोठा दिलासा मिळाला आहे. आठ दिवसापूर्वी शिवसेनेला जय श्रीराम करून, 'आता आपण कुठल्याही पक्षात जाणार नाही,' अशी घोषणा करणारे माजी मंत्री जगदीश गुप्ता पुन्हा एकदा शिवसेनेमध्ये परतले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः त्यांची भेट घेऊन जगदीश गुप्तांची नाराजी दूर केली आहे.

माहितीनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ☞(पान २ वर)

# पेपरवर छापलेले शब्द आजही विश्वासाची हमी देतात - प्रदीप देशपांडे





**पुसद/प्रतिनिधीः-** डिजिटल, इलेक्ट्रॉनिक व सोशल मीडियाच्या झपाट्याने वाढलेल्या प्रभावाच्या काळातही प्रिंट मीडियाची विश्वासार्हता आजही अबाधित असून वाचक पुन्हा एकदा वृत्तपत्रांकडे आकर्षित होत आहेत. असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार तथा दैनिक जनमाध्यम, अमरावतीचे संपादक प्रदीप देशपांडे यांनी व्यक्त केले. पुसद पत्रकार संघाच्या वतीने ६ जानेवारी रोजी आयोजित पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

संपादक देशपांडे पुढे म्हणाले की, 'इलेक्ट्रॉनिक मीडियावर काय सांगितले जाते यापेक्षा वृत्तपत्रात काय छापून येते, याकडेच आजही नागरिक विशेष लक्ष देतात. कारण पेपरवर छापून आलेल्या मजकुरावर लोकांचा विश्वास असतो. त्यामुळे जुनी पिढीच नव्हे तर नव्या पिढीतील वाचकही पुन्हा प्रिंट मीडियाकडे वळत आहेत.' प्रिंट मीडिया आपली हरवलेली विश्वासार्हता पुन्हा एकदा दृढ करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक पुसद पत्रकार संघाचे सचिव हरिप्रसाद विश्वकर्मा यांनी केले. पुसद पत्रकार संघाने ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मानाची परंपरा सातत्याने जपली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सत्कारमूर्तींचा परिचय प्रा.दिनकर गुल्हाने यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश राजे यांनी केले. कैलास जगताप, राजे दुधे, ज्ञानेश्वर शिंदे व इतर सदस्य ☞(पान २ वर)

# देशी कट्टा व काडतूससह आरोपी गजाआड

### -गुन्हे शाखेची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हे शाखेच्या पथकाने बडनेरा पोलीस ठाणे हद्दीतील बगिया टी पॉइंट जवळ कारवाई करून आरोपी प्रतिक उर्फ पद्या विनोद कैथवास (वय २०, माताफैल, जुनी बस्ती बडनेरा) याला देशी कट्टा व एक जिवंत काडतूससह ताब्यात घेतले आहे. ४१ हजाराचा मुद्देमाल त्याच्याकडून जप्त करण्यात आला आहे.

माहितीनुसार महानगरपालिका निवडणुकीत दरम्यान अवैधरित्या शस्त्र बागळून दहशत निर्माण करणाऱ्याविरुद्ध कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्या नुसार ☞(पान २ वर)

# पत्नीचा अधिकार असतांना पतीची अधिकाऱ्यावर ठसकबाजी?

**नगराध्यक्ष शपथग्रहण सोहळयातींल प्रकार**

## सुधाकर भारसाकळे यांचे अधिकाऱ्याविरोधात वादग्रस्त वक्तव्य

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर नगर परिषदचा शपथ ग्रहण सोहळा ५ जानेवारी रोजी नगरपरिषदेच्या आवारात मोठया थाटात पार पडला. दर्यापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षपदी मंदाकिनी सुधाकर भारसाकळे यांची अधिकृतरित्या निवड झाल्यानंतर पार पडलेल्या शपथग्रहण सोहळ्यात घडलेल्या एका घटनेमुळे दर्यापूर शहरात



राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.नगराध्यक्ष पदाचा अधिकार पूर्णता लोकनिर्वाचित प्रतिनिधीकडे असताना त्यांच्या पतीकडून प्रशासकीय अधिकाऱ्यावर थेट ठसकबाजी करणारे वादग्रस्त वक्तव्य करण्यात आल्याने लोकशाही संकेत प्रशासकीय शिस्त व सत्तेच्या मर्यादा याबाबत

> दर्यापूर नगरपरिषद मध्ये कोणते अनलिगल असलेले कामे पैसे देऊन झाले त्यांनी दाखवून द्यावे, तुम्ही चांगल्या कामाला विरोध केला त्याचे काय.
>
> **-रोशन कट्यारमाल -** नगरसेवक, भाजपा

गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शपथ ग्रहण समारंभ हा लोकशाही ☞(पान २ वर)

# कार खरेदीच्या नावावर एक लाखाने गंडविले

### रेखा कॉलनी येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** कार खरेदीच्या नावावर एक लाखाने गंडविण्यात आल्याची घटना गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या रेखा कॉलनी परिसरात समोर आली आहे. या प्रकरणात रुपेश जवाहरलाल श्रीवास्तव (वय ४८,रेखा कॉलनी) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी आजीम मणियार व जाहीर इब्राहिम शेख (दोन्ही नाशिक) यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार रुपेश श्रीवास्तव यांना कार खरेदी करायची होती. यासाठी आरोपी यांनी त्यांच्याशी संपर्क केला. त्यांच्या व्हाट्सअप वर कारचे फोटो पाठवले. त्यानंतर कार खरेदी करण्यासाठी श्रीवास्तव यांना पुन्हा पुन्हा फोन करून एक लाख चार हजार रुपये फोन पे वरून पाठवायला सांगितले. श्रीवास्तव यांनी एक लाख रुपये दिले. यानंतर त्यांनी आरोपींना भेटण्यासाठी फोन केला असता आरोपी यांनी ☞(पान २ वर)

# कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यात सरकार पूर्णतः अपयशी

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यातील गुन्हेगारी घटनांमध्ये सातत्यानं वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यात सरकार पूर्णतः अपयशी ठरलं आहे. राज्यात सध्या अराजकतेचे वातावरण असून पोलीस प्रशासनावर राजकीय दबाव टाकला जातोय. महाराष्ट्रात सध्या 'गुंडाराज' सुरू असून, ते चालवणारे सत्ताधारीच गुंड झालेत' असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज बुधवार ७ जानेवारी रोजी मालटेकडी येथील काँग्रेस भवनात पत्रकारांशी संवाद साधताना केला.



### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर चिंता व्यक्त करत राज्य सरकारवर आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांनी जोरदार टीका केली. ते म्हणाले कि, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याचा तीव्र निषेध करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेला सरकारच्या अपयशाचं प्रतीक असल्याचं म्हटलं आहे. या हल्ल्यात हिदायत पटेल यांचा मृत्यू झाला असून, ही घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. अशा प्रकारच्या गंभीर घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या 'कृपा-आशीर्वादामुळंच' संपूर्ण महाराष्ट्रात ☞(पान २ वर)

# ज्या उमेदवाराच्या पाठीशी महिला त्याचा मतपेटीत नंबर पहिला

**अमरावतीमध्ये फडकवणार विकासाचा भगवा**

## जाहीर सभेत गरजले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**अमरावती/प्रतिनिधीः-** विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा नगरपरिषद निवडणुकीमध्ये देखील लाडक्या बहिणींची संख्या खूप जास्त होती. खरंतर लाडक्या भावाला निवडून आणण्याकरिता लाडक्या बहिणींचा सपोर्ट खूप महत्त्वाचा आहे. ज्या उमेदवारांच्या पाठिशी महिला, त्यांचा मतपेटीत नंबर पहिला,' असं नेहरू मैदानावर जाहीर सभेला संबोधित करताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.



अमरावतीमध्ये विकासाचा भगवा फडकविण्यासाठी सामूहिक प्रयत्न गरजेचे आहे यासाठी कार्यकर्ते जोमात कार्य करत आहे. नागरिकांना पण त्यांना सहकार्य करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. महानगरपालिका निवडणुकीमध्ये ☞(पान २ वर)

# महापालिका निवडणूक : ८ जानेवारीला EVM प्रात्यक्षिकाचे आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ करीता गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.



अमरावती महानगरपालिकेत बहुसदस्यीय प्रभाग पद्धत लागू असल्याने प्रत्येक मतदारास अ, ब, क, ड अशा चार जागांसाठी प्रत्येकी १ या प्रमाणे एकूण ४ वेळा मतदान करावे लागणार आहे. तसेच प्रभाग क्रमांक ९ वडाळी – एस.आर.पी.एफ. या प्रभागासाठी अ, ब, क या तीन जागांसाठी ३ वेळा मतदान करावे लागणार आहे.

या संदर्भातील सविस्तर माहिती व मतदान यंत्र (EVM) वापराबाबत जनजागृती व्हावी यासाठी दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका, अमरावती येथे EVM प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले आहे.

सदर EVM प्रात्यक्षिकासाठी सर्व माध्यम प्रतिनिधी तसेच इच्छुक नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात येत आहे. या माध्यमातून मतदान प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती मिळणार असून, मतदारांमध्ये ☞(पान २ वर)

# अंबापेठ परिसरात नियमभंग करणाऱ्या आस्थापनेला दंड

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ रोजी स्वच्छता तपासणी मोहिम राबविण्यात आली. झोन क्रमांक २, राजापेठ (मध्य झोन) अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १३, अंबापेठ परिसरात जुना कॉटन मार्केट ते जयस्तंभ चौक या मुख्य रस्त्यावर स्वच्छता तपासणी दरम्यान



'एकता आभूषण' या आस्थापनेचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकताना आढळून आला. या ☞(पान २ वर)

# आयुर्वेदिक औषध व डिझेल चोरीप्रकरणी चालकास एक वर्षाचा कारावास

**अमरावती/प्रतिनिधीः-** मालकाच्या विश्वासाचा गैरवापर करून आयुर्वेदिक औषधे व डिझेलची चोरी करून त्याची परस्पर विक्री केल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपी चालकास दोषी ठरवित एक वर्षाचा साधा कारावास व एक हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली आहे. दंड न भरल्यास आरोपीस आणखी एक महिना साधा कारावास भोगावा लागणार आहे.



या प्रकरणातील फिर्यादी डॉ.रविराज साधुप्रसाद पांडे असून आरोपी कमलाकर गवार हा त्यांच्या स्कॉर्पिओ वाहनावर चालक म्हणून कार्यरत होता. आरोपीने फिर्यादीच्या परवानगीशिवाय वाहनातून आयुर्वेदिक औषधांची पॅकेट्स, औषधी अर्क तसेच डिझेलची चोरी करून त्याची विक्री केल्याचे तपासात निष्पन्न झाले. चोरीस गेलेल्या मालाची एकूण किंमत ५७,५५७ रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी फिर्यादीने ३ मार्च २०१९ रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ३८१ (चोरी) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. प्राथमिक तपास पोलीस उपनिरीक्षक नरवाडे यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या खटल्याची सुनावणी न्यायालय क्र. ०८, अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी आर. टी. घोगले यांच्या न्यायालयात झाली. ☞(पान २ वर)